मंगळवार, १७ जानेवारी २०२३
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१४८
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • TUESDAY 17 JANUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-148 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-14 • PRICE-5

# सरकार डोळे मिटून शिक्कामोर्तब करू शकत नाही

## किरण रिजिजू यांचे पत्र : न्यायालयाच्या न्यायाधीश निवडीत सरकारला हवा हस्तक्षेप

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांना केंद्रीय विधी व न्याय मंत्री किरण रिजिजू यांनी पत्र लिहिले आहे. यात सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या कॉलेजियम पद्धतीमध्ये सरकारचा प्रतिनिधी देखील असावा, असे म्हटले आहे. गेल्या काही दिवसांपासून केंद्र सरकार आणि सर्वोच्च न्यायालयांच्या न्यायाधीश निवडीवरुन बराच वाद सुरु असून या पत्रामुळे वादात ठिणगी पडण्याची चिन्हे आहेत.**

केंद्रीय विधी व न्याय मंत्री किरण रिजिजू यांनी सांगितले की, न्यायाधीशांची नेमणूक करण्यासाठी सध्या अस्तित्त्वात असलेली कॉलेजियम पद्धत ही समाधानकारक नाही. या पद्धतीच्या जागी पुन्हा एकदा राष्ट्रीय न्यायिक निवड आयोगाची बाजू उचलून धरली आहे. रिजिजू यांच्या मतानूसार न्यायाधीशांची निवड करण्यामध्ये सरकारची प्रमुख भूमिका असली पाहीजे. कारण सरकारकडे अनेक महत्त्वाचे अहवाल आणि सूचना असतात, ज्या न्यायाधीशांना उपलब्ध होत नाहीत.

रिजिजू हे आपली भूमिका समजावताना म्हणाले की, आम्ही कॉलेजियम पद्धतीमधून आलेल्या नावांना विरोध करतोय म्हणून आम्हाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे योग्य नाही. सरकारचे काम म्हणजे डोळे मिटून समोर येणाऱ्या नावांवर फक्त शिक्कामोर्तब करायचे एवढेच नाही. मात्र दुसऱ्या बाजूला सर्वोच्च न्यायालयाने देखील रिजिजू यांच्या या तर्कावर आपली बाजू मांडली आहे. न्यायाधीश एस. के. कौल आणि न्यायाधीश अभय ओक यांच्या खंडपीठाने सांगितले, “कॉलेजियमद्वारे सुचविलेल्या नावांवर जर शंका असतील तर सरकारने तसे सांगितले पाहीजे. पण कॉलेजियने दिलेल्या नावांना अडवून ठेवणं योग्य होणार नाही.” उच्च वा सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या नेमणुका या न्यायाधीशवृंदा मार्फत केल्या जातात. कॉलेजियम नावाने ओळखल्या जाणाऱ्या या पद्धतीत न्यायाधीशांचाच समावेश असून, या विशेष न्यायाधीशवृंदाची नियुक्ती सरन्यायाधीशांच्या आदेशानेच केली जाते. याचा अर्थ सरन्यायाधीश अन्य चार ज्येष्ठांच्या मदतीनेच उच्च वा सर्वोच्च न्यायालयाचे अन्य न्यायाधीश निवडतात. हा वृंद



न्यायाधीशांची नावे सुचवतो, मग तशी शिफारस सरकारकडे केली जाते आणि नंतर त्यांची रीतसर नियुक्ती होते. सर्वोच्च न्यायालयाच्या सध्याच्या कॉलेजियममध्ये सरन्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली पाच न्यायाधीश आहेत. सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्यासोबत न्यायाधीश संजय किशन कौल, न्यायाधीश के. एम. जोसेफ, न्यायाधीश एम. आर. शाह आणि न्यायाधीश अजय रस्तोगी यांचा समावेश आहे. तसेच यांच्यापैकी एकही न्यायाधीश चंद्रजूड यांच्यानंतर न्यायाधीश बणण्याच्या रांगेत नाही आहे.

चर्चेतली बातमी

## महाराष्ट्र केसरी स्पर्धेतील पंच मारुती सातव यांना धमकी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** महाराष्ट्र केसरी स्पर्धेतील पंच मारुती सातव यांना धमकी देण्यात आल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत पुणे जिल्हा कुस्तीगीर संघटनेकडून कोथरुड पोलिसांकडे तक्रारअर्ज देण्यात आला आहे. महाराष्ट्र केसरी स्पर्धा नुकतीच कोथरुड परिसरात पार पडली. या स्पर्धेत मारुती सातव यांनी पंच म्हणून काम पाहिले. सातव यांच्या मोबाइल क्रमांकावर अज्ञाताने संपर्क साधला. मल्ल सिकंदर शेख याच्याशी झालेल्या लढतीत प्रतिस्पर्धी मल्ल महेंद्र गायकवाड याला चार गुण बहाल केल्याचा आरोप अज्ञाताने केला तसेच सातव यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचे पोलिसांकडे दिलेल्या तक्रार अर्जात म्हटले आहे. याबाबत पुणे जिल्हा कुस्तीगीर संघटनेचे अध्यक्ष संदीप भोडवे यांनी कोथरुड पोलीस ठाण्यात अर्ज दिला आहे. या प्रकरणात सातव यांचा जबाब नोंदवून घेण्यात येणार असून पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे कोथरुड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी सांगितले.

## माजी खा. नबीजादा यांची हत्या

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** अफगाणिस्तानच्या माजी खासदार मुर्सल नबीजादा आणि त्यांच्या सुरक्ष रक्षकाची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुर्सल या काबूलमधील आपल्या घरी असताना रात्री काही अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर हल्ला केला. नबीजादा या अमेरिकेच्या समर्थक सरकारमध्ये खासदार होत्या. तालिबानने ऑगस्ट २०२१ मध्ये गनी सरकारला सत्तेतून हाकलून लावत अफगाणिस्तानची सत्ता काबिज केली होती.

नबीजादा या त्यांच्या सुरक्षा रक्षकांसोबत आपल्या घरीच होत्या. दोघांचीही घरी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. रविवारच्या रात्री हा हल्ला झाला. या हल्ल्यात नबीजादा यांचा भाऊ जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरु आहेत. सुरक्षा यंत्रणांनी या प्रकरणाची चौकशी सुरु केली आहे. तालिबानने अफगाणिस्तानवर ताबा मिळवल्यानंतर अब्दुल गनी हे देश सोडून पळाले होते. मात्र नबीजादा यांनी शेवटपर्यंत अफगाणिस्तान सोडला नाही. देश सोडून जाण्यास त्यांनी विरोध केला होता. आणखी माजी खासदार मरियम सोलेमनखिल यांनी ट्विट करत सांगितले की, नबीजादा ही अफगाणिस्तानची एक धाडसी मुलगी होती. आपल्या विचारांवर ठाम आणि ध्येयाने झपाटलेली अशी ती होती. संकटांसमोरही ती डगमगता आजवर उभी राहिली. मरियम यांनी सांगितले की, अफागाणिस्तान सोडण्याची संधी नबीजादाला मिळाली होती. तरिही देशात राहून लोकांसाठी लढण्याचा निर्णय तिने घेतला होता. नबीजादा या फक्त ३२ वर्षांच्या होत्या.

# क्रिप्टो करन्सीचा जालन्यात धुमाकूळ

## काही झाले मालामाल तर काही झाले कंगाल

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** क्रिप्टो करेंसी म्हणजे आभासी चलन जे प्रत्यक्षात हातात येत नाही मात्र डिजिटल माध्यमातून वापरल्या जाते आणि 'जीडीसी' अशा या क्रिप्टो करन्सीने सध्या जालना जिल्ह्यात धुमाकूळ घातला आहे. अनेक जण मालामाल झाले आहे तर मालामाल झालेल्या पेक्षा कंगाल झालेल्यांची संख्या जास्त आहे. त्यामुळे गेल्या चार दिवसांपासून जालन्यामध्ये गुंतवणूक करून नुकसान झालेल्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. याच संतापाच्या भरात काल घनसांवगी तालुक्यात होत असलेला मोठा अनर्थ टळला आहे. दरम्यान लाखो रुपयांचे नुकसान झाल्यामुळे तूर्तास दबलेले हे प्रकरण पुन्हा कधीही उफाळून येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

साधारण वर्षभरापूर्वी जालना जिल्ह्यामध्ये क्रिप्टो करन्सीने शिरकाव केला. पाहता पाहता डॉक्टर, राजकीय मंडळी, दिग्गज खेळाडू, सामान्य नागरिक हे या क्रिप्टो करन्सीच्या जाळ्यात अडकले. एका मध्यस्थामार्फत साडेतीन हजार रुपयांचे लाख रुपये मिळतील, अशा प्रकारची ही करन्सी म्हणजे चलन आहे. या चलनावर शासनाचे नियंत्रण नाही. त्यामुळे प्रत्यक्ष व्यवहारात हे चलन दिसतही नाही आणि कोणाला मिळतही नाही. हे चलन म्हणजे फक्त एका खात्यावरून दुसऱ्या खात्यावर जमा खर्च करण्याचे चलन आहे. एखादी वस्तू खरेदी करायची असेल तर ती त्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असेल तरच खरेदी करता येते आणि शासन दरबारी हे कुठेही वैद्य नाही. त्यामुळे फसणूक झाली तरी कुठेही दाद देखील मागता येत नाही. अशा या व्यवहारामध्ये बिटकॉइन नावाचा एक प्रकार आहे. हा व्यवहार केल्यानंतर मध्यस्थाला ठराविक कमिशन मिळते. बिटकॉइन आठ-दहा महिन्यांपूर्वी बाजारामध्ये डिजिटल प्लॅटफॉर्मवर साडेतीन हजार रुपयांमध्ये उपलब्ध होते आणि ते 25 डिसेंबर 2022 रोजी अधिकृतपणे डिजिटल चलनात येणार होते. त्यामुळे जिल्ह्यातील झटपट आणि रातोरात श्रीमंत होऊ इच्छिणाऱ्या आणि अमाप पैसा असणाऱ्या अनेकांनी आणखी एक गुंतवणुकीचा मार्ग म्हणून या क्रिप्टो करन्सीमध्ये लाखो रुपयांची गुंतवणूक केली. सामान्य माणसांनी पतसंस्थेमध्ये सोने गहाण ठेवून त्याचे कर्ज घेतले आणि तो पैसा या क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवला. शासकीय कर्मचाऱ्यांनी खोटी वैद्यकीय बिले देऊन मिळालेला पैसा या करन्सीमध्ये गुंतवला. 25 डिसेंबरला हे गोल्ड कॉइन डिजिटल प्लॅटफॉर्मवर आल्यानंतर साडेतीन हजार रुपयांमध्ये आठ महिन्यांपूर्वी खरेदी केलेल्या या गोल्ड कॉइनची किंमत एक लाख रुपयांपर्यंत गेली. त्यामुळे करोडो रुपये डिजिटल प्लॅटफॉर्मवर जमा झाले आणि ग्राहकांची मागणी वाढली. एक लाख रुपयांचे कॉईन घेणारे कोणी राहिले नाही. त्यामुळे या कॉइनची किंमत घसरली आणि सध्या ती दीड हजारावर आली आहे. त्यामुळे आठ महिन्यांपूर्वी साडेतीन हजार रुपयांना एक याप्रमाणे हजारो कॉइन घेणाऱ्या गुंतवणूकदारांचा फायदा तर झालाच नाही उलट मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे ज्यांनी ही गुंतवणूक केली होती, असे अनेक गुंतवणूकदार कंगाल होण्याची स्थिती आहे. परंतु ज्यांनी थोडी गुंतवणूक केली आणि त्याचे लाख लाख रुपये आले त्यावेळेस त्यांनी हे विकून टाकले आणि मोकळे झाले. परंतु ज्यांनी हे विकले नाहीत ते मात्र कंगाल होत आहेत. साडेतीन हजाराचे एक लाख रुपये झाले या एक लाख रुपयांवरून पुन्हा घसरण झाली ते 50 हजारांवर आले 50 हजारांवरून दीड हजारापर्यंत आले आणि प्राप्त माहितीनुसार आता त्याची किंमत दोन रुपये झाली असल्याचे सांगण्यात येत आहे . त्यामुळे साडेतीन हजारांचे साडेतीन हजार मिळणे तर सोडाच मात्र त्याचे दोन रुपये मिळत असल्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. दरम्यान आता पुन्हा कधी या गोल्ड कॉइनचा भाव वाढेल याकडे सर्वांचे लक्ष आहे. दरम्यान याच गुंतवणुकीच्या प्रकारामधून काल घनसांवगी तालुक्यात एक ठिकाणी मोठा तणाव निर्माण झाला होता. यामध्ये ज्या व्यक्तीच्या मार्फत हा पैसा गुंतवला होता त्याचे आणि गुंतवणूकदाराचे मोठे भांडण होण्याची शक्यता निर्माण झाली होती. परंतु पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे तूर्तास हे भांडण मिटले आहे. मात्र भविष्यात हा वाद पुन्हा कधीही उफाळण्याची शक्यता नाकारता येत नाही.



# पीक कर्जासाठी बँकांकडून ‘सिबिल’ची सक्ती

## मुजोर बँकांना समज देऊन शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन द्या : अजित पवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील काही व्यापारी, राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना अल्पमुदतीचे पीक कर्ज देताना ‘सिबिल’ अहवाल विचारात घेतात. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्ज मंजूर होताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. याबाबत मी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात आवाज उठवला होता. त्यावेळी शेतकऱ्यांना कर्ज देताना ‘सीबील’ स्कोअर पाहिला जाणार नसल्याचे आश्वासन सरकारकडून देण्यात आले होते. त्याबाबत शासनाने आदेश निर्गमीत केला होता, मात्र या आदेशाची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत नाही. मात्र अजूनही अनेक बँका ‘सिबिल’चा आधार घेऊनच शेतकऱ्यांना कर्ज देतात, अशा अनेक तक्रारी राज्यभरातून माझ्याकडे येत आहेत, तरी राज्य सरकारने तातडीने मुजोर बँकांना समज देऊन शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली आहे.


पीक हंगामासाठी शेतकऱ्यांना भांडवलाची आवश्यकता असते. अनेक व्यापारी आणि राष्ट्रीयकृत बँका सिबिल स्कोअर ६०० ते ७०० पर्यंत असल्याशिवाय पीक कर्जाचे वितरण करत नाहीत. बँकांच्या या आडमुठ्या



भूमिकेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळण्यास अडचणी निर्माण होत असल्याची बाब मी हिवाळी अधिवेशनाच्यावेळी सभागृहात मांडली होती. त्यावेळी शेतकऱ्यांना पीक कर्ज देताना ‘सिबिल’ स्कोअरची सक्ती करणार नसल्याचा शब्द सरकारकडून सभागृहात देण्यात आला होता. त्याबाबतचे शासन आदेश निर्गमित करण्यात आले होते. मात्र त्याआदेशाची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत नाही.

मात्र अजूनही राज्यातील अनेक व्यापारी आणि राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना कर्ज देताना ‘सीबील’ अहवालाचा आधार घेत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्ज मिळण्यास अडचणी येत आहेत. त्याबाबत राज्यभरातून फोनव्दारे, प्रत्यक्ष भेटीत शेतकरी तक्रारी करत आहेत. तरी या तक्रारींची तातडीने दखल घेऊन सरकारने मुजोर बँकांना समज द्यावी. शेतकऱ्यांना कर्ज देताना ‘सीबील’ स्कोअर न बघण्याचे दिलेले लेखी आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे होईल याकडे लक्ष द्यावे. तसेच ‘सिबिल’मुळे कोणत्याही शेतकऱ्याचे कर्ज मंजूर न केल्यास त्याबाबत तक्रार कोणाकडे करावी, याबाबत शेतकऱ्यांना अवगत करावे. तसेच कर्जाविषयीच्या तक्रारीचा निपटारा करण्यासाठी यंत्रणा उभारण्याची मागणी विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली आहे.

# तुमची देहबोली सांगते तुमच्याबद्दल





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932



आधुनिक केसरी

लहानपणापासून आपली बोलीभाषा आपल्या कानावर पडत असते. आपण ती बोलायला शिकतो. अगदी तशीच आपली देहबोली सुद्धा आपल्यासोबत असते. आणि प्रसंगी ती शब्दांपेक्षाही अधिक प्रभावी ठरते. इंग्रजीतील Actions speak louder than words हे वाक्य सुद्धा आपल्याला देहबोलीचे महत्व स्पष्ट करते. पण आपल्या देह्बोलीकडे आपण म्हणावे तसे जाणीवपूर्वक लक्ष देत नाही. किंबहुना तिला आपण गृहीत धरतो. आपली देहबोली समोरच्याला खूप काही सांगून जाते. उदाहरण म्हणून काही लोकप्रिय गाणी बघा. ' चांदणे शिंपीत जाशी चालता तू चंचले.' या गीतातून तुझे चालणे किती सुंदर आहे हे प्रभावीपणे सांगितले आहे. किंवा हे गीत बघा. ' लाजून हासणे अन हासून ते पाहणे, मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे.' या गीतातली प्रेयसीची देहबोली प्रियकराला बरेच काही सांगून जाते. अशा रीतीने आपली देहबोली प्रत्येक प्रसंगातून व्यक्त होत असते. चालताना आपण कसे चालतो ? समोरच्याला आपली चाल कशी वाटते ? त्यावरून लोक आपल्याबद्दल काही मत बनवीत असतात. पुरुषांच्या बाबतीत रुबाबदार चाल आणि स्त्रियांच्या बाबतीत डौलदार चाल आपले मन आकर्षून घेते. चित्रपटातील नायकांचे चालणे,बोलणे, उभे राहणे इ गोष्टी म्हणजे देहबोली कशी असावी याचा एक प्रकारचा वस्तुपाठच असतो. राजेश खन्ना, विनोद खन्ना इ नटांचे रुपेरी पडद्यावरील चालणे प्रेक्षकांचे मन आकर्षून घेत असे. अमिताभचे उभे राहणे आणि त्याला त्याच्या प्रभावी बोलण्याची जोड हे सगळे मिळून एक अजब रसायन तयार होते. म्हणूनच त्याचे ' हम जहां खडे होते है, लाईन वहीसे शुरू होती है ' यासारखे संवाद खूपच प्रभावी ठरतात. आपल्या जर आपल्या अनुकूल देहबोलीची जोड असेल तर आपली प्रगती कोणीही थांबवू शकणार नाही. आपण प्रभावी देहबोलीची वर काही उदाहरणे पाहिली. ती चित्रपटातील कलाकारांची होती. आपल्याला त्यांचे अनुकरण करण्याची आवश्यकता नाही. **क्रमशः**



## आनंदी पहाट

# हरणे-जिंकणे हे कालचक्र

आधुनिक केसरी

आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात. ज्यामुळे आपली मानसिकता बदलत राहते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने जरा हटके विचार करण्याची जरुरी असते. नंतरच कार्यकृती करणे योग्य ठरत असते. आपल्या अंतर्मनांत जीवनासाठी अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. ह्यात सकारात्मक आणि विवेकी विचारांना अधिक महत्व असते. आपल्या जीवनाच्या समृद्धीसाठी आयुष्याची सुरुवातच घरामध्ये सकारात्मक विचारांनी करायची असते. कारण ह्या सर्वच बाबींचा संबंध आपल्या व्यक्त होण्यासाठी असतो. मनाला रमवण्यासाठी आणि नवं आजमावण्यासाठी आपल्या अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. आपल्या मनाला नीट समजून घ्यावं लागतं. आपल्याच मनाचा अनेकदा आपल्याला अंदाज येत नाही. आपलं मन वर वर कितीही शांत वाटत असलं तरीही, काही वादळे आतल्याआत चालूच असतात, काहीवेळा अंतर्मनाला उध्वस्त करत असतात. विचारांचं थैमान सदोदित चालूच असतं, परंतू त्या विचारांना किनारा सापडत नसतो, वाट सापडत नसते. हे आपल्याला अनेकदा कळत असतं; पण वळत नसतं, हीच तर उणिव असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

मनांत येणारी प्रत्येक बाब नवीन एक प्रश्न घेऊन येत असते. त्या प्रश्नामुळे आपलं मस्तक गरम होत असतं; पण काहीवेळा शोधूनही उत्तर सापडत नाही. कधी कधी उत्तर सोप्प असूनही, माहिती असूनही वेळेला सुचत नाही,कारण ते आठवत नाही. आपल्या अंतर्मनाला पडलेल्या प्रश्नाचं उत्तर सापडलं, असं ठरवणेच कठीण होतं. निर्माण झालेल्या संभ्रमामुळे थोडं जे काही मिळालंय ते सगळ्यांना दिसत असतं, त्यामुळे हरलोय हे मान्य करायला जग तयार नसतं आणि जे मिळालंय ते असं काही मिळालेलं असतं कि, आपण जिंकलोय हे मान्य करायला आपलं मन तयार नसतं.



आधुनिक केसरी

**आत्मा हा पंढरी | कैवल्याचा ||**
गोंदला गे माये | हरि म्या हृदयी ||
ह्या संसारापायी | होतो दूर ||१||
आशा दंभ सारे | होते जीवलग ||
अहंकारी रंग | जडलेला ||२||
चित्त थाऱ्यावरी | कैसे राही सांग ?||
होता पांगापांग | काळजाची ||३||
तुझ्या संगतीने | झालो मी निस्संग ||
सावळा हा रंग | जीव झाला ||४||
हरि हरि हरि | दिसे चराचरी ||
आत्मा हा पंढरी | कैवल्याचा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

**आयुष्यात एखादा कालखंड हा तुमच्या जवळ असलेल्या संसाधनांचा उपयोग करण्याचा असतो तर एखादा कालखंड संसाधनांच्या विकसनाचा असतो; ज्याला सामान्य लोक वनवास म्हणतात. लक्षात ठेवा- 'अर्जुनाने वनवासातच पाशुपतास्त्र प्राप्त केले होते.'**




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी

**सृष्टि पदारथ सकल वे, करें सदा गुणगान ।
पर्ण पर्ण से अमि झरे, कणा कणा से ज्ञान
।।१९।। (स्वर्वेद तृतीय मण्डल चतुर्थ अध्याय) ०३/०४/१९**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :** सृष्टीतील समस्त पदार्थ प्रभूच्या गुणांचे गान करीत आहेत आणि पानापानांतून अमृत पाझरत आहे तसेच छोट्या छोट्या रजःकणांतून त्या प्रभू सत्तेचे ज्ञान प्राप्त होत आहे. सृष्टीतील समस्त पदार्थां द्वारे अव्यक्त चेतन अस्तित्त्वाचा बोध होत आहे.




स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

देहाच्या द्रुष्टीने त्यांची कर्मे सज्जनांच्या कर्मा प्रमाणेच असतात. त्यात कमीजास्त पणा असतो कारण हाताची बोटे एक सारखे नसतात हे आपल्याला माहिती आहे. परंतु मनाच्या आतली अवस्था स्थिर रहाते. मुक्त पुरूषाला त्याच्या देहावरून पहायचे नसते. तर त्याच्या ब्रम्ह रूपतेवर पहायचे असते. वेद पुराणे सांगतात ते विश्वसनीय आहे. शुक व वामदेव या दोघांच्या शिवाय अनेकांचा उध्दार यामुळेच घडला. शुकाने अनेक विषयावर विवेचन केले आहे तो मुक्त होता हे वेदवचन खरे मानले पाहिजे. तो लाकडा सारखा निर्जीव ब्रम्ह रूप नव्हता. श्रीमत भागवतात सांगितले आहे की योगेश्वर शुक जर काष्ठवत निर्जीव, ब्रम्ह रूप असता तर त्याला आत्मानात्मविवेक बोलून सांगता आला नसता. जो ब्रम्ह रूप होतो तो लाकडासारखा कर्मरहित होछन पडतो, हा अगदीच चुकीचा समज ठरेल. शुक ब्रम्हस्वरूप असू न त्याने परीक्षित राजाला एवढे भागवत सांगितले.



आत्मस्वरूपाचे वर्णन करण्यासाठी सारासार विचार करावा लागतो. तो विचार शब्दांत मांडता यावा लागतो. त्यासाठी ग्रंथाचे वाचश मनन चिंतन करावे लागते. चूक असेल तर ते सोडून द्यावे लागते. कारण चुकीच्या गोष्टींना वेद,ऊपनिषदामध्ये अजिबात थारा नाही. सतत सत्याश्रयाचा आधार घ्यावा. विषय समजून देण्यासाठी चराचर विश्व शोधून योग्य द्रुष्टांत द्यावे लागतात. मी दासबोधाचे लिखाण करण्यासाठी प्रा. के.वी. बेलसरे सरांचा दासबोध संदर्भ ग्रंथ घेतला आहे. त्यासाठी मी मा. बेलसरे सरांची शतशः ऋणी आहे. आत्मस्वरूपाचे वर्णन करण्यासाठी सारासार विचारांची बैठक तयार असलीच पाहिजे. मुक्त पुरूष अध्यात्म विषय सांगताना क्षणभर ब्रम्हाकार होतो. थोडावेळ आपल्या अवतीभोवतीच्या जगाला विसरतो. विश्व शोधतो आणि आपले लिखाण अनेक योग्य उचित द्रुष्टांतांनी सहजसुंदर बनवतो. स्वतः शुकाने एवढा मोठ्ठा भागवत ग्रंथ सांगितला त्याच्याजवळ ब्रम्हाचे ज्ञान होते. थोडक्यात काय तर नुसते रात्रंदिन पडून न रहाता चालता बोलता व्यवहार करता, सद्गुरूंच्या विचारसरणींवर जीवनातील कर्मे केली, त्यांच्या ज्ञानकलेवर चालले तर सायुज्यमुक्ति प्राप्त होऊ शकते.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# नामात असणे म्हणजेच शुद्धीवर असणे

आधुनिक केसरी

दारुड्यांच्या मेळाव्यात सारेच दारूच्या धुंदीत असतात. पण त्यांतल्या एखादा दारू न प्यालेला असला तर बाकीचे दारुडे त्याला ' हा शुद्धीवर नाही ' असे म्हणत असतात. वास्तविक तोच एकटा शुद्धीवर असून बाकीचेच खरे गैरसावध असतात. त्याप्रमाणे, आपण सर्वजण विषयांत दंग असल्याकारणाने, जो नामात असतो त्याला आपण ' हा शुद्धीवर नाही ' असे म्हणत असतो. वास्तविक पाहता, ' नामाशिवाय जगात दुसरे सत्य नाही ' अशी ज्याची दृढ भावना असते तोच खरा शुद्धीवर असतो, आपण मात्र भ्रमात असतो. आपल्याला झालेला हा भ्रम नाहीसा करायला तीन उपाय आहेत. एक सद्विचार, दुसरा सत्संगती, आणि तिसरा नामस्मरण. भगवंताचा विचार हाच खरा सद्विचार. एखाद्या माणसाला म्हटले, की तुझे अवयव आणि रंग यांच्याशिवाय ये, तर त्याला येता येणार नाही, कारण तो जिथे आहे तिथे त्याचा रंग आणि अवयव असणारच; त्याचप्रमाणे नाम, संत आणि भगवंत हे एकमेकांना चिकटूनच आहेत, त्यामुळे जिथे नाम आहे तिथे सत्संगती आणि भगवंत असतातच. वासरू घेऊन गेले म्हणजे जशी गाय पाठीमागून आपोआप येते, त्याप्रमाणे नाम घेतले की भगवंत त्यामागे येतोच. आजकाल इतकी यंत्रे निघाली आहेत, मग भगवंताच्या प्राप्तीसाठी संतांनी एखादे यंत्र शोधून काढले नाही का, असा



प्रश्न एखाद्याच्या मनात येईल, तर त्याचे उत्तर सोपे आहे. असे यंत्र संतांनी केव्हाच शोधून काढले आहे. त्या यंत्राचे नाव आहे ' रामनाम. ' हे यंत्र सर्वांना मिळू शकते, सर्वांना वापरता येते, शिवाय ते कधीच गंजत नाही.भक्त, भगवंत आणि नाम हे तिन्ही एकरूपच आहेत. जिथे नाम आहे तिथे भक्त आहे, आणि तिथेच भगवंत आहे. म्हणून नाम सर्वांत श्रेष्ठ आहे. ते नाम अनन्य होऊन आपण घेऊ या. नाल्यातून, गटारातून पाणी वाहते, ते किती घाण असते ! पण ते नदीला मिळते आणि ती सागराला मिळते. सागर त्या सर्वांना सागररूप करून टाकतो. तसे मनुष्य कितीही पापी, दोषी, अपराधी असू द्या, त्याने नाम-नदीची कास धरली की तो रामसागररूप झालाच म्हणून समजा. भगवंताला विसरणे हे सर्वांत मोठे पाप आहे. नामाने भगवंताचे स्मरण होते म्हणून नामाने पाप नाहीसे होईल. अनाथ शब्द नाथावाचून नाही, आणि नाथाला अनाथावाचून नाथत्व नाही. राम सर्वांचा नाथ आहे. त्याच्या अखंड स्मरणात आपण राहू या. प्रपंच वनवासासारखा आहे. रामाच्या स्मरणात प्रपंचातली संकटे आणि दुःखे कस्पटाप्रमाणे वाटतील.

**आजचे बोधवचन आहे - तुम्ही नाम घेत गेलात तर तुम्हांला संत धुंडीत जाण्याची जरूरीच नाही. तेच तुम्हांला धुंडीत येतील.**

# चाकणमध्ये बिबट्याचा वावर

## डरकाळ्यांच्या आवाजाने नागरिक दहशतीखाली

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे : चाकण शहरातील एकतानगर परिसरात रात्रीच्या सुमारास बिबट्या दिसल्याने नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले आहे. बिबट्याच्या डरकाळ्याचा आवाजाने नागरिक दहशतीखाली आहेत. एकता नगर परिसरातील ग्लॅडिओलस इंग्लिश मीडियम स्कूलच्या परिसरातील उसाच्या शेतात बिबट्याने नागरिकांना दर्शन दिले आहे.**



आधुनिक केसरी न्यूज

हा बिबट्या मोठ्या आवाजात डरकाळी फोडताना पहायला मिळत आहे. त्यामुळे नागरिकांनी घराबाहेर पडणे बंद केले आहे. दिवसेंदिवस बिबट्या चे मानवी वस्तीत दर्शन होऊ लागले आहे. अनेक भागात बिबट्याच्या हल्ल्यात आपले प्राण गमवावे लागले आहेत, तर अनेक जण यात जखमी देखील झाले आहेत. जुन्नर, आंबेगाव, शिरूर, खेड या तालुक्यात अनेकदा शेतात नागरिकांना बिबट्याचे दर्शन होत असते.

मात्र, बिबट्याचे आता शहरात देखील दर्शन होऊ लागले आहे. चाकण येथे औद्योगिक वसाहत असल्याने मोठ्या प्रमाणावर या ठिकाणी मानवी वस्ती आहे. अनेक राज्यातून नागरिक कामासाठी येथे स्थायिक आहेत. त्यातच शहरातच बिबट्याचे दर्शन झाल्याने नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर भीती पसरली आहे. बिबट्याच्या डरकाळ्या नागरिकांना मोठ्या प्रमाणावर ऐकायला येत असून वनविभागाने या बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावावा आणि बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे.



# भाजपा प्रदेश माध्यम प्रमुखपदी नवनाथ बन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश माध्यम विभाग प्रमुखपदी पत्रकार नवनाथ बन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बन यांच्या नियुक्तीची घोषणा केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत नागपूरमध्ये बन यांनी रविवारी भाजपामध्ये प्रवेश केला. गेल्या १५ वर्षांपासून बन हे माध्यम क्षेत्रात कार्यरत आहेत. दैनिक गावकरीपासून त्यांच्या पत्रकारितेतील कारकीर्द सुरु झाली. मराठवाडा नेता या वृत्तपत्रांत तसेच एबीपी माझा या वृत्तवाहिनीमध्ये त्यांनी काम केले. विद्यार्थी दशेत त्यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे काम केले. बन यांना माध्यम क्षेत्राचा मोठा अनुभव असून, भारतीय जनता पार्टीची धोरणे, विचारधारा सामान्य माणसांपर्यंत पोहचविण्याचे काम ते करतील, असे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी म्हटले.

# रानडुकरांनी केला शेतकऱ्याचा घात

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** बैलगाडीने शेतातून कापूस आणताना अचानक रानडुकरांचा कळप समोर आला. रानडुकरांना पाहून बैल सैरावैरा पळू लागले. यामुळे तरुण शेतकरी बैलगाडीवरून खाली कोसळला अन् बैलगाडीचे चाक छातीवरून गेल्याने तो गंभीर जखमी झाला. उपचारासाठी नेत असताना वाटेतच त्याचा मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना गोंडपिपरी तालुक्यातील नवेगाव वाघाडे येथे घडली. तुषार वांढरे (३२) असे मृत तरुण शेतकऱ्याचे नाव आहे. कापूस आणण्यासाठी तो शेतात गेला होता. बैलगाडीत कापूस भरून तो घरी निघाला. रानडुकरांचा कळप बैलगाडीसमोर आला. यामुळे बैल सैरावैरा पळू लागले. त्यामुळे तुषार हा खाली कोसळला. बैलगाडीचे चाक छातीवरून गेल्याने तो गंभीर जखमी झाला.

# संतश्रेष्ठ श्री निवृत्तीनाथ महाराज वारीतील भक्तांची तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** त्र्यम्बकेश्वर येथील संतश्रेष्ठ श्री निवृत्तीनाथ महाराज यात्रेतील वारकरी भक्तांची मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार कादवा सहकारी साखर कारखान्यातर्फे करण्यात येत आहे. हा सामाजिक उपक्रम २०२० साली सुरू करण्यात आला परंतु कोरोनाचे संकट आल्याने दोन वर्ष वारी झाली नाही.

या वर्षी वारी सुरू झाल्याने कादवा चा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. प्रत्येक दिंडीच्या सकाळ, दुपार व संध्याकाळ विश्रांतीच्या ठिकाणी कादवा चे आरोग्य पथक जागेवर जाऊन भाविक भक्तांची मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार करत आहे. दिंडीतील वारकरी भाविकांचा प्रचंड प्रतिसाद लाभत आहे. आग्रारोड, दिंडोरीरोड, पेठरोड, औरंगाबाद रोड, पुणे रोड हया मार्गाने येणाऱ्या वारीतील भक्तांची रस्त्यावर योग्य ठिकाणी तपासणी व उपचार करण्यात येत आहे. कादवा सहकारी साखर कारखाना हा महाराष्ट्र राज्यात अग्रेसर असलेल्या कारखान्यात गणला जातो. सतत वेगवेगळे सामाजिक उपक्रम कादवा कारखाना राबवत आलेला आहे. कोरोना काळात अनेक कोरोना प्रतिबंधक उपक्रम राबवून लसीकरण करणारा कादवा कारखाना आहे.वारकरी भक्तांची मोफत तपासणी व औषधोपचार देऊन "कादवा"शिरपेचात अजुन एक मानाचा तुरा रोवत आहे. कादवा चे वैदयकिय अधिकारी डॉ. प्रदिप तिडके हया आरोग्य पथकाचे नियोजन करत आहे. या पथकामधे कादवा नर्सिंग स्कुलच्या विद्यार्थी व कर्मचारी सहभागी झाले



आहे. यासाठी कादवा चे चेअरमन श्रीरामजी शेटे, व्हा. चेअरमन शिवाजीदादा बस्ते व संचालक मंडळाचे मार्गदर्शन लाभत आहे. कादवा चे अधिकारी, युनियन पदाधिकारी, सभासद, कामगार व कादवा नर्सिंग स्कूलचे सहकार्य मिळत आहे.



# भारतीय सैन्य दिवसानिमित्त पथनाट्याचे सादरीकरण

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, देवगिरी महाविद्यालयात भारतीय सैन्य दिवस साजरा करण्यात आला. राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थिनींनी मेजर दिव्या अजित कुमार यांच्या जीवनावर आधारित पथनाट्य सादर केले. 2010 साली आर्मी एअर डिफेन्स ऑफिसर म्हणून त्यांची निवड झाली होती. 21व्या वर्षी दिव्या अजित कुमार यांनी नवीन इतिहास घडविला, भारतीय सैन्यात 'स्वोर्ड ऑफ ऑनर' चा बहुमान मिळवणाऱ्या त्या पहिल्या महिला कॅडेट ठरल्या. सर्वात तरुण ऑफिसर म्हणून मेजर दिव्या यांना 'सिल्वर गन' स्मृतिचिन्हाने सन्मानित केले. कोणतीही सैनिकी पार्श्वभूमी नसताना त्यांनी अथक प्रयत्नांद्वारे हे स्थान मिळविले त्यांच्या आयुष्यात येणारे सर्व प्रसंग राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थिनींनी उत्कृष्टरित्या पथनाट्याद्वारे सादर केले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर, 7 महाराष्ट्र गर्ल्स बटालियनचे कर्नल किशोर भागवत, उपप्राचार्य डॉ. दिलीप खैरनार, डॉ.अनिल आर्दड, डॉ. अपर्णा तावरे, प्रा. सुरेश लिपाने, डीआयटीएमएस चे संचालक प्रा. गायकवाड, सुभेदार मेजर गंगाबहादुर गुरूंग, कॅप्टन डॉ.सुलक्षणा जाधव तसेच एनसीसीचे सर्व कॅडेट उपस्थित होते.

# कर्जफेडीच्या विवंचनेतून शेतकऱ्याने संपवले आयुष्य

आधुनिक केसरी न्यूज

**शिरवाडे वाकद :** शेतीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड



करता येत नसल्याच्या विवंचनेतून दत्तात्रय सुखदेव निफाडे (वय ५२) यांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना निफाड तालुक्यातील देवगाव येथे घडली. याबाबत मृत दत्तात्रय निफाडे यांचा मुलगा चंद्रकांत निफाडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, दत्तात्रय निफाडे यांची देवगाव शिवारात २ एकर शेती आहे. निफाडे यांनी देवगाव नागरी सहकारी पतसंस्थेकडून ४ लाख १० हजार, कॅनरा बँक निफाड शाखेतून पत्नीच्या नावे २ लाख व मुलाच्या नावे २ लाख रुपये कर्ज घेतले होते. तसेच नातेवाईक व मित्राकडून ४ लाख रुपये हातउसने घेतले होते. शेतात लागवड केलेले टोमॅटो आणि कांदा बाजारपेठेत विकून उत्पादन खर्चही निघाला नाही. त्यामुळे घेतलेले कर्ज फेडायचे कसे? या विचाराने ते काही दिवसापासून तणावात होते. त्यातूनच आज सोमवार दि.१६ सकाळी ११.३० सुमारास दत्तात्रय निफाडे यांनी शेतातील स्वतःच्या राहत्या घरात गळफास घेत आपली जीवनयात्रा संपवली. घटनेची माहिती पोलीस पाटील सुनील बोचरे यांनी लासलगाव पोलीस स्टेशनला कळविली. लासलगाव पोलीस स्टेशनमध्ये आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# कपिल सिब्बल यांचा आरोप

आधुनिक केसरी

केंद्र सरकार न्यायव्यवस्थेवर कब्जा करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप राज्यसभा सदस्य आणि माजी कायदेमंत्री कपिल सिब्बल यांनी रविवारी केला; तसेच 'राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगा'वर (एनजेएसी) पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयात 'वेगळ्या पद्धतीने' खटला चालवता येईल, अशी परिस्थिती निर्माण करण्याचा सरकार सर्वतोपरी प्रयत्न करीत असल्याचेही ते म्हणाले. केशवानंद भारती निकालाचे मूलभूत संरचना तत्त्व सध्याच्या काळात अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सिब्बल यांनी या वेळी स्पष्ट केले. त्याच वेळी सरकारला ते सदोष असल्याचे उघडपणे सांगण्याचे आव्हानही त्यांनी दिले. सर्वोच्च न्यायपालिकेतील नियुक्त्यांबाबत अंतिम अधिकार आपल्याकडे नसल्याची वस्तुस्थिती सरकारच्या पचनी पडत नसल्याचा दावाही त्यांनी केला. वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत सिब्बल म्हणाले, 'राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग पुन्हा एकदा 'वेगळ्या पद्धतीने' सर्वोच्च न्यायालयात आणून त्याची चाचपणी केली जाऊ शकते, अशी परिस्थिती निर्माण करण्याचा ते (सरकार) सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत.' उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या अलीकडील टिप्पणीनंतर सिब्बल यांची ही प्रतिक्रिया आली आहे. धनखड यांनी एनजेएसी रद्द करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर नुकतीच टीका केली होती. धनखड यांनी केशवानंद भारती खटल्यातील १९७३च्या ऐतिहासिक निकालावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते; तसेच 'या निकालाने चुकीच्या उदाहरणाचा पायंडा पाडला असून, संसद संविधानात सुधारणा करू शकते; पण त्याची मूलभूत रचना बदलू शकत नाही, या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाशी आपण असहमत आहोत,' असेही ते म्हणाले होते. सर्वोच्च न्यायालयाने सन २०१५मध्ये एनजेएसी कायदा असंवैधानिक असल्याचे सांगत रद्द केला होता. विशेष म्हणजे, सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांच्या न्यायाधीशांच्या नियुक्तीची कॉलेजियम प्रणाली बदलण्याचा या कायद्याचा उद्देश होता.



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

# बालमजुरी व कौशल्य विकास

आधुनिक केसरी

**माननीय उच्च न्यायालय केरळ यांनी नुकताच बालमजुरीच्या विरोधात एक निर्णय सुनावलेला आहे. एक वस्तू उत्पादन करणारा कारागीर त्याच्या वस्तूंची विक्री करण्याकरता त्याच्या अल्पवयीन मुलाला बाजारात ठेवत होता. त्याबद्दल त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला व केस उभी राहिली. त्यामध्ये सरकारी पक्षाने असा युक्तिवाद केला की बालमजुरी कायद्याच्या अंतर्गत अल्पवयीन बालकांना तुम्ही व्यवसायासाठी वापरू शकत नाही. त्या विरुद्ध निकाल सुनावताना मा.केरळ उच्च न्यायालय यांनी निर्णय दिला की वडिलांच्या कामात मदत करणे म्हणजे बालमजुरी नाही.**

आपल्या देशामध्ये असलेली गरिबी बघता लाखो ठिकाणी असे व्हायचे की घरातील प्रत्येकानेच कमविले पाहिजे तरच घर चालू शकेल. त्यामुळे आई वडील तर कामाला जायचे पण छोट्या मुलांना सुद्धा कामाला पाठविले जायचे. त्यामुळे शिक्षण घेण्याच्या वयामध्ये त्यांची शाळा सुटायची व ते इच्छा असूनही शालेय शिक्षण पूर्ण करू शकत नव्हते. त्या विरोधात बालमजुरीचा कायदा अस्तित्वात आला. हा कायदा म्हणतो की 14 वर्षाखालील मुलांना तुम्ही त्यामध्ये निर्देशित काही उद्योगांमध्ये किंवा जोखमीच्या कामांच्या ठिकाणी लहान मुलांना वापरू शकत नाही. कायदा त्या ठिकाणी बरोबरच आहे. कारण शालेय शिक्षण घेण्याच्या वयामध्ये जर मुलांना घरच्या जबाबदाऱ्या पेलण्यास लावल्या व त्यांना पैसा कमविण्यासाठी बाहेर पाठविण्यात आले तर त्यांचे शालेय शिक्षण कायमचे खुंटते. असे लाखो लहान मुलं आहेत जी आजही शालेय शिक्षणापासून वंचित आहेत.आजपर्यंत देशातील यास अशिक्षेचा फायदा राजकीय लोकांनी करून घेतलेला आहे. शिक्षणापासून दूर असलेल्या वर्गाला राष्ट्रीय हिताच्या भूमिका लक्षात येत नाही व अशांची राजकीय पक्ष आपल्या सोयीप्रमाणे फसवणूक करू शकतात व त्यांच्या मतांच्या आधारावर निवडून येऊ शकतात. त्यामुळे समाजाचे शिक्षणाच्या प्रवाहात येणे अतिशय आवश्यक आहे. येणाऱ्या शतकातला भारत हा विकसित भारत असायला हवा, महाशक्ती असायला हवा यासाठी सर्वसामान्य समाज शिक्षित होणे हे प्राथमिक ध्येय आहे व असायलाच हवे. परंतु आपल्या देशामध्ये असे अनेक उद्योगधंदे व रोजगार आहेत की ज्यामध्ये आई वडील व घरातील मुले सुद्धा काम करतात. त्याच वेळेला त्यांना तो व्यवसाय करणे परवडते .कारण आजची स्पर्धा ही जागतिकीकरणामुळे स्वस्त वस्तू बाजारात विकण्याची स्पर्धा आहे. तुमचा माल कितीही चांगला असला तरी सुद्धा जर तो महाग असेल तर विकण्यासाठी अडचणी येणारच. ज्यांचा ब्रँड बाजारात तयार झालेला आहे, ज्यांचे नाव तयार झालेले आहे त्यांच्या वस्तू महाग असेल तर कदाचित लोक घेतीलही परंतु सर्वसामान्य कारागीर यांनी बनवलेल्या वस्तू या जर महाग असायला लागल्या तर त्या खपण्यामध्ये अडचणी निश्चितपणे येतील आणि जर स्वस्त भावात विकायच्या म्हटल्या तर त्याचा उत्पादन खर्च कमी राहणे खूपच गरजेचे आहे. यासाठी बाहेरचा कामगार कामावर ठेवणे हे त्या माणसाला परवडत नाही आणि म्हणून घरातल्या सर्वांनी त्या व्यवसायामध्ये आपला सहभाग नोंदविणे आवश्यक असते. अशा प्रकरणांमध्ये घरातील लहान मुले



ही आई-वडिलांना मदत करतात. त्यांच्या जीवाच्या मानाने जेवढी शक्य असेल तेवढी मदत ते करतात. आपल्या देशामध्ये बारा बलुतेदार पद्धती होती. यामध्ये लोहार, सुतार, गवंडी, चांभार असे विविध बलुतेदार होते. लहानपणापासून मुलगा वडिलांना घरी काम करताना पहायचा. लोहाराचा मुलगा चांगला लोहार बनायचा, सुताराचा मुलगा चांगला सुतार बनायचा व गवंडी काम करणाऱ्या चा मुलगा गवंडी काम करायला लागायचा. याला कारण असे होते की लहानपणापासून ते आपल्या वडिलांना काम करताना बघायचे. त्या कामांमध्ये शक्य ती मदत करायची करता करता ते काम करू लागायचे. यामुळे वडिलांकडे असलेले कौशल्य हे मुलांमध्ये संक्रमित व्हायचे. त्यामुळे गावोगावी कौशल्य युक्त कारागीर उपलब्ध होते. कौशल्य संक्रमित करण्याची ही आमच्या देशाची हजारो वर्षांची परंपरा होती. आज भारत सरकार कौशल्य विकास यासाठी अब्जो रुपये खर्च करीत आहे. लोकांना वेगवेगळे कौशल्य आले पाहिजे यासाठी भर देत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या भाषणांमध्ये अनेक वेळा सांगतात की मी एकाला विचार की तुला काय येते तर तो म्हणाला की मी ग्रॅज्युएट आहे. मी त्याला पुन्हा विचारले की तुला काय येते तर तो म्हणाला मी ग्रॅज्युएट आहे. मोदीजी आपल्या भाषणात सांगतात की तुम्ही काय शिकले आहात यावरून तुम्हाला काय येते हे आजकालच्या जगात सांगता येत नाही. जर तुम्हाला नोकरी करायची असेल किंवा स्वतःचा व्यवसाय करायचा असेल तर तुमच्याजवळ कुठले ना कुठले कौशल्य असणे आवश्यक आहे. अनेक लोक डिग्री एका वेगळ्या विषयाची घेतात व नोकरी ही दुसरी करतात.बरेचदा घेतलेल्या शिक्षणाचा व नोकरी मधल्या कामाचा काहीही संबंध नसतो. अनेक वेळा शिक्षणाला अनुसरून नोकरी असली तरी सुद्धा शिक्षण घेतलेल्या विषयापेक्षा व्यक्तीच्या अंगात असलेल्या कौशल्यांचा उपयोग नोकरी चांगल्या प्रकारे करण्यामध्ये होत असतो. यावरून आपल्या असे लक्षात येईल की नोकरी अथवा व्यवसाय काहीही करायचे असले तरी तुमच्यामध्ये कौशल्य असणे आवश्यक आहे. जगामध्ये अनेक ठिकाणी व्यक्तीला स्वावलंबी व स्वयंपूर्ण बनविण्यासाठी त्याला शालेय शिक्षणामध्येच सुतार काम, गवंडी काम, इलेक्ट्रिकचे काम, प्लंबिंग म्हणजे नळ काम इत्यादी गोष्टी शिकविल्या जातात. याचा उद्देश हाच आहे की व्यक्ती स्वयंपूर्ण झाली पाहिजे. विदेशात अशा सेवांसाठी जर तुम्ही माणूस बोलावतो म्हटलं तर तो अत्यंत खर्चिक असतो. सर्वसामान्य माणूस एखाद्याला आपल्या घरी अशा कामांसाठी बोलवू सुद्धा शकत नाही. त्यामुळे शालेय शिक्षणामध्येच त्यांना अशा गोष्टी शिकविल्या जातात की जेणेकरून व्यक्ती स्वतःचे काम स्वतः करू शकला पाहिजे. आपल्या देशातली बारा बलुतेदार पद्धती यामध्ये कौशल्य विकास हा घराघरातूनच व्हायचा. त्यामुळे मोठा झाल्यावर तू काय करणार हा प्रश्न मुलाच्या समोर उभा राहत नव्हता .त्याच्या गावाची जी गरज होती ती पहिले वडील गवंडी म्हणून ती गरज पूर्ण करायचे त्यानंतर मुलगा गवंडी म्हणून ती गरज पूर्ण करीत राहायचा. याचा अर्थ हा नाही की सुताराच्या मुलांनी सुतारच झाले पाहिजे. जर त्याच्या अंगात कौशल्य असेल, गुण असेल, हुशारी असेल तर तो त्या व्यतिरिक्त ही इतर व्यवसाय निवडू शकतो. परंतु आज जगात सर्वत्र स्पर्धा निर्माण झालेली आहे. अशा परिस्थितीत एका नोकरीसाठी हजारो अर्ज आलेले असतात. अशा स्पर्धेच्या युगामध्ये खेड्यापाड्यातला मुलगा हा बरेचदा टिकत नाही. त्यामुळे तो शिक्षण तर घेतो पण त्याला नोकरी मिळू शकत नाही व त्याचा परंपरागत रोजगार करण्याचे कसब त्याच्या अंगात नसल्यामुळे व त्याची त्याला लाज वाटत असल्यामुळे तो तेही करू शकत नाही. थोडक्यात काय ?शिक्षण घेतल्यामुळे त्याला नोकरी तर मिळत नाहीत पण त्याचे परंपरागत कामही तो करण्यास सक्षम राहत नाही. अशा चक्रव्युहात आपण सर्व सापडलेले आहोत. भारत हा 130 कोटींचा देश आहे. काही काळातच आपण दीडशे कोटीचे होऊ. अशा परिस्थितीमध्ये प्रत्येक हाताला काम देणे हे सरकार साठी सुद्धा फार मोठे जीकरीचे कार्य होऊन बसेल.

या दृष्टिकोनातून माननीय उच्च न्यायालय केरळ यांनी दिलेला निर्णयाकडे बघितले पाहिजे. वडिलांच्या कामात मदत करणे म्हणजे बालमजुरी नव्हे. परंतु बालमजुरी असणे व नसणे यातील सीमारेषा अतिशय स्पष्ट असायला हव्या कारण शालेय शिक्षण हेही आवश्यक आहे व कौशल्य विकास हा सुद्धा आवश्यक आहे. सुतार कामाचे कौशल्य मिळालेले आहे ती व्यक्ती शिक्षित असेल तर सुतार कामांमध्ये आधुनिक मशिनरी आणून त्याचा उपयोग आपल्या व्यवसाय वाढीसाठी व वस्तूंच्या विक्रीसाठी सुद्धा करू शकेल. हे सर्वच व्यवसायांच्या बाबतीत लागू आहे. कायद्याच्या मर्यादा या सुस्पष्ट असाव्यात. कायदे लोकांना पालन करण्यासाठी सुद्धा योग्य असावेत. जेणेकरून बाल मजुरी सुद्धा होणार नाही व कौशल्य विकासही थांबणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

# चिंताजनक विमान दुर्घटना

आधुनिक केसरी

**ऐन संक्रातीच्या दिवशी नेपाळमध्ये एक मोठी दुर्घटना घडली. नेपाळमधील प्रमुख शहारांपैकी एक असलेल्या पोखर या शहराजवळ एक प्रवाशी विमान कोसळून झालेल्या अपघातात ६० हुन अधिक प्रवाशांचा दुःखद अंत झाला. यती एअर लाईन्स च्या या विमानात नेपाळचे ५३, भारताचे ५, रशियाचे ४, कोरियाचे २ आयर्लंड, अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, फ्रांसचे प्रत्येकी १ असे एकूण ७२ प्रवाशी होते. आतापर्यंत ६० हुन अधिक प्रवासी मृत्यमुखी पडल्याची पुष्टी झाली आहे.**

अपघाताची भीषणता पाहता मृत्यूचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. या अपघातात जगभरातील प्रवासी असल्याने या अपघाताने जगभर शोककळा पसरली आहे. विमानाचा ब्लॅक बॉक्स मिळाल्यानंतरच या अपघाताचे खरे कारण समोर येईल असे असले तरी खराब हवामानामुळे हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. खरे तर उड्डाणापूर्वी प्रत्येक वैमानिकाला हवामानाचा अंदाज सांगितला जातो. या आधारावर तो आपली रणनीती ठरवतो.

वातावरणाची दृष्यमानता कमी असेल तर वैमानिक उड्डाण करत नाहीत. अर्थात पर्वतीय भागात दृष्यमानता कमी असतेच. डोंगराची कमी, जास्त उंची असल्याने आणि सतत बदलणारे हवामान, धुके यामुळे अपघात होण्याची शक्यता असते मात्र अलीकडे अद्ययावत संगणक प्रणाली असल्याने विमान किती उंचावरून जात आहे हवामानात काय बदल घडत आहे याचा अंदाज वैमानिकांना येतच असतो तरीही काही वैमानिक अतिआत्मविश्वासाने विमान उड्डाण करतात. हवामानाची पर्वा न करता स्वतःसह प्रवाशांचा जीव धोक्यात घालतात. या अपघातात हेच कारण आहे की आणखी काही दुसरे कारण आहे हे चौकशीत समोर येईलच पण ज्या प्रवाशांचा यात जीव गेला आहे तो मात्र परत येणार नाही. अलीकडे विमान अपघातांचे प्रमाण वाढले आहे. नेपाळमध्ये हे प्रमाण इतर देशांच्या तुलनेत अधिकच आहे. गेल्या दहा वर्षात नेपाळमध्येच सर्वाधिक विमान अपघात झाले आहेत त्यामुळे नेपाळच्या विमान वाहतूक सेवेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नेपाळमध्येच नाही तर जगभर विमान अपघातांची संख्या चिंताजनकच आहे. भारततही अलीकडे विमानात बिघाड झाल्याच्या घटना वाढल्या आहेत. काही दिवसांपूर्वी दिल्लीवरून बंगळुरुला जाणारे विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले होते. वैमानिकाने यशस्वी लँडिंग केल्याने सुदैवाने अपघात टळला. विमान उड्डाण करत असताना विमानातून ठिणग्या उडत असल्याचे वैमानिकाच्या लक्षात आल्याने विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले. काल देखील मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री शिवराजसिंग चौहान यांच्या विमानाचे असेच इमर्जन्सी लँडिंग करावे लागले. विमानाने वेळेत लँडिंग केल्याने पुढील अनर्थ टळला अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती. आपल्या देशात तर अनेक राजकीय आणि महनीय व्यक्ती विमान अपघातात गेले आहेत. संजय गांधी, माधवराव सिंधिया, जी एम सी बालयोगी हे त्यातील काही महत्वाची नावे आहेत. मागील वर्षी भारताचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ ( सिडीएस ) जनरल बिपीन रावत यांचे एका हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. विमान अपघातात अशा मोठ्या व्यक्तींचे निधन होणे ही देशाची मोठी हानी आहे. केवळ मोठे सिलिब्रेटीच नव्हे तर सर्वसामान्य प्रवाशांचा जीव देखील तितकाच महत्वाचा आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीय नागरिकांसाठी तर विमान प्रवास हे स्वप्न असते आणि जर असे अपघात झाले तर त्या स्वप्नांचीच नव्हे तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचीच राखरांगोळी होते त्यामुळे असे अपघात होणार नाही याची काळजी संबंधित यंत्रणेने घ्यायला हवी.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# विकास पुरुष गडकरींना धमकी



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**गडकरी यांना धमकी देणाऱ्या कर्नाटकातील बेळगावच्या कारागृहातील कैद्याचा ताबडतोब सोक्षमोक्ष लावणे अत्यंत गरजेचे आहे. कारण दिनांक 14 जानेवारी 2023 ला गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यालयात सकाळी 11.25 च्या सुमारास पहिला कॉल आला, दुसरा कॉल 11.45 ला आला आणि तिसरा कॉल 12.30 ला आला अशे तीन फोन धमकी देणाऱ्या व्यक्तीने केल्याचे सांगितले जाते. यात धमकी देणारा व्यक्ती म्हणाला "मी दाऊद टोळीचा सदस्य बोलतो आहे, 100 कोटींची खंडणी द्या अन्यथा नितीन गडकरी यांना बॉम्बस्फोटात उडवुनी देऊ" असा धमकी देणारा फोन गडकरी यांच्या खामला येथील जनसंपर्क कार्यालयात शनिवारी सकाळी आला. अशाप्रकारे एका तासात धमकीचे तीन फोन आलेत.**

यानंतर संपूर्ण सुरक्षा यंत्रणां सतर्क झाली व काही तासांतच या घटनेचा छडा लावला. यावरून लक्षात येते की धमकीचे फोन म्हणजेच विकास कामात अडथळा निर्माण करणारा व्यक्ती असल्याचे स्पष्ट दिसून येते. जो व्यक्ती देशाचाच नाही तर संपूर्ण जगाच्या विकासात हातभार लावत आहे अशा व्यक्तिंना जर कोणी मारण्याची धमकी किंवा खंडणीची मागणी करीत असेल तर त्याला जिवंत रहाण्याचा यत्किंचितही अधिकार नाही. या धमकीमध्ये दाऊदचा हात असेलच यात दुमत नाही.परंतु आतंकवादी संघटना व भारत विरोधी गतीविधी चालविणाऱ्या देशांचा सुध्दा हात राहु शकतो याला नाकारताही येत नाही. ही बाब सविस्तर चौकशी दरम्यान अवश्य लक्षात येईल.धमकी देणारा व्यक्ती हा बेळगावच्या कारागृहातील कैदी असल्याचे सांगितले जाते.त्याच्यावर खुनाचे आरोप असल्याचे सुध्दा सांगितले जाते.त्याचबरोबर 2016 मध्ये हा कैदी जेल तोंडुन पळुन गेला होता.शिवाय त्याने जेलमधूनच अशाच पध्दतीचे अनेक वेळा पूर्वीही मोठे अधिकारी आणि इतरांना धमकीचे फोन केल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे.म्हणजे धमकी देणारा कैदी हा



अट्टल गुन्हेगार असल्याचे स्पष्ट होते.कारण जो व्यक्ती कैदी आहे त्याच्या जवळ फोन आलाच कोठुन असा संशय सर्वांच्याच मनात भेडसावत आहे.त्यामुळे धमकीचे जाळे मोठे सुध्दा राहु शकते याला नाकारता येत नाही ही बाब सुध्दा सविस्तर चौकशी दरम्यान अवश्य लक्षात येईल.त्यामुळे धमकी देणाऱ्या व्यक्तीची कसुन चौकशी करून जे काही धमकीचे जाळे विणले असेल ते जाळे तोंडुन एकाएकाला यमलोक पोहचविले पाहिजे. कारण केंद्रीय मंत्री श्री नितीनजी गडकरी यांना जिवे मारण्याची धमकी म्हणजे देशातील सुरू असलेला विकास संपवीण्याची धमकी असल्याचे मी समजतो.

नागपूर हे शांततेचे प्रतिक आहे.त्यामुळेच सर्वच धर्मांचे लोक एकोप्याने राहतात.त्यामुळे महाराष्ट्रातील बच्चा-बच्चा गडकरीशी चांगल्या प्रकारे वाकीब आहे. त्याचबरोबर संपूर्ण राजकीय पुढारी व पक्ष, संपूर्ण धर्माचे लोक, सामाजिक संघटना आणि महाराष्ट्रासह संपूर्ण भारताची जनता चांगल्याप्रकारे गडकरींना जाणते.त्यामुळे गडकरींना धमकी म्हणजे संपूर्ण देशाला धमकी आहे. धमकी देणाऱ्या कैद्यावर मृत्यूदंडाची कारवाई लवकरात लवकर व्हायला हवी.कारण गडकरींना मिळालेली धमकी कोणीही सहन करणार नाही.गडकरींना मारण्याची धमकी मिळताच सुरक्षा यंत्रणां सतर्क झाली व ताबडतोब धमकी देणाऱ्या व्यक्तीला शोधून काढले.त्यामुळे भारतीय सुरक्षा यंत्रणां किती सजग आहे हे गडकरी यांना मिळालेल्या धमकी वरून आपण समजू शकतो.आता तो काळ गेला.आता अत्याधुनिक युग आहे यात भारतीय सुरक्षा यंत्रणां सजग आहे हे आपण अनेकदा पहाले आहे आणि आता गडकरी यांना जिवे मारण्याची धमकी मिळताच काही तासांतच धमकी देणाऱ्या व्यक्तीचा छडा लावला ही भारतीय सुरक्षा यंत्रणेची अत्यंत मोलाची कामगिरी आहे याकरीता भारतीय सुरक्षा यंत्रणेला माझा सलाम.कारण देशाचा वेगवान विकास जगातील काही देशांना पचत किंवा पहावत नाही त्यामुळे असे घृनित कृत्य कोणत्या ना कोणत्या मार्गाने करण्याचे काम विदेशी यंत्रणा सुध्दा करू शकते याला सुध्दा नाकारता येत नाही. परंतु भारतीय सुरक्षा यंत्रणां सर्वांवर भारी पडत आहे हे गडकरी यांना दिलेल्या धमकीच्या दरम्यान लक्षात येते. गडकरींना धमकी देणाऱ्या कैद्याचे हात कितीही लंबे असले तरी त्यांचे हात छाटण्याची तलवार भारतीय सुरक्षा यंत्रणेजवळ आहे. गडकरी हे विकास योध्दा आहेत. त्यामुळे धमकी देणाऱ्यांना त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याकरिता शंभर वेळा विचार करावा लागेल.

# विज्ञानाच्या रंजक गोष्टी



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**विज्ञान हा विषय सहज सगळ्यांना आवडेल असे नाही. पुस्तकातील सिद्धांत, आकृत्या पाहून टेंशन येतेच हो ना.. पण याच विज्ञानाशी गट्टी जमली तर ? होय अशाच एका पुस्तकाची मी तुम्हाला ओळख करून देणार आहे. शालेय अभ्यासक्रमात विज्ञान हा विषय आपण अभ्यासलेला आहे. पण काहीना हा विषय भावतो तर काहीना नाही. सहज , साध्या शब्दरचना असलेले लेखन वाचण्याकडे मुलांचा कल असतो आणि विज्ञान म्हटले की , ठरावीक भाषाशैली, सिद्धांत, नियम आणि प्रयोग मांडणी आली. यामुळे सहसा कोणी वैज्ञानिक पुस्तके वाचत नाही.**

हा दृष्टिकोन बदलण्यासाठी आणि विज्ञान या विषयांबद्दल आवड आणि गोडी निर्माण व्हावी यासाठी लेखक आनंद घैसास यांनी 'खेळ खेळूया विज्ञानाचे' हे पुस्तक लिहिले आहे.

विज्ञान हा विषय रंजकपणे मांडणारे हे पुस्तक आहे. मनोविकास प्रकाशनाने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. पुस्तक हातात आल्यावर पहिले लक्ष जाते ते मुखपृष्ठाकडे. पुस्तकाचे मुखपृष्ठ गिरीश सहस्त्रबुद्धे यांनी रेखाटले आहे. मुलांना आकर्षून घेणारे हे मुखपृष्ठ असल्याने आपसुक मुलांच्या मनात पुस्तकाविषयी कुतूहल निर्माण होते. विज्ञान हा विषय अत्यंत सोप्या पध्दतीने लेखकाने विशद केलेला आहे. लेखकाने पुस्तकाच्या शीर्षकातच 'खेळ खेळूया विज्ञानाचे' असे म्हणत मुलांना आश्वस्त केलेले आहे. जेणेकरुन पुस्तक हातात घेऊन वाचण्याची उर्मी निर्माण होईल.

रोजच्या जीवनातील अगदी साध्या- साध्या गोष्टी किंवा क्रिया घडण्यामागे नेमके कोणते शास्त्रीय कारण असते, ते अगदी ओघवत्या शैलीत , मुलांना रुचेल अशा लेखनशैलीत मांडलेले आहे. जणू लेखक या पुस्तकाच्या माध्यमातून मुलांशी संवाद साधत आहेत. सोबतच दिलेली रेखाचित्रे प्रत्येक प्रकरण समजण्यास साहाय्य्य करते.विज्ञानाच्या गमतीजमती गोष्टीरुपात सोप्या पद्धतीने सांगितल्या आहेत.तसेच प्रत्येक प्रकरणाचे शीर्षकही लक्षवेधी आहेत.

या पुस्तकाला निवृत्त ज्येष्ठ वैज्ञानिक पद्मभूषण प्रा. भा. मा. उदगावकर यांनी प्रस्तावना लिहिली आहे. त्यात ते म्हणतात, "विज्ञानाची गोडी वाढावी, वैज्ञानिक संकल्पना रोजच्या जीवनाशी कशा निगडित आहेत ते कळावं , तसेच विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष हातानं कृती करावी, त्यासाठी स्वतःचं खेळाचं साहित्य जमा करावं आणि खेळ खेळता खेळता त्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळावा अशी अपेक्षा या खेळांमध्ये आहे.खेळामध्ये धक्कादायक आणि मजेदार अशा दोन तंत्रांचं सातत्यानं भान राखत, खेळ कसा खेळायचा तेवढेच सांगितले आहे.मजेदार गोष्टी, अवांतर माहिती मुद्दाम अंतर्भूत करून आपल्या सभोवतालच्या अनेक गोष्टींकडे लक्ष वेधण्याचाही प्रयत्न आहे.





रोजच्या दैनंदिन कामात आपण कितीतरी खेळ खेळतो, अनेक क्रिया करतो पण त्यामागचे शास्त्रीय कारण माहीत नसते, तेच या पुस्तकात दिले आहेत. विज्ञानाचे वेगवेगळे प्रयोग पाहून आपल्याला ती जादूची दुनिया वाटते पण त्या छोट्या छोट्या क्रिया - प्रतिक्रिया, खेळ यामागील गमती आणि महत्त्व या पुस्तकातून समजते. हे पुस्तक वाचल्यानंतर विज्ञानाविषयी वाटणारी भीती कमी तर होतेच सोबतच सोप्या पद्धतीने उलगडलेल्या विज्ञानाविषयी मनात गोडी निर्माण होते . मनोरंजन करता करता विज्ञान हा विषय किती सहज सोपा करून दाखवला आहे. विज्ञान हा विषय रुक्ष वाटत असला तरी या पुस्तकात लेखकाची विषय मांडणी योग्य आणि आकर्षक असल्याने आपसुक मुले पुस्तक वाचण्यास प्रवृत्त होतात. मुलांच्या वैचारिक क्षमता, आकलनशक्ती, त्यांची आवड लक्षात घेऊन या पुस्तकाची रचना केलेली आहे.

मलपृष्ठावर वैज्ञानिक व्यं. गो. गंभीर यांनी पुस्तकाविषयी असे म्हटले आहे, की "खेळ- गोष्टी- कोड़ी आणि नित्यपरिचित दैनंदिन अनुभव यांसारख्या हुकमी आकर्षक मनोरंजनातून होणारा प्रारंभ आणि त्यातून वाचकांची जाण, संवेदनशीलता आणि कौशल्यविकास याकडे त्वरेने घेतलेली झेप, हे या पुस्तकाचे वैशिष्टय आहे."

हसत - खेळत विज्ञान शिकण्यासाठी ' खेळ खेळूया विज्ञानाचे' पुस्तक सगळ्यांनी वाचायला हवे. वैचारिक खाद्य पुरवणारे आणि मनोरंजनातून ज्ञान देणारे पुस्तक आपल्या ठेवणीत असायला हवे!

**( खेळ खेळूया विज्ञानाचे / लेखक आनंद घैसास / प्रकाशकः मनोविकास प्रकाशन / मूल्य : ८० रुपये )**

# पाकिस्तान उपासमारीच्या उंबरठ्यावर



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**भारताला अणुबॉम्बच्या धमक्या देणाऱ्या मोठ्या तोंडाचा शेजारी पाकिस्तानची आर्थिक परिस्थिती बिकट होत चालली आहे. पाकिस्तानमधील आर्थिक संकट हळूहळू गडद होत आहे. देशात उपासमारीची परिस्थिती निर्माण झाली आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. देशातील लोकांची क्रयशक्ती हळूहळू कमी होत आहे. खाद्यपदार्थांपासून ते इंधनापर्यंत दैनंदिन वस्तूंच्या किमती प्रचंड वाढत आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत पाकिस्तानमधील साप्ताहिक चलनवाढीचा दर ३० टक्क्यांहून अधिक वाढला आहे. देशातील परकीय चलनाच्या साठ्याच्या वाढत्या तुटवड्यामुळे, सामान्य पाकिस्तानी आता जीवनावश्यक वस्तूही खरेदी करू शकत नाहीत. लोकांची क्रयशक्ती सातत्याने कमी होत आहे.**

खाद्यपदार्थांच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. भूक भागवण्यासाठी लोक मृत्यूला सामोरे जात आहेत. अलीकडेच पीठ खरेदीसाठी एवढी चेंगराचेंगरी झाली की चार जणांचा मृत्यू झाला. बिझनेस स्टँडर्डच्या अहवालानुसार, पाकिस्तानचा CPI म्हणजेच ग्राहक किंमत निर्देशांक 24.5 टक्क्यांच्या पुढे गेला आहे. महागाईच्या वणव्याने जनता हतबल झाली आहे. पाकिस्तानचा गव्हाचा साठा संपण्याच्या मार्गावर आहे. खैबर पख्तुनख्वा, सिंध आणि बलुचिस्तान प्रांतात पिठासाठी ओरड सुरू आहे. पिठासाठी एवढी चेंगराचेंगरी झाली की चार जणांचा मृत्यू झाला. परिस्थिती अशी पोहोचली आहे की वीज आणि पेट्रोलियम पदार्थांची बचत करण्यासाठी सरकारने बाजार लवकर बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. २०२० मध्ये जी परिस्थिती श्रीलंकेत दिसली, तीच परिस्थिती आता पाकिस्तानमध्येही पाहायला मिळत आहे. पाकिस्तानमध्ये जीवनावश्यक खाद्यपदार्थांच्या किमतीत ५५.९३ टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे. मागणी आणि पुरवठ्यातील तुटवड्यामुळे ही परिस्थिती आहे. गेल्या वर्षभरात कांद्याचे भाव ४१५ टक्क्यांनी वाढले आहेत. त्याचबरोबर गेल्या वर्षीच्या तुलनेत चहा ६४ टक्के आणि गहू ५८ टक्क्यांनी महागला आहे. डिसेंबर महिन्यात महागाईचा दर २४.५ टक्क्यांवर पोहोचला आहे. पाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांनीही देश कठीण परिस्थितीतून जात असल्याचे मान्य केले आहे. पेट्रोल-डिझेल, खाद्यपदार्थ, स्वयंपाकाचा गॅस, वीज यांचाही तुटवडा निर्माण झाला आहे. देशात महागाई गगनाला भिडत आहे. पाकिस्तान सांख्यिकी ब्युरोने सोमवारी जारी केलेल्या अहवालानुसार, डिसेंबर २०२२ मध्ये देशातील CPI-आधारित महागाई दर २४.३टक्क्यांवर पोहोचला आहे. वर्षभरापूर्वी याच कालावधीत तो १२.३ टक्के होता. अहवालानुसार, बहुतांश जीवनावश्यक वस्तू सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, चलनवाढीचा दर अर्थ मंत्रालयाच्या २१ ते २३ टक्क्यांच्या लक्ष्यापेक्षा जास्त आहे.

खाद्यपदार्थांच्या किमतीत ५६ टक्के वाढ

डिसेंबर महिन्यातच खाद्यपदार्थ दीडपटीने महागले आहेत . जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत ५५.९३ टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे. मागणी आणि पुरवठ्यातील तुटवड्यामुळे ही परिस्थिती आहे. गेल्या वर्षभरात कांद्याचे भाव ४१५ टक्क्यांनी वाढले आहेत. त्याचबरोबर गेल्या वर्षीच्या तुलनेत चहा



६४ टक्के आणि गहू ५८ टक्क्यांनी महागला आहे. तूप आणि खाद्यतेलाच्या दरात ३२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तर दूध आणि तांदूळ अनुक्रमे २६ टक्के आणि ४७ टक्क्यांनी महागले आहेत. चिकन ६५० ते ७००रुपये किलोवर पोहोचले पाकिस्तानमधील चलनवाढीचा फटका अल्कोहोलयुक्त पेये आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या किमतींवरही बसला आहे, जे जवळपास ३५ टक्क्यांनी महागले आहेत. तर कपडे आणि पादत्राणांच्या किमती १७.२२ टक्क्यांनी वाढल्या आहेत. आपल्या धर्मांध शेजारी देशात परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की पाकिस्तानमध्ये कोंबडीची विक्री ६५०-७०० रुपये किलोपर्यंत सुरू झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, अशीच स्थिती राहिल्यास येत्या काही दिवसांत ते ८०० रुपये किलोपर्यंत पोहोचू शकते. स्वयंपाकाचा गॅस सिलेंडर १०हजार रुपयांना उपलब्ध आहे. एलपीजी गॅसबद्दल बोलायचे तर व्यावसायिक गॅस सिलेंडर १०००० पाकिस्तानी रुपयांना उपलब्ध आहे. बळजबरीने लोक धोका पत्करून प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये गॅस भरून वापरत आहेत. त्यामुळे दररोज मोठ्या प्रमाणात अपघात होऊन लोक जखमी होत आहेत. कृपया सांगा की ही परिस्थिती त्याच पाकिस्तानची आहे जिथे राजकारणी दाखवण्यासाठी भारताला अणुबॉम्बच्या धमक्या देत राहतात. आता परिस्थिती अशी आहे की त्या नेत्यांना आपल्या देशातील जनतेला अन्नधान्य नीट पुरवता येत नाही.

विजेची बचत करण्यासाठी बाजारपेठा आणि विवाह हॉल लवकर बंद करण्याचे आदेश

रोखीने त्रस्त असलेल्या पाकिस्तानने ऊर्जेच्या वापरावर अंकुश ठेवण्यासाठी बाजार आणि विवाह हॉल लवकर बंद करण्याची घोषणा केली. विजेचा वापर रोखण्यासाठी आणि आयात तेलावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन योजनेला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ म्हणाले, "बाजार रात्री ८.३० वाजता बंद होतील, तर विवाह हॉल रात्री १०.००वाजता बंद होतील, यामुळे आमचे ६० अब्ज रुपयांची बचत होईल

बल्ब आणि पंख्यांचे उत्पादनही बंद होईल

१ फेब्रुवारीपासून जास्त वीज वापर असलेल्या बल्बचे उत्पादन बंद केले जाणार आहे.जुलै महिन्यापासून अधिक वीजवापर असलेल्या पंख्यांची निर्मितीही बंद करण्यात येणार आहे. या उपाययोजनांमुळे २२ अब्ज रुपयांची आणखी बचत होईल,असे पाकिस्तानचे म्हणणे आहे.

# रेल्वे प्रशासनाने सक्षम यंत्रणा उभी करणे गरजेचे !

आधुनिक केसरी

सर्वसामान्यांना परवडेल असा आणि सुरक्षित प्रवास म्हणून रेल्वे प्रवासाकडे पाहिले जाते मात्र सद्या या प्रवासाला गालबोट लागल्याचे दिसून येत आहे विशेषतः फर्स्ट क्लास आणि महिलांच्या डब्यात घुसखोर मोठ्या प्रमाणात असल्याचे अनेक वेळा दिसून आले आहे मात्र याकडे रेल्वे प्रशासन दुर्लक्ष करत आहे लोकल रेल्वेला महिलांची लक्षणीय गर्दी दिसून येत आहे त्यामुळे वादावादीचे प्रसंग निर्माण होवून त्याचे पर्यवसन हाणामारीत झाल्याचे देखील समोर आले आहे तसेच या गर्दीचा फायदा घेत गर्दुल्ले पाकीटमार,यांचे महिला डब्यात होणारे अतिक्रमण नजरेआड करुन चालणार नाही मुंबईची लाईफलाईन असलेल्या लोकल ट्रेनने लाखो महिला प्रवास करत असतात. घड्याळाच्या काट्यावर मुंबईकरांचे आयुष्य सुरु असते. दरम्यान मुंबई उपनगरीय लोकलमध्ये महिलांसाठी बसण्याची पुरेशी आसन व्यवस्था नाही. यामुळे ऐन गर्दीच्या वेळी महिलांना दुरावस्थेचा सामना करावा लागतो. सकाळच्या वेळी तर मोठ्या प्रमाणात गर्दी असते. मुंबईची जान असलेल्या लोकल ट्रेनने प्रवास करणे महिलांसाठी खूप त्रासाचे आणि जिकिरीचे झाले आहे. त्यासाठी रेल्वे प्रशासनाने लोकल रेल्वेचे डबे वाढवून, सुरक्षेसासाठी सीसीटिव्ही कॅमेरे बसविणे गरजेचे आहे तसेच कोणत्या मार्गावर प्रवाशांची संख्या जास्त आहे. त्यामार्गावर लोकल ट्रेनच्या फेऱ्या वाढविणे आवश्यक असून विनातिकीट प्रवास करणाऱ्यांच्या मुसक्या आवळण्यासाठी सक्षम यंत्रणा उभी करणे महत्वाचे आहे तरचं रेल्वे प्रवास सुखकारक आणि सुरक्षित होईल.

**राजू जाधव मांगूर**
जि.बेळगांव

# तू दिलीस जखमेस बांधून वस्ती ठेवतो ती मी रोज सांभाळून दस्ती

आधुनिक केसरी

दस्ती हा नीलेश श्रीकृष्ण कवडे यांचा पहिलाच मराठी गझल संग्रह. पेशाने शिक्षक असलेल्या या गझलकाराने गझलेचे तंत्र आणि मंत्र चांगलेच अवगत केले आहे. या गझलसंग्रहात ८० गझल आहेत. एकेक गझल अस्सल वेदनेचा झंकार आहे. एका गझलेत ते म्हणतात की, भीक नाही दान द्या पाहून त्याला बैसला रस्त्यात जो पसरून दस्ती याच गझलेत ते म्हणतात की, तिने दस्ती हलवून मला वारा घातल्यावर गुलाबी (प्रेमाचा) मौसम सुरू झाल्यासारखे वाटते. एका गझलेत शेतकऱ्याचे भीषण दुःख ते मांडतात, पाहून हाती दोर भीती वाटते कुंकू घराचे टिकवता बाबा कैसे ही गझल त्या शेतकऱ्यावरच आहे. पीक सावकर छाटून नेतो, शेतकरी पुन्हा कर्ज घेतो , त्या व्याजात वावर कसा पिकवतो तो शेतकरी ही व्यथा येथे आहे. आईवरील गझल अशी आईवरील प्रेम व्यक्त करते. स्वर्ग रे म्हणतात ज्याला तो खरा पाहतो आई तुझ्या पदरात मी आईच्या पदरातच स्वर्गसुख आहे, याची ग्वाही गझलकार देतो. आई हाच ईश्वर किंवा आ म्हणजे आत्मा ई म्हणजे ईश्वर या म्हणीचा प्रत्यय या शेरात येतो मागता आले न मज जे मंदिरी मागतो आई तुझ्या पदरात मी
किती सार्थ शब्दात आईला त्यांनी प्रकट केले आहे. गरिबांचे दुःख आणि दारिद्र्य काही केल्या संपत नाही. त्याच्या झोपडीत विद्युत दिवे नाहीत. गरीबांचे कदील रॉकेलवर नाही तर अश्रूंवर जळतात, असे ते सांगतात. विकासाचे किंवा वाढत्या वस्त्यांचे दुःख ते किती आर्ततेने मांडतात ते या शेरात दिसते. वर्षभर झाली कटाईसर्व वृक्षांची जुन्या आमच्या शहरात यंदा फक्ती भिंती वाढल्या शहरात झाडे नाहीत तर फक्त बिल्डिंग वाढतात हे किती जिव्हारी लागणारे वाक्य आहे. भिंती वाढतात म्हणजे त्यासाठी गावातील झाडांची कत्तल केली जाते. माणसाला हृदय का असते तर ते फक्त प्रेमासाठीच नव्हे तर वेदनाही हृदयालाच होते, किती सहजपणे दुःखाची जाणीव ते करून देतात. कळ दुःखाची उरा लागली तिथे वेदना जरा विसावी असा अनुभव ते या शेरातून देतात. बेरोजगारी वाढण्याचे, राजकारणा अयोग्य माणसे येण्याचे, नको त्याला नोकरी का मिळते याचे कारण ते या शेरात देतात,
योग्य नव्हता तरी योग्यता वाढली
चार पैशामुळे पात्रता वाढली
समाजातील भ्रष्टाचाराचे दर्शन या शेरात घडते.
लोक मदत तर करीत नाहीतच पण फुकाचे सल्ले मात्र देतात हा अनुभव ते
वाटली होती मला आधार दुनिया..
पण निघाली फक्त सल्लागार दुनिया
ऐन संकटात कोण धावून येतो. फक्त सल्ला देणारेच भेटतात. रस्त्यात पाय घसरून पडलेल्याला सुद्धा मदतीचा हात देण्याऐवजी फक्त सल्लाच लोक देता. आर्थिक अडचणीतही हाच अनुभव येत असतो. हल्ली लोक जागरण खूप करतात. कारणे अनेक असतील सूर्य मावळला तरी नाही निजत ही
जागते चिंतेत हल्ली फार दुनिया .. मग लोक चिंतेत जागतील किंवा रात्रपाळीमुळेही.. मी म्हणतो रात्रपाळी रोज त्याची रोजचे जागणे लोक रात्री झोपल्यावर त्याचा दिवस राजकारण कुठे बदलले आहे. विंदा करंदीकर म्हणतात तसेच रोज रोज तेच तेच आहे. नेता बदलला पण आश्वासने तीच आहेत. दिशा नाही बदलली लोकशाहीची नवा नेता तरी भाषण जुने आहे.. एकंदरीत ८० गझलातून त्याने जीवनविषयक अनुभव व सत्य परखडपणे मांडले आहे. शिवाजी जवरे सरांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना व श्रीकृष्ण राऊत सरांची पाठराखण यातून नीलेशची गझल उलगडायला मदतच होते.




**दस्ती**
**नीलेश श्रीकृष्ण कवडे**
**पृष्ठे ९६, मूल्य १५०**
**प्रकाशक - संध्या राजेश बहाळे**
**पायगुण प्रकाशन अमरावती**
**प्रकाश रामचंद्र क्षीरसागर (९०११०८२२९९)**

# राष्ट्रपती दौपदी मुर्मू : खडतर जीवन प्रवास!

आधुनिक केसरी

**श्री विनोद श्रा. पंचभाई हे नाव मराठी साहित्य क्षेत्रात सर्वदूर पोहोचलेले असे नाव आहे. थोडं मनातलं, मुलांच्या मनातलं, "ती"च्या मनातलं, आपले राष्ट्रसंत मेवाडनरेश महाराणाप्रताप, हेच खरे जगज्जेते, आपले राष्ट्रपती डॉ.राजेंद्रप्रसाद ते रामनाथ कोविंद, आद्यक्रांतिगुरू लहुजी वस्ताद, हॉटेल हवेली रहस्यमय कादंबरी,ओळख भारतीय शास्त्रज्ञांची, भारतीय पंतप्रधान यासह एकदा जंगलात हा बालसंग्रह अशी वैविध्यपूर्ण अनेक पुस्तके पंचभाई यांच्या नावावर आहेत. जी वाचकप्रिय झाली आहेत. त्यांच्या या विलोभनीय अशा साहित्य अक्षरवेलीवर 'सामान्य शिक्षिका ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू' हे अत्यंत आकर्षक असे पुष्प फुलले आहे. हा ग्रंथ पुणे येथील दुर्वा एजन्सीज यांनी अत्यंत देखण्या आणि आकर्षक स्वरूपात प्रकाशित केला आहे.**

विनोद पंचभाई यांच्या लेखणीचे वैशिष्ट्य म्हणजे ते जसे बालकांसाठी लिहितात तसेच ते रहस्यमय भयकथा लिहिण्यात अग्रेसर आहेत. सोबतच चरित्र लेखन हा त्यांचा आवडता विषय आहे. रहस्यमय, भयकथा आणि चरित्र लेखन हे साहित्य प्रांगणातील विषय लेखनासाठी तसे कठीण असे आहेत. परंतु पंचभाई हे या क्षेत्रात अत्यंत प्रभावीपणे विहार करताना दिसतात. हे त्यांच्या लेखनाचे कौशल्य असले तरी त्यांचा त्या त्या विषयावर केलेला अभ्यास, चिंतन आणि मनन हे प्रत्येक ठिकाणी जाणवते. चरित्र लेखनाच्या बाबतीत कल्पनेपेक्षा वास्तवाला महत्त्व द्यावे लागते. कल्पनेची भरारी घेताना एखादा शब्दही इकडचा तिकडे होऊ देता येत नाही. कारण चरित्र नायकाला दैवत मानणारा, अशा श्रद्धेय व्यक्तिंवर श्रद्धा आणि भक्ती असणारा फार मोठा वर्ग असतो. परंतु ही तारेवरची कसरत लेखक नेहमीच लीलया करतात.

भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे चरित्र लेखन करताना लेखक विनोद पंचभाई यांनी फार सखोल अभ्यास केला असल्याचे जाणवते. अगदी मुर्मू यांचे बालपण, त्यांची शिक्षणासाठी झालेली ससेहोलपट, राजकारणातील प्रवेश, यश आणि चढउतार, संसारात उठलेली अनेक वादळं, त्यांनी केलेले सामाजिक कार्य आणि त्यांचा राष्ट्रपती पदापर्यंतचा प्रवास अत्यंत अभ्यासपूर्ण, साध्या, सरळ भाषेत साकारला आहे. हा प्रवास कुठेही कंटाळवाणा होत नाही, एकांगी होत नाही तर तो वाचनीय, उत्साहवर्धक, प्रसंगी डोळे पाणावणारा असा आहे. हे लेखकाचे यश आहे.

या ग्रंथात मुर्मू यांच्यासह आत्तापर्यंत राष्ट्रपती या सर्वोच्च पदावर विराजमान झालेल्या महनीय व्यक्तिंच्या कार्याचाही थोडक्यात आढावा घेतलेला आहे हे पुस्तकाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. शिवाय अमेरिकन राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडन आणि अब्राहम लिंकन यांच्या जीवनात जे दुःखद प्रसंग आले होते त्यांची नोंद लेखकाने अत्यंत हृदयस्पर्शी अशा शब्दात घेतली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याप्रमाणेच या दोघांनाही आपल्या अत्यंत जवळच्या माणसांच्या अकाली जाण्याचे दुःख भोगावे लागले, सहन करावे लागले आणि हे सारे सोडताना पुन्हा मोठ्या हिमतीने उभे राहिले. हे सारे व्यक्त करताना लेखकाने शाईऐवजी अश्रू वापरले की काय असे वाटते इतकं हे लेखन हृदयाला भिडणारं आहे. सोबतच भारतीय माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम आणि मूर्म यांच्या स्वभावातील साम्यता हेरुन पंचभाई यांनी ती मांडली आहे. तसेच मुर्मू यांच्या स्वभावविशेषाचा धागा माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या स्वभावविशेषाशी कसा जुळतो हेही थोडक्यात व्यक्त केले आहे. या चरित्राचे अजून एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे द्रौपदी मुर्मू यांचे ज्या ज्या ठिकाणी वास्तव्य होते त्या प्रत्येक ठिकाणचे निसर्ग सौंदर्य, धार्मिक स्थळं आणि त्यांचं महत्त्व, प्रार्थना स्थळे, तिथल्या चालीरीती, लोकांची स्वभाव वैशिष्टे इत्यादी अनेक बाबींवर अभ्यासपूर्ण असा प्रकाश टाकला आहे. त्यामुळे वाचनीयता वाढली आहे.

द्रौपदी मुर्मू यांचे चरित्र वाचताना एक गोष्ट पानोपानी जाणवते ती म्हणजे पंचभाई यांचे वाचन, मनन, चिंतन आणि नंतर लेखन. लेखनाचे हे टप्पे लेखनात जिवंतपणा आणि वाचनीयता येण्यासाठी मोठी कामगिरी बजावतात. तेच टप्पे लेखक विनोदभाई यांच्या लेखनाचा




आत्मा असल्याचे जाणवते. कारण लेखकाने लेखन करताना सहजपणे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय लेखक, संपादक आणि विचारवंत यांच्या विचारांची सहजपणे आणि बेमालूमपणे पखरण केली आहे. ते लेखनाची उंची वाढवतात. कुठेही ते विचार अनाठायी किंवा अनावश्यकपणे उद्धृत केले असल्याचे जाणवत नाही.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या स्वभावाचे अनेक पैलू लेखकाने मांडले आहेत. मुर्मू यांच्या साध्या वेशभूषेचे वर्णन करताना त्यांच्या साध्या वेशभूषेतची वैशिष्ट्येही लेखकांनी मांडली आहेत. अनेक उच्च पदावर विराजमान झालेल्या द्रौपदी मुर्मू यांच्या स्वभावाचे अनेक कंगोरे वाचताना 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' या ओळीची आठवण येते. नम्र, मृदुभाषी, अहंकाराचा लवलेश नसलेला, स्वाभिमानी, शांत, सभ्य, स्पष्टवक्तेपणा, दृढ, धाडसी, तत्वनिष्ठ, निर्भय इत्यादी अनेक स्वभाव गुणधर्म वर्णन करताना त्या प्राथमिक शाळेपासून ते राष्ट्रपती भवन अशा ज्या ठिकाणी गेल्या, राहिल्या तिथल्या लोकांनी सांगितलेल्या आठवणी, त्यांचा स्वभावातील, पोशाखातील साधेपणा या सोबत त्यांचा खाण्यापिण्यातील शाकाहार हे सारे वाचताना मूर्मू यांच्या स्वभावाचे अनेक पैलू समोर येतात आणि त्यांच्याबद्दल आपलेपणा, भक्तीभाव वाढीस लागतो. हे लेखकाचे लेखन कौशल्य आहे.

द्रौपदी मुर्मू ह्या राष्ट्रपती पदावर विराजमान झाल्या ते सारे वर्णन अगदी त्यांच्या नावाची उमेदवार म्हणून केलेली घोषणा, नामांकन, प्रचार, निवडणूक, मतमोजणी यासह राष्ट्रपती यांना मिळणारा पगार, निवृत्ती वेतन, सोयी सुविधा अशा बारीकसारीक गोष्टींचा अभ्यास करून ते सारे कौशल्याने लिहिले आहे. द्रौपदी मुर्मू यांच्या गावाचे वर्णन, स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षापर्यंत त्यांच्या गावात वीजेची अनुपस्थिती, आदिवासी समाजातील चालीरीती, समाज बांधवांची स्वभाव वैशिष्टे, त्यांचे शौर्य, धाडस इत्यादी बाबी लेखकाने प्रकर्षाने मांडल्या आहेत. मनोगत व्यक्त करताना लेखक विनोद पंचभाई म्हणतात त्याप्रमाणे देशाच्या सर्वोच्च पदी विराजमान झालेल्या द्रौपदी मुर्मू यांचा जीवनप्रवास खरोखरच रोमहर्षक, संघर्षमय आणि चित्तथरारक आहे. लेखक पंचभाई यांनी हे चरित्र लिहिण्याचे फार मोठे कार्य केले आहे. तसेच दुर्वा एजन्सीज् , पुणे यांनी हे चरित्र प्रकाशित करण्याचे अभिनंदनीय अशी कामगिरी केली आहे. हे चरित्र केवळ कुण्या एका समाजासाठी नव्हे तर संपूर्ण भारतीयांसाठी, त्यातही महिलांसाठी प्रेरणादायी ठरेल यात शंका नाही. इतके ते हृदयस्पर्शी तर आहेच पण साध्या, सरळ भाषेत साकारले असल्याने वाचनीय, मननीय नि चिंतनीय असे झाले आहे. या महनीय कार्याबद्दल लेखक श्री विनोद पंचभाई यांचे मनापासून अभिनंदन! धन्यवाद! आपल्या हातून अशीच साहित्य शारदेची सेवा घडो, अनेकानेक चरित्र आणि इतर ग्रंथ वाचक सेवेत दाखल होवोत ही शुभेच्छा!

**चरित्र : राष्ट्रपती दौपदी मुर्मू**
**लेखकः विनोद श्रा. पंचभाई, पुणे**
**प्रकाशकः दुर्वा एजन्सीज, पुणे**
**मुखपृष्ठः रमेश भारताल**
**पृष्ठसंख्याः १३६**
**किंमत : २५०/-**
**आस्वादकः नागेश सू. शेवाळकर, पुणे**
**(९४२३१३९०७१)**

# ऑनलाईन तीळगूळ मिळाले का ?

आधुनिक केसरी

वर्षेभर अनेक सण साजरे होतात आणि निघून जातात परंतु वर्षांतून एक आगळा-वेगळा सण म्हणजे मकर संक्रांत या सणामध्ये तिळगुळ घ्या आणि गोड-गोड बोला हा महत्वपूर्ण संदेश असतो. आणि माणसातील वाद मिटवण्यासाठी या सणाच्या माध्यमातून उपयोग सुध्दा केला जातो. परंतु आजकाल माणसं जुन्या परंपरा ह्या विसरून जात आहेत. पहिलं माणसं अनेकांच्या घरी जाऊन वडीलधाऱ्या माणसांना तिळगुळ देऊन त्यांना नतमस्तक होत गेले. आज ती परंपरा मोडीला जात असल्याचे चित्र आपल्याला पहायला मिळत आहे. या ऑनलाईन जगात व्हाट्सएपच्या, फेसबुकच्या, टेलिग्रामच्या, इंस्टाग्रामच्या, माध्यमातून अनेकांना मोठं-मोठ्या तिळ गुळाचे टोपले पाठवून सण साजरे करताना दिसत आहेत. या ऑनलाईन कारभारामुळे खरंच माणसातला माणूस सुध्दा हरवल्यासारखा जाणवतं आहे. पहिलं तिळगुळ देताना आणि घेताना अनेकांना सुखं आणि दुःख विचारत होते. आज मात्र मकर संक्रांतीच्या दिवशी फक्त गोड-गोड ऑनलाईन बोलणं आणि हा दिवस संपला की, नेहमीप्रमाणे अनेकांना नाव ठेवणे, अनेकांना दोष देणे, अनेकांची बदनामी करणे, अनेकांना खोटे आश्वासन देणे, अनेकांची दिशा भूल करणे अश्या अनेक गोष्टी आपल्याला पाहायला आणि अनुभवायला मिळत असतात. जीवन जगत असताना अनेक गोष्टींचा सामना करून जीवन जगावं लागत. आणि अनेकांसोबत चांगल्याप्रकारे सुध्दा वागावं लागत. तरच आपल्याला जगण्याचा खरा आनंद मिळू शकतो. फक्त सणापुरते जवळ घेऊन चालणार नाही. तर अनेकांच्या मनात राहून चांगली जागा सुद्धा निर्माण करावी लागते. मग रोजच माणसाच्या आयुष्यात गोडवा कायमस्वरूपी टिकवून राहण्यासाठी मदत होईल. पण काळ बदलला आणि त्या बदलत्या काळाबरोबर हल्ली आपण आपल्या सण-उत्सव साजरे करण्याच्या परंपरा ही नकळतपणे बदलत चाललो आहोत. त्यामागील उद्देश सगळे काही विसरलो. आज संक्रांतीच्या दिवशी आपण तिळगुळाचे चित्र असलेले मेसेज एकमेकांना पाठवतो. त्यामुळे व्हाट्सअप वर फक्त तिळगुळ पहायला मिळतात, पण प्रत्यक्ष हातामध्ये मात्र एकही तिळगुळ नसतो. कारण आपल्या जवळच्या माणसांना एक मॅसेज पाठवला की आपली जबाबदारी संपली. या विचारामुळे ह्या सणात फक्त औपचारिकता उरलेली दिसून येते. म्हणून असा मनात प्रश्न निर्माण होतो की, ऑनलाईन तिळगुळ मिळाले का?



**सोनू दरेगावकर**
संपर्क क्र. 7507161537





विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

# यू ट्यूब चॅनलवर बंदी - योग्य की अयोग्य ?

आधुनिक केसरी

**आज देशामध्ये कोणता निर्णय घेऊन कोणत्या गोष्टींना महत्व द्यायचे हे सत्ताधारी लोकांच्या तर्कावरच अवलंबून असल्याचे दिसून येते. सत्ताधारी लोकांनी समाजाच्या सर्वांगीण विकास व रोजगार, शिक्षण, आरोग्य, महागाई, मुलभूत सुविधा आणि हक्क अधिकार या बाबत बोलुन त्यावर तोडगा काढणे आवश्यक असते किंबहुना त्यांची जबाबदारी तीच आहे. परंतु सध्य परिस्थिती काय आहे हे सांगण्याची मुळीच गरज नाही रोज टिव्ही वर च्या बातम्या बघुन, राजकीय नेत्यांचे वक्तव्य बघुन निव्वळ मनोरंजक कार्यक्रम असल्याचे दिसून येते. रोजगार, शिक्षण, आरोग्य, महागाई यावर बोलायला आज नेत्यांना वेळच नाही असे दिसून येते.**

शिकलेल्या भारतामध्ये अज्ञान आजही एवढे आहे की कधी कधी शिक्षणावरचा विश्वास उडून जातो. आजच्या शिकलेल्या लोकांना शिक्षण म्हणजे फक्त नोकरी मिळवण्यासाठी एन्ट्री पासच आहे असे वाटते. शिक्षणामुळे तर्क, विज्ञानवाद, चिकित्सा निर्माण व्हायला पाहिजे परंतु शिक्षणामुळे बहुतांश माणूस फक्त लिहायला वाचायला शिकला परंतु शिक्षणामुळे माणूस म्हणून जगायला आजही शिकलेला दिसत नाही. अगोदर आपण हे बघुया कि युट्यूब चॅंलनवर बंदी आणणे योग्य आहे की अयोग्य आहे. सरकारने दोन कारणे ठरवून मागील काही दिवसापासून अनेक युट्यूब चँनलवर बंदी आणलेली आहे ते म्हणजे सरकार विरोधात खोट्या बातम्या व दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न या दोन कारणांमुळे आजपर्यंत अनेक युट्यूब चँनल बंद करण्यात आले आहेत. देशामध्ये, राज्यामध्ये किंवा कोणत्याही ठिकाणी चुकिचे, देशहिताच्या विरोधात कोणत्याही कृत्यांचे, वक्तव्यांचे देशातील जाणकार व बुद्धीजीवी वर्ग समर्थन करत नाही. परंतु सदर युट्यूब चँनल बंद करून ठोबळमानाने दोन कारणे समोर आणून चँनल बंद करणे योग्य नाही कारण अभिव्यक्ती स्वातंत्र्य संविधानीक अधिकार आहे. युट्यूब चँनलच्या माध्यमातून अनेक तरुण आज व्यक्त होताना दिसत आहे कारण सोशल मिडीयाच आज समाजाचा मिडिया आहे. प्रस्थापित चँनल तर जनतेची बाजु न मांडता सरकारची बाजू मांडत आहेत. मुळात मुद्दा हा आहे की सरकार विरोधात खोट्या बातम्या दाखवल्या म्हणजे नेमकं काय केले असेल तर आपण साधारण उदाहरण बघु समजा सरकारने दहा लाख रोजगार दिला असेल तर युट्युब चँनलवाल्यांनी एक लाख सांगितला असेल. किंवा सरकारने दहा शैक्षणिक सुविधा दिल्या असतील तर त्यांनी दोनच दाखवल्या असतील असे काही झाले असेल. कारण कोणीही सरकार वर बोलताना रोजगार, शिक्षण, महागाई, आरोग्य मुलभूत सुविधा आणि हक्क अधिकार याच विषयावर बोलतील किंवा याच विषयांवर मत मांडतील मग या पैकी एखाद्या विषयांवर सरकारने जास्त काम केले असेल आणि युट्यूब वाल्यांनी कमी दाखवले असेल आता येथे प्रश्न येतो तो माहिती चा सरकारने केलेले कामे शासकीय वेबसाईटवर टाकून द्यावे म्हणजे सरकारी कामकाजाची माहिती सर्वांना होईल आणि सरकार विषयी चुकीच्या बातम्या किंवा माहिती प्रसारित होण्याचा प्रश्नच नाही. हा उपाय आहे जेने करून येणाऱ्या काळात कोणत्याही युट्यूब चँनलवर वरिल कारणामुळे बंदी येण्याचा प्रश्न येणार नाही व लोकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला आळा बसणार नाही. परंतु खरे आणि खोटे ठरवण्याचे काही मापक सुद्धां सरकारने ठरवून द्यावे जेने करून जनतेला सुद्धा सहज समजेल खरे काय आणि खोटे काय. केवळ सरकारच्या मनात आले किंवा सत्तेत बसलेल्या व्यक्तीच्या जवळच्या व्यक्तीने सांगितले आणि कोणाच्या अभिव्यक्ती स्वातत्र्यावर बंधने आली असे होऊ नये. आणि दुसरी गोष्ट म्हणजे जनतेला खोटी आश्वासने देणाऱ्या नेत्यांवर सुद्धां बंदी घालायला हवी कारण आपल्याला कोणत्याही माणसाला विरोध करायचा





नसतो तर प्रवृत्ती ला विरोध करायचा असतो मग खोटे बोलणारे, खोटी माहिती पसरवणारे युट्युबर असो, इलेक्ट्रॉनिक मिडिया असो वा राजकीय नेते असो. मग सरकार निपक्ष काम करत असेल तर आणि युट्यूब चँलनवर खरचं खोटी माहिती दिली म्हणून बंदी घातली असेल तर काळा पैसा आणू, दरवर्षी दोन करोड रोजगार देऊ, देश विकल्या जाऊ देणार नाही याचे फँक्ट चेक करून किती काळा पैसा आला, किती करोड तरुणांना रोजगार मिळाला, आणि विकलेली देशाची किती मालमत्ता पुन्हा परत आणली हे तपासावे. आणि वक्तव्य बरोबर असेल आणि कामे बरोबर असतील तर नागरी सत्कार करावा जर बोलुन जनतेची दिशाभूल केली असेल तर त्यांच्या वर बंदी कधी येणार हे ही स्पष्ट करावे. कारण आपण निरपेक्ष सरकार चालवत आहात यावर विश्वास आहे. दुसरा मुद्दा होता सामाजिक तेढ निर्माण होणारे वक्तव्य केल्याने युट्यूब चँनल बंद करण्यात आले. आपण धर्मनिरपेक्ष लोकशाही मध्ये राहतो येथे कोणत्याही धर्माला श्रेष्ठ किंवा कनिष्ठ स्थान नाही वा कायद्यासमोर कोणत्याही धर्माला धार्मिक स्थान नसुन एक भारतीय म्हणून ओळख आहे. कोणीही आपल्या धर्माला देशापेक्षा जास्त प्राधान्य देत असेल तर त्यांना आळा घालणे सरकारचे काम आहे. आणि त्या युट्यूब चँनलवर जर कोणत्याही एकाधर्माला श्रेष्ठ समजून इतरांना कनिष्ठ समजले जात असेल तर सरकारने आणलेली बंदी योग्यच आहे. परंतु सरकार मध्ये बसलेले रोग धर्म, रंगावरून सामाजिक तेढ निर्माण करत आहेत. ओढून ताढून हिंदू मुस्लिम द्वेषात्मक चर्चा घडवून आणत आहेत त्यांच्या वरही सदर कायद्या अंतर्गत बंदी यायला पाहिजे. अनेक टीव्ही चँनल आणि अँगर हिंदुत्वाची बाजु मांडताना भगव्या रंगाला फक्त हिंदु धर्माचा रंग म्हणून धर्माचा अवमान तर करत आहेच परंतु सामाजिक तेढ सुद्धा निर्माण करत आहेत त्यांच्या वर सुद्धां बंदी येते आवश्यक आहे. अनेक भगवे कपडे घातलेली लोक भगवा रंग हिंदूचा आहे आणि म्हणून मुस्लिमांना लक्ष केले जात आहे मुस्लिम कलाकाराने धर्माचा अवमान केला. पहीली गोष्ट कोणताही रंग कोणत्याही धर्माचा अधिकृत रंग नाही. मग एवढा वादंग टिव्ही चँनल, अँकर आणि राजकीय नेते करत असतील तर त्यांच्या वर बंदी का आणु नये? सत्तेत असणाऱ्या अनेक राजकीय नेत्यांनी अनेक महापुरुषांवर चुकिचे वक्तव्य करून सामाजिक तेढ निर्माण केली. सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्यां राजकीय नेत्यांच्या विरोधात, चुकिचे विधान करणाऱ्या राज्यपालाच्या विरोधात जनतेने आंदोलन केले परंतु त्यांच्या वर कोणतीही कार्यवाही केली. त्यांच्या वर कारवाई केली नाही बंदी आणली नाही. सत्तेतील राजकीय नेत्यांनी सामाजिक तेढ निर्माण होईल अशा वक्तव्यांची तर मालीकाच सुरू केली. परंतु सरकारने त्यांच्या वर बंदी न आणता त्यांना संरक्षण देण्याचे काम केले जर असे सरकार करत असेल तर सरकार निरपेक्ष काम करते याचा काय पुरावा आहे. आज जनता ईव्हीएम विरोधात आवाज उठवत आहे ईव्हीएम बंद करून बँलेट पेपरवर निवडणूक व्हायला पाहिजे कारण अनेक ठिकाणी ईव्हीएम चे घोटाळे उघड झाले आहेत. बटण कोणतेही दाबले तरी सत्ताधारी पक्षाच्या चिन्हासमोरचा लाईट लागतो, जर ईव्हीएम मध्ये बिघाड म्हणले तर इतर कोणत्याही चिन्हासमोरचा लाईट लागायला पाहिजे पण संपूर्ण भारतातुन ज्या बातम्या समोर आल्या त्या सर्व बातम्या मध्ये एकच गोष्ट समोर आली ती म्हणजे ईव्हीएममध्ये घोटाळा होऊ शकतो आणि नागरिकांनी दिलेले मत त्याला नको असलेल्या उमेदवारांना जाते म्हणजे हा खोटेपणा नाही का? मग यावर सरकारने बंदी आणण्याचे धाडस का बर दाखवले नसेल. आजही देशामध्ये अनुसूचित जातीच्या लोकांना मंदिरात जाऊ दिले जात नाही. मंदिरात गेल्यावर देव अपवित्र होतो किंवा इतर बाकी होत असतील म्हणून अनुसूचित जातीतील लोकांना मंदिर प्रवेश नाकारला जातो. आणि कोणी मंदीरात गेलेच तर आजच्या घडीला सुद्धां त्यांना मारहाण केली जाते अशा बातम्या आपण पाहत असतो. मंदिरात गेल्यावर ज्यामुळे मंदिर आणि देव अपवित्र होत असेल किंवा इतर काही कारणे असतील तरीही मंदिरात जाणाऱ्यांना मारल्या नंतर मारणारा पवित्र होतो की त्याला पुण्य मिळते याचेही फँक्ट चेक करून दोषींवर कारवाई व मंदीरावर बंदी आणावी. तर कुठे सरकार निरपेक्ष काम करत आहे याची पावती मिळेल. सरकार चुकिच्या बातम्या माहिती पसरवणाऱ्या व सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्यांना वर कार्यवाही करत असेल तर ते योग्यच आहे परंतु त्यामध्ये भेद करून कार्यवाही होत असेल तर हा प्रकार अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा आहे. वरिल बाबींचा विचार करून नेते, टीव्ही चँनल, अँकर, राजकीय नेते जे कोणी चुकीची माहिती धार्मिक तेढ निर्माण करण्यावर कारवाई होत नसेल तर युट्यूब वर आनलेली बंदी अयोग्यच आहे.

# स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करा

आधुनिक केसरी

जीवनात प्रेरणादायी खुप काही गोष्टी आहेत. आपण स्वतःला ओळखले पाहिजे. आपण वेगळे काहीतरी करून दाखवण्याचे



धाडस दाखविले पाहीजे. प्रत्येकाने नव्या वाटा धुंडाळायला हव्यात. सतत नवनवीन काहीतरी केले पाहिजे. आपल्याकडे एक वेळ पैसा नसू द्या. परंतू प्रगतीच्या वाटा आपण शोधल्या पाहिजेत. आर्थिक परीस्थिती आपल्या मार्गात कधीच आडवी येत नाही. ही गोष्ट नेहमी लक्षात ठेवा. प्रत्येकाला आपला मार्ग आपल्याला शोधायचा आहे. आपल्या जीवनात चांगले दिवस कसे येतील.याची वाट पाहत बसू नका.ऊठा आणि स्वातःघ्या हाताने आयुष्यात चांगले दिवस खेचून आणा.व स्वताःची वेगळी ओळख निर्माण करा. स्वतः बद्दल विश्वास बाळगा. जिद्द, चिकाटी, आणि मेहनत करण्याची तयारी असली तर आपण काहीही करू शकतो. न डगमगता, न खचता प्राप्त परीस्थितीत मार्ग काढत चला. प्रत्येकाला वाटत असते आपलीही वेगळी ओळख असावी.यासाठी तो नेहमी धडपडत असतो. अनेक यशस्वी लोकांनी स्वतःच्या कर्तृत्वाने वेगळी ओळख निर्माण केलेली असते.प्रत्येकात काहीना काही करण्याचे सामर्थ्य असते. स्वताःची जी वेगळी ओळख बनविण्यात जी मजा आहे ती कशातच नाही.एकदा का आपली ओळख निर्माण झाली, तसे लोक आपल्याला ओळखु लागतात. स्वताःहून स्वतःचा रस्ता शोधायला हवा. सर्वात प्रथम आपण योग्य दिशा ठरवणे गरजेचे आहे. सकारात्मक दृष्टिकोन ठेवत ध्येयाच्या दिशेने वाटचाल केली पाहिजे. आपली वेगळी ओळख निर्माण केली गेली पाहिजे. आयुष्यात आपण काय गमावले यापेक्षा काय कमावले याचा विचार करा. आपल्या आवडीच्या क्षेत्रात करीअर करा. व्यसनापासून चार हात दुर रहा.

अनेक लोक आपल्या चांगल्या कृतीमुळे प्रभावीत होत असतात. त्यासाठी मोठी स्वप्ने पहा. आपल्याला जे जमत नाही ते करण्याचा प्रयत्न करा. स्वताःची वेगळी ओळख निर्माण केली गेली पाहिजे. श्रमाची तयारी ठेवली पाहिजे. डोक शांत ठेवलं पाहीजे. तोंडात साखर ठेवली पाहिजे. पायात भिंगरी प्रमाणे वाटचाल असली पाहिजे. आपल्याकडे कोणती गोष्ट उपलब्ध आहे याचे निरीक्षण करा इच्छा असेल तर नक्कीच मार्ग सापडतो. आपल्या गुणांचा शोध घ्या व विकसित करा. नको त्या गोष्टींमध्ये वेळ वाया घालवू नका. आपल्या क्षमता ओळखून स्वताःची वेगळी ओळख निर्माण करा. स्वताःला घडविण्यात वेळ खर्च करा.तेव्हाच कुठे आपण आपली वेगळी ओळख निर्माण करु शकतो.

संतोष दत्तू शिंदे
संपर्क ७७२१०४५८४५

# संघमय जीवन जगलेलं व्यक्तिमत्त्व : शिवरुद्रप्पा केवळराम

आधुनिक केसरी

**१७ जानेवारी २०२३ हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तळमळीचे स्वयंसेवक शिवरुद्रअप्पा दानप्पा केवळराम यांचा प्रथम पुण्यस्मरण दिन. यानिमित्ताने दि. ६ जानेवारी रोजी औसा येथे पुण्यस्मरण दिनानिमित्ताने एक प्रकट कार्यक्रम मुक्तेश्वर मंदिराच्या मंगल कार्यालयात झाला. यावेळी ज्येष्ठ पूर्वांचल छात्रावासचे ज्येष्ठ प्रचारक व १९६८ ते १९८३ या काळात औसा येथे प्रचारक असलेले सोमनाथ खेडकर व लातूरचे पालकमंत्री माजी आमदार संभाजीभैय्या निलंगेकर व अप्पांजींच्या सहवासात कार्य केलेले अनेक संघ स्वयंसेवकांच्या उपस्थितीत कै. शिवरुद्रअप्पांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला, त्यांनी अखंडपणे केलेल्या कार्यचे स्मरण करण्यात आले.**

मलाही या कार्यक्रमाला उपस्थित राहून गतस्मृतींचा सुवर्ण काळ अनुभवता आला. मलासुद्धा विद्यालयीन व महाविद्यालयीन काळ म्हणजे जवळपास १९७५ ते १९८५ या काळात आदरणीय आप्पाजींच्या सहवासात राहता आले.

आयुष्यभर मी संघाचा व माझ्यामध्ये कायम संघ असंच जीवन ते जगले. ते नेहमी कोणतेनाकोणते पद्य गुणगुणत असत. ‘मंत्र छोटा तंत्र छोटे, परी यशस्वी ठरले ते’ या पद्यानुसार त्यांनी छोट्या-छोट्या गोष्टीतून संघकार्य उभे केले. तो काळ म्हणजे संघाच्या कार्यासाठी खरोखरच प्रतिकुल असा होता. आणीबाणीच्या काळात अनेक ज्येष्ठ स्वयंसेवक तर बंदीवासात होते. त्यांचे सहकारी प्रभुअप्पा राचेट्टे, डॉ.माणिकराव हरंगुळकर मिसाखाली जेलमध्ये होते. आणीबाणीच्या विरोधात छोटे-छोटे आंदोलने सुरूच होती. सरकारी नोकरीत राहून संघकार्य करणे शक्य नव्हते म्हणून त्यांनी नोकरीचा त्याग करून एक छोटासा व्यवसाय सुरू केला व त्यामाध्यमातूनच संघकार्य सुरू केले. हा निर्णय त्यांच्यासाठी आज विचार केला तर किती धाडसी आणि कष्टमय होता हे लक्षात येते. नोकरीवर असतानाही त्यांनी प्रामाणिक काम करून जेथे नोकरी असेल तेथे इतर वेळी संघकार्य उभे राहण्यासाठी अनेक लोकांना भेटून संघाची शाखा उभारण्यासाठी प्रयत्न केले. आणीबाणीविरोधात त्यांना उघडपणे सत्याग्रह इच्छा असूनही करता आला नाही. पाच मुलीच असल्यामुळे व त्यांचे शिक्षण व कौटुंबीक जबाबदारी समजून त्यांना उघडपणे सत्याग्रह केला नाही. कारण दीर्घकाळ कारावास झाला तर कौटुंबिक घडी विस्कटेल म्हणून संघाच्या वरिष्ठ लोकांना त्यांना सत्याग्रहापासून दूरच ठेवले. तरीपण अप्पांनी सत्याग्रह केलाच आणि त्यांना तीन आठवडे शिक्षाही झाली.

मला आठवते ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या झाली.



त्याकाळात केवळराम गल्ली येथील त्यांच्या निवास्थानाजवळ संघाचे बाल स्वयंसेवकांसाठी तालुका हिवाळी शिबीर चालू होते. घटना समजल्यानंतर आप्पांनी त्वरित शिबीर स्थगित करण्याचा निर्णय घेतला. ते त्यावेळी तालुका कार्यवाह म्हणून काम पाहात होते. प्रत्येक स्वयंसेवकांना त्यांच्या घरापर्यंत, गावापर्यंत स्वतः सोडण्याची त्यांनी व्यवस्था केली. रात्रभर स्वयंसेवक सुखरूप कसे पोहोचतील याची काळजी घेतली.

कायम संघासाठी सतत काम करणे, संघ विस्ताराचा ध्यास, रोजची शाखा लागली पाहिजे, उपस्थिती वाढली पाहिजे यासाठी संघ स्वयंसेवकांच्या घरी जाऊन कौटुंबिक संबंध निर्माण करणे हा अप्पांचा स्वभाव होता. शिस्त हाच त्यांचा स्थायीभाव.... नियोजनबद्ध आयुष्य जगणे खूप कठीण असते. पण आप्पांनी आयुष्यभर शिस्तीतूनच अनेक स्वयंसेवकांच्या आयुष्याला आकार दिला आहे... रोजच्या कार्याची नोंद ते ठेवत असत. सर्व कुटुंब, नातेवाईक, मित्र, सहकारी यांच्याशी कायम संघ परिवाराशी जोडणे, तोच विचार मांडणे हाच त्यांचा जगण्याचा मंत्र होता. त्यांचे विजया जनरल स्टोअर्सचे हे संघाचे कार्यालयच होते. त्यांचे घर म्हणजे येणाऱ्या प्रत्येक प्रचारकासाठी हक्काचे घर होते. संघाचा कोठेही कार्यक्रम असो, शिबीर असो, व्याख्यान असो निरोप मिळाला की, अप्पांजी निघण्याची तयारी असायची. दुकान बंद ठेवून ते प्राधान्याने संघाच्या कार्यासाठी वेळ द्यायचे. महादेव मंदिरात रोज प्रभात शाखा भरायची. त्यावेळी सहा-सात जणांची उपस्थिती असायची. विशेषतः गंगाधर गुणाले, सगरे गुरुजी, व्यंकटराव मोरे, सुरेशप्पा कारंजे, सुभाष कोचेटा,पांडुरंग गोमदे, सुनील उटगे, चतर्भुज शिंदे असे असायचे. सकाळी शाखा संपल्यानंतर सात वाजता आम्ही कधी-कधी त्यांच्या घरी जात असू. तेथेच संघाच्या अनेक कार्यक्रमाचे नियोजन होत असे...

जैन मंदिरात सायम् शाखा झाल्यानंतर रोजची उपस्थितीची नोंद देण्यासाठी त्यांच्या गांधी चौक येथील दुकानात मला जावे लागत असे. उपस्थितीबद्दल, स्वयंसेवकाबद्दल भरभरून बोलायचे. कोण गैरहजर आहे याची चौकशी करायचे. कधी कधी शाखेवर उपस्थितांना दुकानातील चॉकलेट, गोळ्या पाठवून द्यायचे. एखाद्या दिवशी ठरवून शाखेत गैरहजर असलेल्या स्वयंसेवकांच्या घरी ते भेट देऊन यायचे. गैरहजर राहण्याचे काही वेगळे कारण आहे का यासाठी भेट द्यायचे. मनापासून स्वयंसेवकांवर माया करणारे अप्पा हे एक वेगळेच रसायन आहे. त्यांच्या दुकानात रात्रौ नऊ पर्यंत संघ, समाज, शिस्त, कुटुंब, स्वच्छता या विषयावरच उपस्थित स्वयंसेवकांशी संवाद असे. ते मंतरलेले व सोनेरीच दिवस होते. त्यांच्या दुकानात व घरी स्वयंसेवक, प्रचारक, पदाधिकारी यांची कायम बैठक असायची. तेव्हा राम जन्मभूमीच्या आंदोलनाचा काळ होता.. त्यांच्या घरी व दुकानात याविषयीच सतत चर्चा, नियोजन असायचे. ते भारावून गेल्यासारखे सर्वांना मार्गदर्शन करायचे.. समोरच्याला एखादा मुद्दा कसा पटवून द्यावा याची अनोखी कला त्यांच्यामध्ये होती. रोज भेटलेच पाहिजे असा त्यांचा जणू आम्हाला नियमच होता. संघाच्या विचारणसरणी असलेल्या कुटुंबांशीच त्यांचा जास्त स्नेह होता. त्यातूनच त्यांनी आपले नातेसंबंधसुद्धा जोडले. त्यांच्या सहवासात आलेल्या अनेकांना त्यांनी आपल्या संस्कारातून कायमचे जोडले. प्रथम पुण्यस्मरणनिमित्ताने अनेक स्वयंसेवकांनी त्यांच्या आयुष्यात आलेल्या आठवणींना उजाळा दिला. रामजन्मभूमी आंदोलनासंदर्भात त्यांनी केलेले आंदोलन, नियोजन, कारसेवेतील सहभाग याचेही अनेकांनी स्मरण केले. आज भव्य मंदिर उभे राहात आहे. त्यांची स्वप्नपूर्ती होते आहे. त्यांनी जगलेल्या ‘मंत्र छोटा, तंत्र छोटे... परी यशस्वी ठरले ते’ हे सत्यात उतरते आहे....

त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन...!!

महावीर दुरुगकर
सोलापूर

# प्रेमाची परिभाषा शिकवून माणुसकीची भाषा बोलणार 'प्रेम उठाव'



शाम बैसाणे
संपर्क क्र. 9324790208

आधुनिक केसरी

**कवी नवनाथ रणखांबे यांच्या या आधी प्रकाशित झालेल्या काव्यसंग्रहा विषयी थोडक्यात जाणून घेऊया. कवी नवनाथ रणखांबे यांचा 26 नोव्हेंबर, 2018 मध्ये 'जीवन संघर्ष' हा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित झाला होता. या काव्यसंग्रहावर मी, शाम बैसाणे, पुस्तक परीक्षण देखील लिहिले होते. त्यानंतर 'जीवन संघर्ष' या काव्यसंग्रहावर समीक्षा, पुस्तक परीक्षण, अभिप्राय यांचा जनू पाऊसच पडू लागला आणि बघता बघता या काव्यसंग्रहाने 231 वेळा पुस्तक परीक्षण, अभिप्राय आणि समीक्षा 72 दैनिकात, 45 साप्ताहिकात, 4 मासिकात , 49 वेबसाईटवर , 2 पाक्षिकात, 10 पुस्तकात , 4 वर्तमानपत्रात आदी. विविध मान्यवरांनी लिहिलेल्या अनेक वर्तमानपत्रात अनेक वेळा प्रसिद्ध झाल्या आहेत. समीक्षा आणि पुस्तक परीक्षण याद्वारे थोर विचारवंत कवी लेखक यांच्या विचारांचा पूर आला की काय असे वाटू लागले होते. काव्यसंग्रहाच्या मुखपृष्ठावर गरुड झेपचे चित्र आहे. ज्या प्रकारे मुखपृष्ठावरील गरुड झेपचे चित्रीकरण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे 'जीवन संघर्ष' या काव्यसंग्रहाने उंच गगन भरारी घेतली.**

काही कालावधीतच 'जीवन संघर्ष' या काव्यसंग्रहाची इंडिया टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड - राष्ट्रीय ऐतिहासिक विक्रम ( सन्मान नवी दिल्ली) , रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड - राष्ट्रीय ऐतिहासिक विक्रम, महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्ड - राष्ट्रीय ऐतिहासिक विक्रम, ओएमजी बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड - ऐतिहासिक अंतरराष्ट्रीय विक्रम ( सन्मान कल्याण), इ. विक्रमाची नोंद झाली. मराठी साहित्यात एक नवा विश्वविक्रम निर्माण झाला. पुस्तकावर प्रसिद्ध झालेल्या परीक्षणांच्या या ऐतिहासिक रेकॉर्डची नोंद घेऊन वर्ल्ड ह्युमन राईड पीपल्स कौन्सिल कडून आंतरराष्ट्रीय मानवाधिकार नेल्सन मंडेला आंतरराष्ट्रीय साहित्य पुरस्कार 2019 ( मुंबई ) येथे नवनाथ रणखांबे यांना प्रदान केला. अनेक पुरस्कार जीवन संघर्ष पुस्तकाला मिळाले. त्याच बरोबर राष्ट्रीय समाज गौरव पुरस्कार 2019 ( नवी दिल्ली) , राष्ट्रीय साहित्य रत्न पुरस्कार 2019 ( शिर्डी) , जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार 2022 (नागपूर) , राज्यस्तरीय सामाजिक कार्य पुरस्कार 2019 ( मुंबई), राज्यस्तरीय बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार 2019 ( डोंबिवली), राज्यस्तरीय विद्रोही साहित्यरत्न पुरस्कार 2022 ( कल्याण) आदी . मानाच्या पुरस्काराने ते सन्मानित आहेत. डायमंड बुक ऑफ रेकॉर्ड 2019 - राष्ट्रीय विक्रमात त्यांचा समावेश आहे. नवनाथ रणखांबे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय व विविध पुरस्काराने सन्मानित असून (आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय विक्रम) विविध बुक ऑफ रेकॉर्ड धारक आहेत. 'जीवन संघर्ष' या काव्यसंग्रहाने अशी गरुड झेप घेतली की 'जीवन संघर्ष' हा काव्यसंग्रह साता समुद्रा पार जाऊन पोहोचला. साहित्य क्षेत्रात 'जीवन संघर्ष' या काव्यसंग्रहाने ऐतिहासिक विश्व विक्रम केला. मराठी साहित्यात या पुस्तकाने प्रसार माध्यमात आघाडी घेतली. कवी नवनाथ रणखाबे यांना याच काव्यसंग्रहाने संघर्षकार ही नवी ओळख दिली. आता कवी नवनाथ रणखांबे यांना साहित्यक्षेत्रात 'जीवनसंघर्षकार' या नावाने ओळखू लागले आहेत. कवी नवनाथ रणखांबे यांचे खूप खूप अभिनंदन!

झुंजार असे व्यक्तिमत्व असलेला " फुले शाहू आंबेडकर ", चळवळीतला हा मोरख्या कवी इथेच न थांबता कधी सुख- दुःखाची तर कधी गरीबीची झळ सोसत पुढे चालत राहीला. कारण कवीला हे माहित आहे थांबला तो संपला . म्हणून कवीच्या जीवनातील संघर्ष आजूनच तीव्र होत गेला. कवीला कविता लिहिण्याचा वाचण्याचा छंद होताच पण ह्याच संघर्षातून कवी पुढे कविता, गजल, चारोळ्या, लेख, व्याख्याने अशा अनेक साहित्याद्वारे समाज प्रबोधन करत आहे. कवी ईतभर पोटा करता आणि शिक्षणाकरता गावातून शहराकडे मुंबईत आला आणि इथेच आई-वडिलांच्या प्रेमा करता पारखा झाला. हाच दुरावा कवीच्या हातातल्या लेखणीने भरून काढला. कवी आपल्या हृदयातील शब्दसुमनांन सोबत लेखणीवर एवढे प्रेम करू लागला की याच प्रेमातून कवीने 14 एप्रिल , 2022 मध्ये 'प्रेम उठाव' हा दुसरा काव्यसंग्रह वाचकांसमोर सादर केला आहे.

प्रेम हे पावसातल्या थेंबाप्रमाणे असतं. जमिनीवर पडलेला पावसाचा थेंब जसा जमिनीत खोल दूरवर कूठे तरी जाऊन रुजत असतो. त्याचप्रमाणे प्रत्येकाच्या आयुष्यातलं प्रेम हे देखिल मानवाच्या काळजातल्या खोलीत जाऊन रुजत असतं. मग ते आई-वडिलांचे प्रेम असो, बंधुप्रेम असो, मैत्री प्रेम असो, प्रेयसी प्रियकराचे प्रेम असो, आपल्या आयुष्यभराची जोडीदार पती पत्नीच प्रेम असो, साहित्य प्रेम असो, काव्य प्रेम असो, खेळ मौज मजा प्रेम करणे असो आदी. प्रत्येकाच्या तारुण्यात कुणीतरी खास असतं. कुठल्या न कुठल्या प्रकारे प्रत्येकाच्या आयुष्यात प्रेम होत असतं. हे आंधळ प्रेम कुणाला ही दिसत नसतं ते फक्त अनुभवायच असत. कवीला हेच चारोळीतून सुचवायचं आहे . म्हणून कवी जीवनसंघर्षकार नवनाथ रणखांबे 'प्रेम उठाव' या काव्यसंग्रहातील पहिल्याच चार ओळीत लिहीतात की,---

**प्रत्येकाच्या आयुष्यात प्रेम होत असतं**
**प्रत्येकाच्या तारुण्यात कोणीतरी खास असतं**

मित्र हो! जीवनात आपल्या सोबत जेव्हा आपलेच दुःखात आपली साथ सोडतात तेव्हा दुःखाच्या यातना सहन करतांना आसवेच आपली साथ देत असतात. हेच सत्य आहे. जे आपली साथ सोडतात, जे आपले मन तोडतात, तेच नेमके आपल्या हृदयात राहतात. म्हणूनच कवी आपल्या गजलेत लिहितात, -----

**'गझल राहिली हृदयात'**
**" यातनांनी घेरलेली बात होती**
**रोज आता आसवांची रात होती "**

प्रेमाची परिभाषा शिकवून माणुसकीची भाषा बोलणार हा कवी आहे. मराठी साहित्य विश्वातील हा नव्या पिढीचा दमदार आणि आश्वासक कवी असून मानवता आणि समानतेवर प्रेम करणाऱ्या या कवीच्या मनात खूप आक्रोष आहे. असमानते विषयी मनात राग द्वेष आहे . कवीला खूप काही लिहायचं होतं. पण सर्वच हृदयातील अंतरंगी शब्दांचा खेळ कवींना कवितेत मांडण शक्य नसावे. स्वतःचे आत्मपरीक्षण करून कवीने आपल्या मनातील भावना अनेक दर्जेदार चारोळ्यानी आणि कवितेने साकारण्याचा प्रयत्न केला आहे याची जाणीव होते. कवी नवनाथ रणखांबे आपल्या लेखनीतून लिहितात......

**हृदयाने माझ्या खूपच साठवले**
**लेखणीला मात्र थोडेच आठवले**

हळुवार पणे भावना आपल्या आशयघन शैलीत प्रगल्भ , प्रतिभावंत आणि प्रज्ञावंत असणारे कवी नवनाथ रणखांबे आपल्या कवितेत मांडत असतात . वाचकात समदुःखी होऊन हृदयाचा ठाव हा कवी घेतो. ताकतीने आणि खुबीने कमीत कमी शब्दांत खूप काही नजाकतेने 'प्रेम उठाव ' मध्ये लिहून जातो. कवी मंगेश पाडगावकरांच्या कवितेतील दोन ओळी मला आठवल्या,

**प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं**
**तुमचं आणि आमचं अगदी सेम असतं**

आणि हे जरी खर असल तरी प्रेम हे क्षणभंगुर असत. कारण प्रेमाचं पारड नेहमी हेलकावेच घेत असतं. जीवन संघर्षकार कवी नवनाथ रणखांबे हे आपल्या दुसऱ्या काव्यसंग्रहाला 'प्रेम उठाव' हे नाव देतांना अस्वस्थ होऊन 'अस्वस्थ' या कवीतेत कवी लिहितात, -----

**असेन मी नसेल मी, कवितेने मी,**
**हृदयात तुमच्या वसेन मी !**

जे शब्दांनी नाही डोळ्यांनी वाचता येत ते प्रेम असत! जो दूर राहूनही मनातून दूर जात नाही ते प्रेम असत! ज्याला पुन्हा पुन्हा पहावस वाटत ते प्रेम असत! ज्याचा प्रत्येक शब्द हृदयाला स्पर्शून जातो ते प्रेम असत! जो स्वप्नात येत नाही पण नेहमी विचारात असतो ते प्रेम असत... त्याच प्रमाणे जीवनसंघर्षकार कवी नवनाथ रणखांबे यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर प्रेम केलं. "फुले शाहू आंबेडकर ", डोक्यावर नाही तर डोक्यात उतरवले आहेत .शिक्षणावीना पोरका होता समाज सारा लेखणीने जणू आमच्याकडे पाठ फिरवली होती अशा पोरक्या समाजाला शिक्षणाचा अधिकार ज्ञानसूर्य प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेकरांनी दिला होता. अशा या पोरक्या समाजावर मायेचं छत्र बाबासाहेबानीच धरलं होतं. त्यांच्यामुळेच आज आपल्या जगण्यास शान आहे हे कवींनी अभ्यासले आणि अनुभवले देखील आहे. याची आंबेडकरी जनतेला आणि बहुजन समाजाला जाणीव करून देतांना आपल्या 'निळे निशान ' या गजलेतून कवी जीवनसंघर्षकार नवनाथ रणखांबे लिहितात- पहिला शेर , ---

**भीमराव थोर आम्हा सूर्यासमान आहे**
**त्यांच्यामुळेच आली जगण्यास शान आहे**

शेवटचा शेर , ----

ठोकून आज छाती नवनाथ हेच सांगे
कायम निळेच त्याने धरले निशाण आहे

ज्याप्रमाणे शेतामध्ये बी पेरले नाही तर निर्सग ती सुपीक जमीन गवताने भरून काढतो. हे जेवढे सत्य आहे तेवढेच हे देखील आहे की आपण डोक्यामध्ये सकारात्मक विचार भरले नाही तर नकारात्मक विचार आपली जागा बनवतात. जीवनसंघर्षकार कवी नवनाथ रणखांबे यांनी आपल्या डोक्यात फुले शाहू आंबेडकरांच्या सकारात्मक विचारांची पेरणी केली आहे . कवीने फुले शाहू आंबेडकर डोक्यावर घेऊन नाचण्याऐवजी डोक्यात घेतले आहे. कवी महामानवांच्या विचार मार्गावर चालताना त्यांचे बळ घेऊन आपल्या साहित्यातून , काव्यातून प्रज्ञावंत मळा फुलवून समाज प्रबोधन करत "भिम बाबा" या कवितेतून लिहितात, ----

**बाबांच बळ आहे जवळ विचारांची शाळा**
**प्रगतीचा डोळा मार्ग सोहळा**
**फुलला प्रज्ञावंत मळा !**




सामान्य लोकांना आज आपला प्रपंच कसा चालेल याची चिंता लागलेली आहे. आज कमवावे आणि आजचे आज खावे. उद्याचे उद्या पहावे अशी परिस्थिती आहे. वाढता शिक्षण खर्च आणि वाढती महागाई या मुळे कुटुंबात निर्माण होणाऱ्या अन्न वस्त्र निवाऱ्याची टंचाई सर्वत्र जाणवत आहे. महागाईच्या आगीत सर्वसामान्य जनता होरपळून निघत आहे. राजकारणी मात्र एक दुसऱ्यावर आरोप प्रत्यारोप करून आपली पोळी भाजून घेत आहेत. तरी देखील अशा परिस्थितीत कवीच्या आईने कवींना शिकविले ; वकील बनवले ; एवढेच नाही तर कष्ट करून प्रत्येक दुःखाला सामोरं जाऊन खंबीरपणे लढत राहिली. सावकाराकडे गहाण पडलेला आपल्या जमीनीचा तुकडा सोडवला. एक माय दुसऱ्या मायला सावकाराकडून सोडवते. हा भावनिक प्रसंग जीवनसंघर्षकार कवी नवनाथ रणखांबे आपल्या "आभाळ होताना माय" या कवितेत लिहितात,----**तुला मी पाहिलय माय**
**आभाळ फाटताना माय**
**आभाळ फाटताना माय**
**तुला मी पाहिलय माय**

कवितेच्या मध्यभागी कवी म्हणतात,----

**जमीन गहाणीची**
**हिंमत लांडग्यांची**
**दांडगाई गेहीच्या परक्यांची**
**माती सोडवली मायेची..**

कविता ही कवीची सहजा सहजी निर्माण झाली नसून अनुभूतीची गर्भधारणा होऊन कवीच्या कवितेची निर्मिती झाली आहे. माणसाच्या जीवनात अनेक चड उतार येत असतात. माणसाला जीवनात जगताना सुख दुःखाला सामोरे जावे लागत. माणूस सुख आनंदाने स्विकारतो आणि दुःखला मात्र समोरे जावयाला घाबरतो. दुःख समोर यावयाच्या आदीच हार मानतो आणि डोळ्यातून अश्वांचे पाट व्हावू लागतो. असेच काही कवी बरोबर घडले असावे म्हणून कवी आपल्या "थेंब" या कवितेत लिहितात,

**दुःखाचा समुद्र डोळ्यात दाटल्यावर**
**टपटपतात टपोरे थेंब**
**कविता होऊन कागदावर......**

प्रेम घेण्या पेक्षा प्रेम देण्यात परम आनंद आहे. प्रेम द्यावे आणि जगाला सुखी आनंदी करावे . हाच हेतू कवीच्या मनात असावा. म्हणून कवी तिच्या वाटेवर येरजाऱ्या घालताना "मन" या कवितेत कवी लिहितो, ------

**मन तुझ्यासाठी माझं दररोज झुरायचं**
**प्रेमात भेटीसाठी तुझ्या वाटेवर फिरायचं**

मित्र हो ! आज काल देशातील राजकारणी महामानवांचा अपमान करतात माहामांनवाबद्दल अपशब्द वापरतात. तरी ते प्रत्येक ठिकाणी उपस्थिती लावतात आणि त्यांचा सत्कार केला जातो. अशा लोकांना विरोध करणाऱ्या संविधान रक्षकांना मात्र पोलीस कोठडी.असेच काही चित्र कवीच्या डोळ्यासमोर उभे राहिले असावे म्हणून कवी आपल्या सुजलाम सुफलाम या कविते लिहितात,

**संविधान तत्त्वे कर्तव्य पाळूया**
**भारताचे आदर्श नागरिक बनू चला**
**संविधानाचे संरक्षण संवर्धन करूया**
**देशाला जागतिक महासत्ता बनवू चला**

जगाला महासत्ता बनवण्यासाठी आपण संविधान तत्वे कर्तव्य पाळायला कवी सांगतो. संविधानाचे रक्षण आणि संवर्धन करण्याचा सल्ला देऊन भारताचे आदर्श नागरिक बनण्यासाठी प्रेरणा आणि प्रोत्साहन कवी देतो आहे. देशाला जागतिक महासत्ता बनवायचा विचार देशात हा प्रेम उठावकार कवी पेरत आहे.

कधी कधी जीवनात असा चढ - उतारांचा क्षण येतो आणि असे काही घडते की आपल्या हृदयाच्या ठोका चुकून जातो व पुढचं आयुष्य जगण्यासाठी एक नवीन धडा देऊन जातो. हे व्यक्त होताना कवी शेवटच्या चार ओळीत 'झोका' या कवितेत लिहितात, -----

**जगण्याचा झोका खाली वर येतो**
**जीवनाला माझ्या धडा देऊन जातो......**

'प्रेम उठाव' जीवन संघर्षकार कवी नवनाथ आनंदा रणखांबे लिखित वाचनीय काव्यसंग्रह आहे. शारदा प्रकाशन ठाणे यांनी तो प्रकाशित केला आहे. या काव्यसंग्रहातील कविता प्रेमाने जग जिंकणाऱ्या प्रेम चळवळीतील कविता आहेत. या काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठ सतीश खोत यांनी रेखाटले असून दोन्ही हात साखळीने जखडून मुठीत लेखणी आहे. हेच वाचकांचे मन आकर्षित करून वाचकाला वाचण्याची आवड निर्माण करते. 'प्रेम उठाव' हा कविता संग्रह स्वातंत्र्यता, समता आणि बंधुता शिकवणारा काव्यसंग्रह आहे.

**काव्यसंग्रह : - प्रेम उठाव**
**कवी: - नवनाथ आनंदा रणखांबे**
**प्रकाशन: - शारदा प्रकाशन ठाणे**
**पुष्ट:- ६२ मुल्य:- ९० पुस्तक परीक्षण :**
**- पांचपीर ट्रस्ट मोहाडी**
**संस्थेचे संचालक:- कवी. शाम परशुराम बैसाणे. नंबर.9324790208**
**पवई, मुंबई.**

# लालसा संपल्याशिवाय सम्राट होता येत नाही



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**लालसा संपुष्टात आल्याशिवाय सम्राट होता येत नाही . आपल्या जीवनातील सगळ्या दुःखांचा मुळ फक्त लालसा असुन लालसा हा आत्म्याचा नाही तर शरिराचा महाभायानक आजार आहे. ज्याचा उपचार सहजासहजी होत नाही आणि आपल्याला आत्मा शरिर यामध्ये नेमकं काय आहे हेच उमजत नाही . आत्मा अमर आहे .शरिर हे नश्वर आहे. लालसा ही आत्म्याची व्याधी नाहीच मुळी पण आपण आत्मस्वरूपावरून जीवन न जगता शरिरावरून जगतो आणि सगळा मेळ इथून गडबडतो .मन समाधान असणं खूप गरजेचं आहे. मन समाधानी होऊन ज्याची लालसा संपुष्टात आली त्याच्या कडे दुःखाचा मुक्काम संपला हे निश्चित.**

मुळात सम्राट म्हणजे काय हिच आपली संकल्पना स्पष्ट नसते प्रत्येक जण आपापल्या वैचारिक क्षमतेनुसार त्या त्या क्षेत्रातील सम्राट ठरवतं असतो त्याच मुल्यमापन पण प्रत्येकाच्या व्यक्तिगत मतानुसार ठरत असतं . जगतातील वेगवेगळ्या क्षेत्रातील सर्व भौतिक संसधान अर्जित करण , संपत्ती पैसा ,ज्ञान , नावलौकिक,पद हे सगळं अर्जित करण म्हणजे सम्राट होण असं आपलं मत असण गैर नाही . पण हेच मत वास्तविक दृष्टीने सत्य नाही.भौतिक संसधान विषयी फार उत्सुकता नसण आणि जे जे काही अगदी सहजगत्या आणि निति धर्म मार्गाने प्राप्त होईल ते पर्याप्त झालं पाहिजे वाटलं पाहिजे. पर्याप्त वाटलं कि इच्छांवर नियंत्रण प्रस्थापित होत . आणि त्याग वैगरे याच फार काही वाटत नाही आणि याच दरम्यान व्यक्ती हे सगळं त्यागण्याची तयारी दाखवतो व मुळात जो लालसा त्यागतो तो खरा सम्राट होय. सगळ्यात मोठी उपाधी आणि जीवनातील सर्व श्रेष्ठ सार्थकता म्हणजे सम्राट होण .पण सम्राट होण्यासाठी त्यागाची आवश्यकता असते आणि हाच त्याग करणं किंवा होण हे सहजासहजी शक्य होत नसत . त्यासाठी त्याग वृत्ती निर्माण झाली पाहिजे म्हणजे लालसा मोह, माया, स्वार्थ ह्या बाबी पासून आपण दुर राहिल पाहिजे म्हणजे आपोआपच आपल्या मध्ये त्याग वृत्ती जोपासली जाते आणि आपण लालसा मुक्त होतो . आणि खरया अर्थाने जीवन सार्थकी लागत .प्रत्येक व्यक्ती हा जन्माला आला की सम्राटच आहे पण तो कधीपर्यंत तर अगदी जन्मापासून बालपणा पर्यंत म्हणजे बालपणीची कथा संपुष्टात आली कि हाळुहाळु आपल्या मध्ये लालसा निर्माण होते व विशालकाय रूप धारण करते. एकंदरीत जीवनातील सगळ्या भौतिक विषया संदर्भात लालसा आपल्याला खेळवत राहते .पण हा खेळ आपल्या लक्षात येत नाही आणि मग याच छोट्या छोट्या विषयासंदर्भात आपण सदैव ताण तणावात, दुःखात आनंदात म्हणजे एका चक्रव्यूहात फिरत असतो . आणि मग इथंच आपलं सम्राट पद आपल्या पासून खरया अर्थाने दूर जात . वास्तविक ज्याच इच्छेवर नियंत्रण प्रस्थापित झाल आणि जो लालसा मुक्त आहे तो या सृष्टीवरील सगळ्यात मोठा सम्राट आहे. उलट आपण हे सगळं सोडून काय शोधतोय आणि काय नाही याचाच खरा शोध आणि बोध आपल्याला झाला नाही. तसं पाहिलं तर सम्राट होण फार काही अवघड नाही कठिण नाही. अगदी सहजासहजी आपण सम्राट होऊ शकतो. पण छोटे छोटे निरर्थक विषय आपल्याला अडकून ठेवतात आणि हिच बाब आपल्या वेळीच लक्षात येत नाही आणि आपण सार्थक गोष्ट सोडून निरर्थक गोष्टींच्या मागे धावतो. सांसर आणि जीव यामध्ये जे नातं आहे ते म्हणजे मोह आणि लालसा हेच मुख्य नांत सुधारल पाहिजे आणि जीव हा लालसेतुन मोह मुक्त झाला तर तो जीव सर्व श्रेष्ठ ठरला. जगतील सगळं ज्ञान तत्वज्ञान हे मानवी मुल्य जोपासण्यासाठी आणि नितिमान, न्याय निष्ठ, सात्विक व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी आहे पण या कडे लक्ष्य दिले पाहिजे. ज्याला आत्मा समजला आत्मस्वरूप समजलं त्याला त्याची लालसा संपुष्टात आल्याशिवाय राहत नाही.आणि तो एकदा लालसा संपुष्टात आली कि मग व्यक्ती सदैव सम्राटाच् असतो आणि एकदा आयुष्यभरासाठी सम्राट होता आलं कि मग आयुष्यामध्ये शिल्लक काय उरत.

## तवा बाप माझा चंदनावानी झिजला

डोळ्यांचा पाळणा अन
ओंजळीची झोळी करुनी
तळहातावरच्या फोडावानी
पिला लेकरांना मोठ केलं
लेकरांच्या पोटभर घासापायी
घोटभर पाणी पिऊनी
रात रात उपाशीच निजला
तवा बाप माझा चंदनावानी झिजला

अनवाणी पायांनी ढेकळातून
काट्याकुट्याच्या वाटवरनं
दुःख गरिबी तुडवत राहिला
घामाच्या धारातुनी फाटक्या
नशिबाला ठिगळ जोडत
उन्हातान्हात पावसात राबत
डोंगरावानी उभा राहिला
तवा बाप माझा चंदनावानी झिजला

लेकरांना शिकवण्याच्या सपनापायी
कर्जाच्या फासात अडकला
दुःखान कळवळणाऱ्या लेकीसाठी
सायकलवर वाऱ्यावानी धावला
लेक परक्या घरी जाताना
आईच्या आसवा माग दडला
आसवा माग दडूनी काळजात रडला
तवा बाप माझा चांदणावानी झिजला

प्रकाश शिवाजी भोंगाळे
मायणी, ता. खटाव सातारा

## वास्तव

वास्तवाचे चटके मी स्वप्नांच्या रेषेने ,
ओढत अन् जोडत होते....
कल्पनेच्या विश्वातले रंग,
मी मनमुराद भरत होते.......
चितारली रांगोळी मी माझ्याच,
मनाच्या अंगणात.......
रांगोळी काढता, काढता मी,
रमले माझ्या भावविश्वात......
ठिपक्यांच्या जागी मनी
चांदणे जणू उमलले.....
आकाशातील चंद्राने माझ्याच,
अंतरंगात डोकावले.........
सुरू झाला एक
लपाछपीचा खेळ.....
वास्तवाचे चटके आता,
ठिपके होऊ लागले......
कल्पनेच्या चांदण्या आता,
स्वप्नांच्या रेषेवर धावु लागले.....
रेषा पुसट झाल्या पण... त्याच भान
ना ठिपक्यांना, ना चांदण्यांना.......
विस्कटलेल्या रांगोळी बरोबर,
जणू काही माझे मनही विस्कटलेले होते...
जणू काही त्यालाच तर जाणवत होते,
फक्त आणि फक्त,"वास्तवाचे चटके"
म्हणूनच , आयुष्याची स्वप्ने पाहताना,
वास्तवाला विसरायचं नसतं...
गुलाबाला स्पर्श करताना,
जरासं काटयाचही " भान " ठेवायच
असत...

- पल्लवी नाईक

## मकरसंक्रांत!



संक्रात ही देवी असून
त्यात येई मकर रास,
स्त्रियांच्या नव्या वस्त्राने
संक्रात वाटते खास.
पितरांची पूजा करी
तीळ- उदकाचे दान,
साऱ्या मिश्रणाच्या भाज्या
एकमेकास देई वाण.
बाजरीच्या भाकरीवर
तीळ टाकून खातात,
सुगडे घेऊन स्त्रिया
मंदिरात जमतात.
सूर्याची गती वळते
दक्षिण- उत्तरेकडे,
स्त्रिया एकदुसऱ्यांना
भेट देतात सुगडे.
आनंदाने पुरुष - मुले
हे पतंग उडवितात,
तीळगूळ देऊनीया
गोड - गोड बोलतात...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
मो. ९७६४३५०३७४

## होऊ नये भंग..

छाटुनिया पंख
केले जायबंदी
विहार स्वच्छंदी
कैद केला..
अगतिक जीणे
आक्रंदते मन
सोसे तन-मन
हेटाळणी..
रखडता पाय
परवड झाली
वेडावत गेली
पायवाट..
जगणे माझे हे
विदुषकी खेळ
येऊ नये वेळ
कुणा अशी..

पाठशिवणीचा
अडचणी खेळ
ठोकलासे तळ
संकटांनी..
जिंकण्याचा खेळ
बांधला मी चंग
होऊ नये भंग
हीच इच्छा..!

- महादेव बी. बुरुटे,
शेगाव, ता. जत, जि. सांगली

## मकरसंक्रांत!

तिळ-गुळ घेवूनी
मकरसंक्रांत आली
हिरवी वसुंधरा
चैतन्यात न्हाली
नवे संकल्प
घेवूया हाती
स्नेहाने जपूया
मायेची नाती
उंच आकाशी
उडवूया पतंग
खेळतांना होवूया
आपण सारी दंग
कायम विसरूया
मनातील कडवटपणा
गोड गोड बोलूया
एक दुसऱ्याशी पुन्हा
नको आता भांडण
नको आता खोडी
मनी बाळगूया
तिळ गुळाची गोडी

- रवींद्र व्ही. चालीकवार
मो.9011559106

## तिन्हीसांजा



कुठुन एकसा ढग शुभ्र तो
विहरत होता नभामधे
पक्षीही वाट चुकला तेव्हा
पाहत होता तुझ्याकडे

लालसर आभाळी फडके
जरीपटका तो वनामधे
हर महादेव घोष एकसा
दुमदुमला हो मनामधे

सर्पाच्या त्या वावटळीने
मार्ग उमटला मातीमधे
वार्यासही हवेसे वाटे
घोंघावणे त्या झाडीमधे

कसे कायसे वर्णन करु मी
सृष्टीचे ह्या काव्यामधे
साठवणे ते अवघड आहे
निसर्गास त्या शब्दांमधे

- © स्वानंद नंदकुमार
मराठे

## वास्तव

सूर्यालाही ग्रहण लागते
रामालाही हो वनवास
तुमचे आमचे जगणे हे तर
अर्धे सत्य, अर्धा भास

"यंव करू अन् त्यंव करू"
पोकळ डौल, खोटी आस
चेहरा ठेवू जरी हसरा
आतुन असते चित्त उदास

"नको काळजी, घोर, चिंता"
म्हणणे सारे सोपे असते
वेळप्रसंगी, अन्न राहू द्या
पाणीसुद्धा घश्यात बसते

स्वप्नकळ्यांची फुले होऊनी
सुगंध देतील- खात्री काय?
गालिच्यावर चालतांनाही
कधी फाटक्यात जातो पाय

उद्धव भयवाळ
औरंगाबाद
मो:8888925488

## संक्रांत



अशुभ नसते संक्रांती
उगाचं जातो भिऊनि
सण साजरा उत्साहे
धर्मा शास्त्रा समजूनि
तिळगुळ रे देता घेता
स्नेह भावाला वर्धुनि
करावे प्रेम वृध्दिंगत
आपपर वैरास वधुनि
दानधर्म हे उत्तमकर्म

घडावे चांगले हातूनी
सर्वे भद्रणी पश्यंति
हुंकार यावा आतुनि
पतंगोत्सव आनंदाचा
सकल धर्मिया घेऊनि
पर्यावरणा सांभाळावे
नियमा सन्मान देऊनि
हळदी कुंकू समारोह
विधवासधवा घेऊनि

बोरन्हाण बालकांना
हलवादागिने घालूनि
मानवैः दव्यकव्यानि
संक्रांतौ यानि दत्तानि
तानि नित्यं ददात्यर्कः
लाभ होई पुनर्जन्मनि

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६..

## शेवटी मास्तर व्हायचं राहून गेलं

खूप अभ्यास करूनही
मास्तर होता आलंच नाही
शाळा खूप शिकूनही
शाळेत जाता आलंच नाही.

पदवी घेऊन शिक्षकांची
फिरलो खूप शाळावरी
फक्त पदवी मला मास्तर
कधी बनवू शकलीच नाही.

खूप वर्ष झाली आता
अजूनही लढतो आहे
आस मनी जागी ठेवून
जाहिराती बघतो आहे.

बरोबरचे शिक्षक होऊन
तप उलटून गेले आहे
मी मात्र पोर्टलची
वाट पवित्र बघतो आहे.

गांधी फुले अन लेनिन
सारेच वाचून झाले आहे
पोटासाठी लहानसहान
काम करता झालो आहे.

गावातील टोळबहिरे
मास्तर म्हणून हिनवत आहे
औकात सोडून नादान लोक
मला फक्त हसत आहे.


शिक्षण सारं वाया गेलं
गोड समजूत वेड्यांची
गाढवांना कसं सांगू
चव खूप गोड गुळाची.

मनी एकच खंत आहे
जग सारं वाचून झालं
अन मास्तर होता होता
शेवटी मास्तर व्हायचं राहून गेलं..

ज्ञानेश्वर गायके.कन्नड
मो.९४०३३८४८८९



## पहिले प्रेमपत्र



हळुच बाहेर डोकावता
तुझे ते प्रेमरुपी पत्र आले
पोस्टमनचे आभार मी
मनातुन व्यक्त केले..

तू अंतराने जरी दूर अससी
पत्रातुनी सारे कळले
तुझे ते पहिले अक्षर 'प्रिय'
या शब्दानेच मी भारावून गेले..

प्रेमरुपी पत्र वाचता
भान माझे हरवूनी गेले
कधी मज भेटशील तू
मन हे खुप आतुर झाले..

स्वप्न तुझे पाहती या मना
काही कळेनासे झाले
नयनी पाहता तुजसी
जसे स्वप्नातुनी जागे झाले

कोरीव तुझे डोळे,
तुजसी न्याहाळत राहिले
तुझ्या प्रेमात मी पुरती
चिंब न्हावूनी गेले..

तुझं प्रेम लाभण्यासाठी
भाग्य माझे उजळले
आरशात पाहुनी मजला
मनातच मी लाजले..

या सौंदर्याचाआहेस
फक्त तुच हकदार
साथ तुझी माझी
असेन जन्म-जन्मांतरात..

@सौ.भाग्यश्री दायमा.



# प्रार्थना ! जगातलं कुठलंच शिक्षण विनाअनुदान तत्वावर असू नये !

## संयमाचा परीघ



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226



चित्र : बाबूराव पाटील, भोकर

भाग : ११

आधुनिक केसरी

**लेकरा-बाळांपुढं हात पसरण्याची नामुष्की न येवो कुण्याही माय-बापांवर आणि काम न करता भाकर खायची लाज वाटो धडधाकट माणसांना ! शरीर आणि मेंदूच्या मदतीनं केलेल्या कामाच्या मोबदल्यात फार मोठी तफावत नसो !**
**जगातल्या कुढल्याच जागी कुणाचंच कसलंच शोषण न होवो ! येणे किती आहे कुणाकडून हे नाही लक्षात राहिलं तरी चालेल...**
**परंतू आपण परताव्याच्या वचनावर जवळच्या माणसांकडून हातउसन्या घेतलेल्या मदती न चुकता वेळेच्या आत देऊन होवोत. आणि ही अगदीच अंत:करणपुर्वक प्रार्थना की...**
**या जगातले एकून एक सगळे दवाखाने बंद पडोत ! या जगातले पोलीस स्टेशन्स बंद पडोत ! या जगातल्सा सगळ्या न्यायालयांना कुलपं लागोत ! कुण्याही देशाचा करोडो रुपयांचा चुराडा केवळ सीमा सुरक्षेवर खर्च होतो आहे तेंव्हा... कुठल्याच देशाच्या सीमेवर कसलाच खर्च करण्याची गरज न पडो !**
**कुणी लुबाडू नये कुणाला, कुणीच कुणाची कुचीनिंदी करु नये.**
**पशू पक्षी सगळे सगळे निर्भय राहोत आपापल्या परीस्थितीकीत. सुखी समाधानी राहोत जगातले सगळेच लोक आणि सगळ्याच लोकांना सगळ्यांबद्दल आपुलकी प्रेम आणि जिव्हाळा लाभो ! एकुन एक सगळे लेकरं मग ते कुणाचेही असोत, शाळेत जावोत आणि जगातली कुठलीच शाळा, कुठलंच महाविद्यालय, कुठलंच विद्यापीठ विनाअनुदानावर नसो !**

देश घडतो म्हणजे नेमकं होतं काय ? नेमकं काय झालं म्हणजे देश घडला असं समजायचं ? सुखी देशाच्या आहेत काय आपल्या संकल्पना ? जिथं एकाच पानवट्यावर सगळे पशू पाणी पित असतील असं चित्र की आपापल्या पानवठ्यांवर गुण्यागोविंदानं हुंदडत असतील बछडे,पाडसं, कोकरं, वासरं, लेकरं असं कांही ? कशाला म्हणायचं सुंदर जिथं कुणीच उपासपोटी झोपलं नाही त्याला की जिथं उस्ट्या खरकट्यांनी अर्ध अधीक अन्न वाया चाललं आहे त्याला? काय आहे आपली आनंदी जीवनाची, आनंदी जीवनाची व्याख्या ? देश सुखी असतं म्हणजे असतं तरी काय ? जिथं जोथपुरी घालून फोडले जातात तो की जिथं पाच वेळा नमाज पढला जातो तो ? काय चित्र आहे काय आपल्या मनात समाधानी देशाचं ? जिथं दोनहजारांच्या नोटांच्या भिंती रचून ठेवल्या आहेत ती तळघरं की जिथं सोन्याचांदीच्या दागदागिण्यांचे ढिगच्या ढीग लावून ठेवले आहेत माजघरात ? जिथं बायकांना रस्त्यावर दागीने घालून चालणं म्हणजे जिवावर बेतनं आहे तशी परीस्थिती की जिथं वस्त्रालंकारांशीवाय केवळ फिगर प्रेझेंटेशनला अदा म्हटलं जातं ? काय आहे काय आपली सुखी समाधानी देशाची, राज्याची, जिल्ह्याची, तालुक्याची, गावाची, घराची आणि मनुष्याची संकल्पना आपली ? देश सुखी समाधानी असतो म्हणजे नेमकं असतं तरी काय ?

आपला देश वर्ण आणि वर्ग व्यवस्थेनं विभाजीत केलेली माणसं आहेत. आपला देश मुळात जात,धर्म, भाषा, वेश, पर्यावरण, प्रांत आणि लिंग भेदानं बुरसटून गेला आहे. इथल्या या जटील प्रश्नांवर तोडगा काढण्याचं जिकीरीचं काम भारतीय राज्यघटनेनं केलं आहे परंतू ती राबवनारी, घटनाबरहुकूम अम्मल करणारी यंत्रणाच जर विवेकी वागत नसेल तर अराजकाला आवतनं दिल्यासारखं आहे.आपापली जात आणि आपापला धर्म यापलिकडं जर कुणीच बघणारंच नसेल तर चांगुलपण उबद-या येणं मोठी अवघड गोष्ट आहे. जाती धर्माचा अहंकार फार लवकर विकसीत होतो आणि त्याच दृष्टीने सगळेज समाज घटक कामं करत बसणार असतील तर मोठी अवघड गोष्ट आहे. मी शिक्षक आहे आणि माझ्या वर्गात देश बसत असतो. मला सगळ्याच लेकरांना शिकवायचं असतं. मी माझ्याच जाती धर्माच्या लेकरांना जवळ करुन कंपू करत असेल तर मला देश कसा घडवता येईल ? माझ्या आभ्यासक्रमांच्या पुस्तकातच माणसात माणसं न ठेवणारं तत्वज्ञान असेल तर मी काय शिकवायचं ? माझीच नजर आणि नजरीया, दृष्टीकोन जाती धर्माच्या पलीकडं जात नसेल तर मला काय अधिकार आहे शिक्षक म्हणून मिरवण्याचा ? पुरोगामी म्हणवणारे लोकही मला हे असे आपापल्या जाती आणि धर्मापलिकडं जाताना दिसत नाहीत.

आपला देश आपलं संविधान ! आपलं संविधान आपला धर्म.असं कांहीसं सारखं येत रहातं मनात परंतू ते भवतालात रुजंत नाही आणि जाणिवपुर्क कुणी रुजवण्याचा प्रयत्न करतानाही दिसत नाही. कांही संस्था आहेत जिथं मानवता मूल्य रुजवली जातात परंतू हे सगळीकडं होताना दिसत नाही. कुठलंही काम असो, ते आपलं नाही, सरकारचंय, सरकार बघून घेईल.किती सहज जबाबदारी झटकून देतो आपण ? अरे बाबा, तू म्हणजे सरकार. तू मतदार आहेस ना ? तू मतदान केलंस ना ? तू निवडून दिलास ना पंच, सरपंच, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, आमदार, खासदार. तू नाही का निवडला मुख्यमंत्री, पंतप्रधान ? तू नाहीस का या देशाचा जबाबदार नागरीक ? तुला माहीत आहे का नागरीकाची सनद ? मग तुला नागरीकांच्या कर्तव्याचाही विसर पडता कामा नये ना !

तू जबाबदारी झटकलीस म्हणून देश सुखी नाही.
तू जबाबदारी झटकलीस म्हणून गाव सुखी नाही ?
तू जबाबदारीनं वागंत नाहीस म्हणून घर सुखी नाही.
तू स्वतःला कटघरात कधी उभा करुन पाहिलंस ?
तू इमानदारीनं सांग...तू तुझ्या धर्माचा एवढा अभिमान बाळगतोस...
तू तुझ्या धर्माचं तत्वज्ञान वाचलंस ?
तू तुझ्या देशाचं संविधान वाचलंस ? किमान उद्देशपत्रीका ?
तुला अजूनही वाटंत नाही तुझ्या देशातले सगळे लोक शिकून शहाने व्हावेत...
तू कसे रोखनार आहेस हे वाईट वकटे लोक निर्माण होण्यापासून ? तू कसे रोखणार आहेस हे पोलीस स्टेशन्स, दवाखाने, न्यायालये तुडूंब भरण्यापासून ?
तू गुणवत्तेचं शिक्षणच जर दिलं नाहीस सगळ्यांना तर तू हे कसंच रोखणार आहेस देशाचं अधःपतन ?
कमाल आहे !
सन्मित्रा ! मला तुझी कीव करावी वाटते.

**(लेखक मराठी भाषेचे साहित्यिक आणि इंग्रजी साहित्याचे संशोधन मार्गदर्शक आहेत)**



# कु.पूजा सांगळे लिखित 'आयुष्य : आव्हान आणि संघर्ष' या पुस्तकाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**शिरवाडे वाकद :** सध्याची युवा पिढी ही सामाजिक माध्यमांभोवतीच गुरफटली आहे, मात्र या गोष्टीला छेद देत पुजा सांगळे हिने ग्रामीण भागात राहूनही तिची प्रतिभा दाखवत पुस्तक लिहिले ही सर्वांच्या दृष्टीने अभिमानास्पद बाब आहे. माझ्या मतदार संघातील सुमारे साडेपाच हजार शाळांमध्ये हे पुस्तक पोहोचविण्यासाठी मी प्रयत्नशील राहील", असे प्रतिपादन शिक्षक आमदार मा.किशोर दराडे यांनी केले.

सत्यगाव ता.येवला येथील प्रतिभावंत अशी कु.पूजा सांगळे हिच्या, 'आयुष्य आव्हान आणि संघर्ष' या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध व्यंगचित्रकार प्रभाकर झळके होते. साहित्य टिकले तरच संस्कृती टिकेल. साहित्य वाचनाने माणूस समृद्ध बनतो. प्रतिभा ही कुठल्याही विशिष्ट वर्गाची मक्तेदारी नाही, त्यामुळे सत्यगाव सारख्या सामान्य कुटुंबात जन्मलेली पुजा इतक्या कमी वयात साहित्य निर्मिती करून ग्रंथ प्रकाशित करते ही नक्कीच अभिमानास्पद बाब आहे, असे प्रतिपादन जेष्ठ हिंदी अनुवादक, समीक्षक प्रा. डॉ.जिभाऊ मोरे यांनी केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रसिद्ध व्यंगचित्रकार प्रभाकर झळके यांनी पूजा सांगळे हिच्या प्रतिभेचे, लिखाणाचे कौतुक करत तिच्या हातून अधिक पुस्तके लिहिली जावीत अशा शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास गुरुवर्य राजू बाबा सोनवणे, विवेकभैय्या कोल्हे, कांदा उत्पादक संघटना अध्यक्ष भारत दिघोळे, प्रवीण गायकवाड, मनसे नाशिक जिल्हा उपाध्यक्ष अनंत सांगळे, कवी लक्ष्मण बारहाते, लेखक, पत्रकार किरणकुमार आवारे, कवी, गझलकार शरद शेजवळ, राजरत्न वाहूळ आदी व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.अश्विनी सांगळे हिने तर आभार डॉ.ईश्वर आव्हाड यांनी मानले. कार्यक्रमास विष्णू वाघ, बाळासाहेब गुंड, छगन आहेर, नारायण आव्हाड, सुनील आहेर, वाल्मिक सांगळे, संतोष आहेर, नानासाहेब सांगळे, उत्तम सानप, सुनील ससाणे, प्रकाश कांगणे, विजय आहेर, बाळकृष्ण सांगळे, दत्तात्रय सांगळे,आबाजी सांगळे, विठ्ठल दराडे, तुषार सानप, सागर बोडके, सुभाष सांगळे, विठ्ठल बडवर आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सर फौंडेशन टीचर इनोव्हेशन नॅशनल अवॉर्ड जाहीर





आधुनिक केसरी न्यूज




**सोलापूर :** स्टेट इनोव्हेशन अँड रिसर्च फाउंडेशन (सर फाउंडेशन) महाराष्ट्र तर्फे राष्ट्रीय स्तर नवोपक्रम स्पर्धा..2022 आयोजित करण्यात आली होती या स्पर्धेतील नवोपक्रमासाठी अरण ता माढा येथील शांता वाघमोडे, कल्पना घाडगे उपळाई येथील प्रतिभा नवले करकंब केंद्रातील आदर्श शिक्षक नागनाथ घाटुळे व माळशिरस तालुक्यातील सोनी कानाडे सर फौंडेशन टीचर इनोव्हेशन नॅशनल अवॉर्ड 2022 हा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. मार्च मध्ये 2023 मध्ये नियोजित असणाऱ्या दोन दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील एज्युकेशन वितरण होणार आहे ही कॉन्फरन्स नामवंत संस्था सनदी अधिकारी शिक्षण विभागातील उच्चस्तरीय अधिकारी वर्ग जेष्ठ शास्त्रज्ञ शिक्षण तज्ञ यांच्या उपस्थित होणार आहे.



आधुनिक केसरी न्यूज

परभणी येथे पार पडलेल्या विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत उत्तम कामगिरी करत मेजर कुलथे डिफेन्स एज्युकेशन इंस्टिट्यूट एम. जी. एम स्कूल औरंगाबाद यांनी प्रथम क्रमांक पटकावला. अंतिम सामना हा परभणी ग्रामीण या संघाला नमवून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी टीमचे नाव शिक्कमोर्तब केले. द एम जी एम स्कूलला विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकवला मेजर कुलथे डिफेन्स एज्युकेशन इंस्टिट्यूट, द एम जी एम स्कूल संयुक्त विद्यमाने संघ व्हॉलीबॉल १९ वर्षा खालील मुले प्रथम क्रमांक अशी कामगीरी केली. डायरेक्टर, द एम जी एम स्कूल रणजित कक्कड, प्रेसिडेंट मेजर कुलथे डिफेन्स एज्युकेशन इंस्टिट्यूट, मेजर चंद्रसेन कुलथे, प्रिंसिपल सुनिता उदगीरकर, सेंटर हेड श्री घनश्याम सिंग, प्रशिक्षण अधिकारी अजय पाटील, शारीरिक शिक्षण प्रशिक्षक अनिकेत तायडे, क्रिडा प्रशिक्षक लोकेश ठाकरे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# शांताराम मगर यांना राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ प्रेरणा पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** अंधश्रद्धा निर्मूलन वैज्ञानिक दृष्टिकोन समिती यांचेकडून दरवर्षी दिला जानारा मानाचा राजमाता जिजाऊ प्रेरणा पुरस्कार १५जानेवारीला कल्याण भवन धुळे येथे शिवशाहिर विजय तनपुरे व मान्यवरांच्या हस्ते शांताराम मगर यांना प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ब्रिगेडियर संतोष मासुळे, ए. एम आहेर, हर्षवर्धन दहिते, अतुल निकम, डी. बी. पाटिल तर अंधश्रध्दा निर्मुलन व वै.समितीचे रंजन खरोटे, तानाजी शिंदे सचिव रत्ना शिंदे व बळिराजा आत्मसन्मानचे अध्यक्ष जितेंद्र वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती. शांताराम मगर यांनी पत्रारीता.फोटोग्राफी. अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रात ऊल्लेखनिय काम केल्याबद्दल त्यांचा राजमाता जिजाऊ प्रेरणा पुरस्कार देण्यात आला. शांताराम मगर एक उत्कृष्ट छायाचित्रकार अभ्यासू पत्रकार, लेखक व शोध पत्रकारीता निर्भिड पत्रकार म्हणूनओळखले जातात. त्यांचे कार्य नव्या पिढीसमोर कायम राहावे या विधायक हेतूने हा पुरस्कार उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीना पुरस्कार दिला जाणार जातो मगर यांची प्रिंट मीडियातून यांनी सातत्याने ग्रामीण विकासाच्या प्रश्नांना त्यांनी वाचा फोडली आहे. सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून विधायक व सुसंस्कृत पत्रकारितेचा वसा व वारसा त्या जोपासत आहेत. तसेच शेती शिक्षण, महिला सबलीकरण, साहित्य व आध्यात्मिक सांस्कृतिक शैक्षणिक राजकीय क्षेत्रांतील दैनंदिन घडामोडींवर लक्ष वेधून घेणारी विधायक व विकासात्मक पत्रकारिता हा त्यांच्या आवडीचा विषय आहे मगर यांना राज्यस्तरिय राजमाता जिजाऊ प्रेरणा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

अंधश्रध्दा निर्मुलन व वैज्ञानिक समितीचे रंजन खरोटे, तानाजी शिंदे व बळीराजा आत्मसन्मानचे जितेंद्र वाघ यांच्यासह विविधक्षेत्रातील,सामाजिक कार्यकर्ते अनेक मान्यवरांनी शांताराम मगर यांना शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.



# लासूर स्टेशन मराठी पत्रकार संघातर्फे फडात जाऊन ऊसतोड कामगार महिलांना साडीचोळी वाटप



आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथील मुबंई मराठी पत्रकार परिषद संलग्न मराठी पत्रकार संघातर्फे थेट वैजापूर तालुक्यातील उसाच्या फडात जाऊन सुवासनीचा सण असूनही संक्रातीच्या दिवशी सुवासनी असणाऱ्या ऊसतोड कामगार महिला ऐन संक्रातीच्या दिवशी ऊसतोड करत असल्याचे चित्र उंदीरवाडी येथील छबुराव कदम यांनी संघटनेच्या पदाधिकारी याना कळविले त्यामुळे लासूर स्टेशन येथील मराठी पत्रकार संघटनेच्या पदाधिकारी यांनी लगेच वैजापूर तालुक्यातील राहेगाव येथील ऊसतोडणी चालू असलेल्या एका शेतकऱ्याचे शेत गाठले व त्याठिकाणी ऊसतोड करत असलेल्या उसाच्या फडातील शंभर महिलांना लासूर स्टेशन मराठी पत्रकार संघातर्फे साड्या वाटप करण्यात आल्या यावेळी ऊसतोड करत असलेल्या महिलांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. यावेळी मराठी पत्रकार संघटनेचे पदाधिकारी सर्वश्री मकसूद शेख, रामेश्वर केरे, अप्पासाहेब वंजारे, गुलाब वाघ,रामेश्वर श्रीखंडे, राजेश धनाड,मेहमूद भारतवाला,सलीम सय्यद,बाळासाहेब कदम,मनीष मुथा,राहेगाव ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंचपती विनोद कदम,उपसरपंच पांडुरंग बोरकर,अशोक गडकर,उत्तम अहिरे, सतिश बोरकर, प्रकाश बोरकर, रवी अहिरे,छगन कुऱ्हे,पांडुरंग मोरे, आदींची उपस्थिती होती. छबुराव कदम (ग्रामस्थ उंदीरवाडी ता.वैजापूर)ऊसतोड महिलांची संसाराचा गाडा हाकलण्याचीं धडपड महिलांचा महत्वाचा सण असलेल्या संक्रातीलाही थांबत नाही हे विदारक चित्र वर्षानुनर्ष चालू आहे देश भलेही आर्थिक महासत्ता होण्याच्या मार्गांवर आहे पण महाराष्ट्रात अजूनही महिलांची परिस्थिती विदारक आहे त्यामुळे लासूर स्टेशन येथील पत्रकार संघाने राबवलेला उपक्रम स्तुत्य आहे दरम्यान आम्ही ही संकल्पना गेल्या 21 वर्षांपासून राबवत आहे पहिले आम्ही बांगड्या वाटप करायचो परंतु आत्ता पंधरा वर्षांपासून साडी चोळी वाटप करत आहे.

> मी जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव येथील रहिवाशी असून दोन मुले आहेत मात्र संसाराचा गाडा हाकलताना पतीला हातभार लावण्यासाठी गेल्या कित्येक वर्षांपासून ऊसतोडीचे काम करत आहे मात्र आज संक्रातीच्या दिवशी पत्रकार बंधूनी दिलेली साडीची भेट ही माहेरची साडी असल्याचे भासले.
> मनीषा मोरे (ऊसतोड कामगार महिला)

# रानडुकराचा शेतकऱ्यावर प्राणघातक हल्ला

आधुनिक केसरी न्यूज



**पाडळसा :** तालुका गंगापूर येथील सुकापुरी या शेतवस्ती वरील घरानजीक असलेल्या मक्याच्या शेतामध्ये रविवार रोजी संध्याकाळी साडेपाच वाजता डुकरे आल्याची बातमी सचिन गायकवाड या तरुणास समजली. घरातील चार-पाच माणसांसह सचिव डुकरांना मक्या मधून बाहेर काढण्यासाठी मक्याच्या शेतामध्ये शिरले. मक्याच्या शेतामध्ये बरीच डुकरे असल्याचे त्यांच्या लक्षात आले. यातील काही जणांकडे संरक्षणासाठी काट्या होत्या तर काहीजण हातामध्ये काहीही न घेता शेतात शिरले. अचानक डुकरांनी सदरील शेतकऱ्यांवर हल्ला चढवला. शेतकऱ्यांची पळापळ झाली. यामध्ये सचिन गायकवाड या तरुणाला पायाला व हाताला तीन ठिकाणी गंभीर चावे डुकराने घेतले असून गंभीर जखमी केले आहे. यातील काही जमावाकडे काठ्या असल्याकारणाने सदरील डुकरांना पळवून लावण्यात सदरील शेतकऱ्यांना यश मिळाले. अन्यथा मोठी जीवितहानी घडण्याची शक्यता नाकारता येत नव्हती.

आत्ताच पाच- सात दिवसापूर्वी डोनगाव शिवारामध्ये सुलाने वस्ती डोणगाव लासुर रोड या ठिकाणी बिबट्याचे दर्शन घडल्याची बातमी ताजी असतानाच हे आणखीन एक नवीन संकट शेतकऱ्यांच्या समोर उभे राहिले आहे. वन विभागाला वेळोवेळी या संदर्भामध्ये कळविले आहे परंतु झोपेचं सोंग घेतलेला वनविभाग कधी जागा होईल हे सांगता येत नाही. परंतु त्या अगोदर एखाद्या शेतकऱ्याचा प्राण जायला नको. सदर घटनेची माहिती मिळताच उपसरपंच अरुण भाऊ सोनवणे, वैभव सोनवणे, भारत सोनवणे, कृष्णा गोटे सह गावातील अनेक नागरिक घटनास्थळी दाखल झाले व सदरील तरुणास औरंगाबाद येथील शासकीय रुग्णालयामध्ये घेऊन गेले. शासन, व्यापारी व आता अलीकडे जंगली प्राणी देखील शेतकऱ्यांचा जीव घेण्यासाठी बसले आहेत का असा प्रश्न शेतकऱ्यांना पडल्याशिवाय राहत नाही. सदरील घटना ही अतिशय गंभीर असून याकडे शासनाने तथा वन विभागाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# संशयित म्हणून पकडले अन् निघाले अट्टल चोर

## विद्युत पंप दुरस्त करणारे तरुणच विद्युत पंप चोरी करत; अनेक गुन्हे होणार उघड

आधुनिक केसरी न्यूज

**सुरेश बोकील**

**पीरबावडा :** फुलंब्री तालुक्यातील फुलंब्री व वडोद बाजार पोलीस ठाण्या हद्दीसह सिल्लोड ग्रामिण व पिशोर पोलीस ठाणे हद्दीत शेतकर्यांच्या शेतावरील विद्युत पंप चोरी गेलेले असून अनेक गुन्हे दाखल असतांना बाबरा येथे मध्यरात्री १४ जानेवारी रोजी ग्रामस्थांनी संशयीत तरुणांना पकडून दिले असता ते विद्युत पंप ( पाण्याच्या मोटारी ) चोर निघाले. त्यांच्या कडून ४ मोटारी जप्त केल्या असून अनेक गुन्हे उघड होण्याची शक्यता पोलीस व्यक्त करत आहे. फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार पोलीस ठाणे हद्दीत गेवराई व पिरबावडा येथील शेतकऱ्यांच्या शेतावरील विदयुत पंप चोरी गेल्याच्या तक्रारी यापूर्वी दाखल असताना अनेक ठाणे परिसरात असे प्रकार घडत आहेत. परंतु विद्युत मोटारी हया जुन्या किंवा अनुदानाच्या असतात. शेतकर्यांकडे त्यांचे बिल जपून ठेवलेले रहात नसल्याने अनेक जण गुन्हा दाखल करण्याचे टाळत असतात. खुलताबाद तालुक्यातील बाजार सांवगी चौकी परिसरातुन विद्युत पंपावरील किंवा मळणी यंत्रावरील पिटर, विद्युत मोटारी यापूर्वी चोरी गेलेल्या आहे. या विदयुत मोटारी चोर पोलीसांकडे तक्रार केल्यानंतर मिळतीलच याची खात्री नसल्याने अनेक शेतकरी तक्रार करत नव्हते . परंतु यामुळे विद्युत मोटार चोरांना फावले होते अशातच १४ जानेवारी रोजी रात्री 02:00 वा च्या सुमारास मौजे बाबरा येथील श्रीनिवास पेट्रोल पंपाजवळ गावातील काही ग्रामस्थांनी मोटार चोरी करणारे दुचाकीस्वार पकडल्याची माहीती वडोद बाजार पोलिसांना दिली. मिळालेल्या माहितीनुसार सहाय्यक फौजदार दवंगे, पो ना शेख हे तात्काळ घटनास्थळी रवाना झाले, त्याठिकाणी एका मोटार सायकलवर दोन इसम हे पाण्याची मोटार चोरी करताना दिसले. त्यांचे दोन साथीदार पळून गेले. तेव्हा पोलीस पथकाने त्या दोघांचा शोध घेउन त्यांना खामगाव परिसरांत पकडले आणि पोलीस ठाण्यात आणले. सदर चारही इसमांसह दोन मोटार सायकल व त्यांच्या कडील पाण्यातील चार विद्युत पंप हस्तगत करण्यात आलेले असून त्यांच्याकडून केलेल्या चौकशीत त्यांनी त्याचे नाव अमर सुरज प्रसाद दुबे, (रा. कांचन नगर जळगाव) ह.मु खामगाव गोरक्षनाथ ता. फुलब्री, आकाश सुरजप्रकाश दुबे, (रा. कांचननगर, जळगाव) ह.मु खामगाव गोरक्षनाथ, ता. फुलंब्री, सागर राजू सोनवणे, रा. खामगाव गोरक्षनाथ ता. फुलब्री, संतोष संजय सोनवणे, रा. खामगाव गोरक्षनाथ ता फुलब्री जि औरंगाबाद असे सांगितले

त्यांनी पोस्टे वडोदबाजार , फुलंब्री , पिशोर, सिल्लोड ग्रामीण हद्दीतून विद्युत मोटार चोरी केल्याची कबुली दिली आहे.

आरोपी अमर सुरजप्रसाद दुबे, रा. कांचननगर जळगांव, ह.मु खामगाव ता. फुलब्री व आकाश सुरजप्रकाश दुबे, रा. कांचननगर जळगाव, ह.मु खामगाव, ता. फुलंब्री यांचे खामगाव गोरक्षनाथ येथे विद्युत मोटार दुरूस्तीचे दुकान आहे. सदर सर्व आरोपींना गुरक्र 284/2022 कलम 379 भादंविसं या गुन्ह्यांत अटक करण्यात आलेले आहे. आरोपींची पी.सी.आर. घेऊन पोलीस यांनी केलेल्या अनेक गुन्हांची कबुली मिळणार असून त्यांच्याकडून अनेक ठिकाणाहुन चोरी केलेल्या १० पेक्षा जास्त विद्युत मोटारी मिळून येणार आहे. त्यामुळे अनेक पोलीस ठाणे हद्दीत दाखल विद्युत मोटार चोरीचे व दाखल नसलेले अनेक चोरी प्रकरणे या तरुणाकडून उघड होणार अशी पोलीसांना आपेक्षा आहे. पुढील तपास वरिष्ठांच्या मार्गदशना खाली पो.हे.कॉ. अंकुश बागल हे करत आहे.



# दायगाव येथे अल्पवयीन मुलीचा विनयभंग

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील शिल्लेगाव पोलीस ठाणे हद्दीतील दायगाव येथे एका अल्पवयीन मुलीचा विनयभंग झाल्याची दुर्दैवी घटना घडली असून सदरची घटना संक्रातीच्या दिवशी 15 तारखेला रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास घडली. दरम्यान शिल्लेगाव पोलिसांनी तात्काळ आरोपीला ताब्यात घेतले असून क्रांतीवीर बाबासाहेब देवकाते (वय 19)रा. दायगाव ता. गंगापूर असे आरोपीचे नाव असून 15 रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास पीडित मुलीच्या घरी जाऊन विनयभंग केला त्यामुळे अल्पवयीन मुलीच्या वडिलांच्या फिर्यादीवरून शिल्लेगाव पोलिसांनी पोलीस निरीक्षक मछिंद्र सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक युसूफ शेख यांनी आरोपीस ताब्यात घेतले असून भा.द.वि.कलम 354 व बाललैंगीक कायद्यानुसार कलम 8/12 नुसार गुन्हा दाखल शिल्लेगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केलास असून अधिक तपास पिंक पथकाचे पोलीस उपनिरीक्षक साखळे अधिक तपास करत आहे. पोलिसांनी आरोपीस न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने चौदा दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली.

# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात 'फॉरेन्सिक अकाउंटिंग'वर वेबिनार



आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (आयक्यूएसी) आणि वाणिज्य मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'फॉरेन्सिक अकौंटिंग' या विषयावर एक दिवसीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले. यात पुणे येथील या क्षेत्रातील तज्ञ डॉ.अपूर्वा जोशी यांनी मार्गदर्शन केले.

वेबिनरच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार होते. यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.बालाजी कांबळे यांनी प्रास्ताविक करून वेबिनार आयोजित करण्यामागील भूमिका विशद केली. यावेळी डॉ.जोशी यांनी विद्यार्थ्यांना आणि सहभागी झालेल्या प्राध्यापकांना फॉरेन्सिक अकौंटिंग याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. पाहुण्यांचा परिचय वाणिज्य मंडळाच्या प्रभारी प्रा. निकिता अग्रवाल यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.शैलजा चिकटे यांनी तर शेवटी आभार प्रा.राम पांचाळ यांनी मानले. मायक्रोसॉफ्ट टिम्स ॲप्लिकेशन द्वारे घेण्यात आलेल्या या वेबिनारमध्ये प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# शृंगार मनाचे काव्यसंग्रह प्रकाशननिमित्त कविसंमेलनाचे धर्माबादेत आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** येथील हु. पानसरे हायस्कुलचे मराठी विभाग प्रमुख तथा कवी पांडुरंग आडबलवाड लिखित शृंगार मनाचे काव्यसंग्रहाचे प्रकाशन निमित्ताने कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले असून काव्यसंग्रहाचे प्रकाशन 1989 च्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, थोर विचारवंत व समीक्षक, साहित्यिक श्रीपाल सबनीस यांच्या शुभहस्ते होणार आहे. या काव्यसंग्रहास साहित्यिक श्रीपाल सबनीस यांचे प्रस्तावना मिळालेली आहे. असे प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे. हु. पानसरे मेमोरियल स्कुल धर्माबादच्या वतीने 17 जानेवारी रोजी कवी पांडुरंग आडबलवाड लिखित शृंगार मनाचे काव्यसंग्रहाचे 89 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष तथा थोर विचारवंत, समीक्षक व साहित्यिक श्रीपाल सबनीस यांच्या शुभ हस्ते आणि नांदेड येथील सुप्रसिद्ध कवी, कादंबरीकार साहित्यिक, कादंबरीकार देविदास फुलारी यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रकाशन सोहळा संपन्न होणार आहे. दुपारच्या सत्रात निमंत्रित कवींचे कविसंमेलन सुप्रसिद्ध ग्रामीण कवी शंकर वाडेवाले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.

या या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनाची व कवी संमेलनाची जय्यत तयारी झाली असून कार्यक्रमाला जास्तीत जास्त साहित्यिकांनी उपस्थित राहावे असे हू. पानसरे मेमोरियल स्कुलचे अध्यक्ष रामचंद्र पाटील बन्नाळीकर, सचिव तथा माजी नगर अध्यक्ष ॲड. विश्वनाथराव पाटील बन्नाळीकर, मुख्याध्यापक एस. के. बेंबरकर, कवी पांडुरंग आडबलवाड यांनी आवाहन केले आहे.




# 'दयानंद वाणिज्य'च्या नाटकास प्रथम पारितोषिक

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचे यश

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** नेहरू युवा केंद्र लातूर व दयानंद कला महाविद्यालय लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय युवा सप्ताह निमित्य जिल्हा युवा उत्सवाचे आयोजन करण्यात आले, सदरील युवा उत्सवात दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत नुक्कड नाटक कला प्रकारात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले. तसेच नृत्य या कला प्रकारात तृतीय क्रमांक पटकावला. नाटकात विशाल कांबळे, राम सावंत, किरण कांबळे, ऋतुजा सूर्यवंशी, आरती सांगवी तर नृत्य कला प्रकारात अजय हंडरगुळे, चैताली कुलकर्णी या विद्यार्थ्यांनी सहभागी होत पारितोषिके मिळविली. या विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.नितेश स्वामी, डॉ.आकांक्षा भांजी, डॉ गणेश लहाने आणि प्रा.नुरजहा सय्यद यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.बालाजी कांबळे, बीसीए विभाग प्रमुख प्रा. शशिकांत स्वामी, बीबीए समन्वयिका डॉ.वैशाली सातपुते आदींनी विद्यार्थी आणि मार्गदर्शक यांचे अभिनंदन केले आहे.



नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर
घर संसार



सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# सनदी लेखापालांच्या एकत्रित प्रयत्नातून अर्थव्यवस्थेला चालना

## सीए जी. बी. मोदी यांचे प्रतिपादन; सीए इन्स्टिट्यूटतर्फे 'मेम्बर्स इन प्रॅक्टिस'वर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** एखाद्या उद्योगाची नोंदणी झाल्यावरच सनदी लेखापालाचे काम सुरू होते, ही धारणा बदलायला हवी. राज्य आणि केंद्र सरकारच्या प्रत्येक मंत्रालयामध्ये सनदी लेखापालांना अनेक संधी खुणावत आहेत. शासनाच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी सनदी लेखापालांनी घ्यावी. सनदी लेखापालांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ सनदी लेखापाल जी. बी. मोदी यांनी केले. दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटेंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) कमिटी फॉर मेम्बर्स इन प्रॅक्टिस आणि 'आयसीएआय' पुणे शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने 'कार्यरत सनदी लेखापाल' (मेम्बर्स इन प्रॅक्टिस) या विषयावरील आयोजित राष्ट्रीय परिषदेत मोदी बोलत होते. मयूर कॉलनीतील बालशिक्षण मंदिराच्या सभागृहात झालेल्या परिषदेवेळी 'आयसीएआय'च्या केंद्रीय समितीचे सदस्य सीए चन्द्रशेखर चितळे, विभागीय समिती सदस्य सीए ऋता चितळे, पुणे शाखेचे अध्यक्ष सीए काशिनाथ पठारे, उपाध्यक्ष सीए राजेश अग्रवाल, सचिव सीए प्रितेश मुनोत, खजिनदार सीए प्रणव आपटे, सदस्य सीए हृषिकेश बडवे, सीए सचिन मिनियार, सीए अजिंक्य रणदिवे आदी उपस्थित होते. सीए जी. बी. मोदी म्हणाले, शहरांपेक्षा ग्रामीण भागांमध्ये उद्योग, व्यवसाय आणि रोजगाराच्या संधी अधिक आहेत. एमएसएमई




क्षेत्राला बळ दिल्याने संपूर्ण समाज बळकट होईल. पंतप्रधान मोदींचे 'मेक इन इंडिया'चे स्वप्न सत्यात उतरवायचे असल्यास सनदी लेखापाल महत्वाची भूमिका बजावू शकतो. लघु-मध्यम उद्योग यांना व्यापक व प्रगत स्वरूपातील आर्थिक पाठबळ, शासकीय योजना, विविध स्तरांवर तंत्रज्ञानाची मदत, अनुदान शहरी व ग्रामीण भागात किती टक्के मिळते याबद्दलचे मार्गदर्शन मोदी यांनी केले. तसेच उद्योजकांसाठीच्या विविध शासकीय योजनांची माहिती मोदींनी दिली. परिसंवादाच्या उर्वरित सत्रामध्ये सीए विनीत देव यांनी 'एमएसएमई'मधील निधी यावर, सीए राजन वोरा यांनी उद्योगांमधील वादग्रस्त करांवर, सीए दयानिवास शर्मा यांनी डिजिटल अकौंटिंगवर, सीए विवियन पिल्लई यांनी आर्थिक वर्ष संपताना घ्यावयाची काळजी यावर, ॲड. के. के. चैतन्य यांनी कायदेविषयक, तर सीए प्रमोद जैन यांनी 'नॉन कॉर्पोरेट संस्थांच्या अकौंटिंग स्टॅण्डर्ड्स' वर मार्गदर्शन केले.



# महाराष्ट्र राज्य समुदाय आरोग्य अधिकारी संघटनेचे काम बंद आंदोलन

## वेतन वाढ व इतर मागण्यांसाठी जेल रोडजवळ ठिय्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यातील समुदाय आरोग्य अधिकारी संघटनेने आज कामावर बहिष्कार टाकून कामबंद आंदोलन पुकारले . तसेच शहरातील क्युमाईन क्लबजवळ धरणे आंदोलन करून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला .उपकेंद्र येथील समुदाय आरोग्य अधिकारी यांनी अनेक मागण्या शासनदरबारी लाऊन धरल्या होत्या. परंतु, शासनाकडून सकारात्मक पाऊले उचलली जात नसल्याने महाराष्ट्र राज्य समुदाय आरोग्य अधिकारी संघटनेने एकदिवसीय कामबंद आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. तसेच या मागण्या येत्या २३ जानेवारी पर्यंत पूर्ण न झाल्यास मुंबई येथील आझाद मैदान येथे मोठे बेमुदत राज्यव्यापी कामबंद आंदोलन उभारण्याचा आज इशाराही दिला आहे. **या आहेत मागण्या-** मूळ वेतनाच्या १० टक्के कामावर आधारित मोबदला द्यावा, शासनाने निर्गमित केलेल्या उपकेंद्र मिळावे, साक्री तालुक्याप्रमाणे शिरपूर तालुक्यातील अति दुर्गम भागातील कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी यांना अतिदुर्गम भाग अतिरिक्त कामावर आधारित मोबदला द्यावा, केंद्र शासनाच्या सूचनेनुसार इंडिकेटर लागू करणेबाबत व २३ इंडिकेटर रद्द करणेबाबत अथवा प्रती इंडिकेटर १००० रुपये करावेत , केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार बढती मिळावी, टीए - डीए , भविष्य निर्वाह निधी व विमा संरक्षण मिळावे, आदी मागण्यांचा समावेश आहे . या आंदोलनात समुदाय आरोग्य जिल्हा समुदाय आरोग्य अधिकारी संघटनेचे सर्व पदाधिकारी तालुकाध्यक्ष व सर्व पदाधिकारी सहभागी झाले होते. प्रकाश मोरे, डॉ. हिरा पावरा , राज्य सूचक डॉ. राहल जाधव, डॉ. प्राची चौरे , जिल्हा खजिनदार डॉ. योगेश पाटील , सचिव डॉ . विनोद क्षीर आदी उपस्थित होते.

# सिल्लोड तालुक्यातील गोळेगाव येथील अवैध धंदे बंद करा : पत्रकार संजय दांडगे

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** तालुक्यातील मौजे गोळेगाव बुद्रुक येथे मोठ्या प्रमाणामध्ये अवैद्य धंदे चालू असून त्यामध्ये अवैद्य दारू विक्री, कल्याण मटका, अशा प्रकारचे धंदे चालू असून याकडे अजिंठा पोलिसाचे पूर्णतः दुर्लक्ष असून केवळ त्यांना या वैद्य धंदेवाल्यांकडून हप्ते मिळत असल्याने आणि ते जाणीव पूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे स्पष्ट होते या अवैद्य धंद्यामुळे गावातील अनेक कुटुंब उध्वस्त झाले असून नवतरुण सुद्धा या जुगाराकडे वळत आहे या संदर्भात ग्रामपंचायतीना वेळोवेळी अवैध धंदे बंद करण्या बाबतही तक्रारी करण्यात आल्या परंतु "पाणी कुठेतरी मुरतंय" त्यामुळे या अवैध धंद्यांवाल्याना फावले मिळत असून जसा यांना कुणाचाच धाकच नाही अशा पद्धतीने वागून राज रोषपणे अवैध दारू, कल्याण मटका जुगार हे धंदे चालू असून या धंद्यांना अजिंठा पोलिसांचेच अभय मिळत असून ते जाणीवपूर्ण काळ डोळा करून त्यांना पाठीशी घालत आहे अशी तक्रार पत्रकार संजय दांडगे यांनी जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्याकडे एका लेखी तक्रार निवेदनाद्वारे करुन अवैद्य धंदे बंद करण्याबाबत मागणी केली आहे आणि तसे एक तक्रार निवेदन सुद्धा पोलीस स्टेशन अजिंठा येते देण्यात आलेले आहे तरी सुध्दा अजिंठा पोलिसांकडून आजपर्यंत कोणत्याच प्रकारची कारवाई केलेली दिसून येत नाही आंधळं दळतय; आणि कुत्रं पीठ खातयं अशीच अवस्था झालेली आहे. सदरील गोळेगाव बु. हे गाव अजिंठा पोलीस स्टेशन हद्दीतील असून औरंगाबाद-जळगाव महामार्गावर आहे. येथे मोठ्या



प्रमाणात अवैद्य दारू विक्री, कल्याण नावाचा आकडा चालू असून या अवैद्य धंद्यामुळे गावामध्ये वादावादी होण्याची शक्यता नाकारता येत नाही या अवैधंद्यामुळे गावातील अल्पवयीन मुल दारूच्या व्यसनी जात असून या अगोदर सुद्धा गोळेगाव ग्रामपंचायतने अवैद्य धंदे बंद करण्याचे ठराव घेऊन अजिंठा पोलीसाना निवेदन दिले होते परंतु अवैद्य धंदे करणाऱ्यावर कुठलीही आजपर्यंत कारवाई झाली नाही. यामुळे पत्रकार संजय दांडगे यांनी पुन्हा तक्रार देऊन गोळेगाव बु येथील अवैद्य धंदे पुर्णतः बंद करावे असेही तक्रार निवेदनात नमुद केले आहे.

# पो.नि. वाघमोडे यांना महाराष्ट्र भूषण गौरव पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर पोलीस



स्टेशनचे कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे यांना "समता ग्रामीण विकास प्रतिष्ठाण व आपले ज्ञानपंख वृत्तपत्राकडून" दिला जाणारा सन 2022 चा राज्यस्तरीय "महाराष्ट्र पोलिस भूषण गौरव पुरस्कार"जाहीर झाला असून तसे पुरस्कार जाहीर झाल्याचे अभिनंदन पत्र "समता ग्रामिण विकास प्रतिष्ठाण व आपले ज्ञानपंख वृत्तपत्राचे मुख्य संपादक तथा आयोजक दशरथ एन सुरडकर, कार्यकारी संपादक प्रविण तायडे, उपसंपादिका जयश्री सोनवणे यांनी कळवले आहे. लवकरच पुरस्कार वितरण सोहळ्याची तारीख कळविण्यात येणारच असल्यानचेही आयोजकाडून कळविण्यात आले आहे. एका कर्तव्यदक्ष माणसातला माणूस शोधणारा, पोलिस खात्यात आपल्या वर्दीच्या पलीकडील सामाजिक ऋणानुबंध जपणारे व्यक्तीमत्व,लोखंडालाही परीस करणारा आधुनिक काळातील खरा आदर्श पुरुष शिलवान पोलीस अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे फर्दापूर यांना "राज्यस्तरीय महाराष्ट्र पोलीस भुषण गौरव" पुरस्कार जाहीर झाल्याने सोयगांव तालुक्यातील सावळदबारा परिसरात व तालुक्यात अभिनंदन होत आहे तसेच जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत, पत्रकार संजय दांडगे यांनी अभिनंदन केले असून या निवडीबद्दल राजकीय, सामाजिक, प्रशासकीय, पोलिस प्रशासन,कला व क्रीडा आदी सर्वच क्षेत्रातून अभिनंदन कौतुक केले जात आहे.

# विद्यार्थिनींनी सक्षम बनावे : कोलते

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :**सावळदबारा येथील माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालय शिवाजी विद्यालयात राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन प्राचार्य पंजाबराव कोलते यांच्या हस्ते करण्यात येऊन अभिवादन केले. विज्ञान कला व्यवसाय अभ्यास क्रम विभागामध्ये भारतीय स्वातंत्र्याचा अमृत मराठवाडा मुक्ती लढा अमृत महोत्सवी वर्ष व योगी अरविंदो घोष सार्धशती वर्षानिमित्त अभ्यासपुरक विभाग वतीने आयोजित किशोरवयीन विद्यार्थिनीचे समुपदेशन याप्रसंगी सरपंच स्वातीताई कोलते यांनी वैद्यकीय मुलीचे प्रश्ना संबंधी मार्गदर्शन केले. तसेच सपोनि देवीदास वाघमोडे यांनी सायबर गुन्हेगारी संबंधी माहिती दिली. अध्यक्ष प्राचार्य पंजाबराव कोलते, प्रमुख मार्दर्शक संस्थांचे अध्यक्ष भाऊराव कोलते पाटील, सचिव रत्नाताई कोलते, प्रा. जीवन कोलते,प्रा.मदनभाऊ डोखळे, प्रा.वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ जयराम घोटी, पंजाबराव शेळके उपस्थित होते. सुत्रसंचलन प्रा. जीवन कोलते, प्रास्ताविक प्रा . गणेश मोहने व आभार प्रा.गजानन चव्हाण यांनी मानले.

# आपल्या भागाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र यावे

## केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड, विजय चौधरी यांचा सपत्नीक सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** ता.खुलताबाद, औरंगाबाद जिल्ह्याला दोन केंद्रीय मंत्री व राज्यातील तीन मंत्रिपद लाभलेली असून पक्षीय मतभेद बाजूला ठेवून आपल्या भागाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र यावे, अशी अपेक्षा केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ भागवत कराड यांनी केली. पेस कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र येथे पत्रकार विजय चौधरी यांच्या सत्कार समारंभ संपन्न झाला. त्याप्रसंगी ते बोलत होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते कृषी पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल खुलताबाद येथील पत्रकार विजय चौधरी यांना राज्यस्तरीय चौथास्तंभ विशेष पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याबद्दल केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ भागवत कराड यांच्या हस्ते पत्रकार विजय चौधरी यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.
केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी पत्रकार विजय चौधरी यांचे पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन करून मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल आनंद होत असल्याचे सांगून चौधरी यांनी तीस वर्षे केलेल्या पत्रकारितेची हि पावती आहे. त्यांच्या कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन लवकरच त्यांची केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंग तोमर, केंद्रीय कृषि राज्यमंत्री कैलास चौधरी यांची भेट घेऊन केंद्रीय कृषी समितीवर काम करण्यासाठी शिफारस करणार असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी जेष्ठ पत्रकार



डॉ. अनिल फळे, प्रमोद माने, मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव बालाजी सूर्यवंशी, जिल्हा मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष सुनीलचंद्र वाघमारे, सचिव कानिफ अन्नपूर्ण, अध्यक्ष कृषी तज्ञ उदय देवळाणकर, उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अभय धानोरकर, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष एल जी गायकवाड, माजी सभापती भीमराव खंडागळे, माजी सभापती गणेश अधाने, माजी उपसभापती दिनेश अंभोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ भागवत कराड यांच्या हस्ते आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक प्रकाश वाकळे यांनी केले. या वेळी उद्योजक सुनीत आठल्ये, राजेंद्र पवार, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष एल जी गायकवाड, माजी सभापती भीमराव खंडागळे, पंचायत समितीचे माजी सभापती गणेश अधाने, माजी उपसभापती दिनेश अंभोरे, माजी नगराध्यक्ष कैसरोद्दीन, शिवसेनेचे तालुकाप्रमुख राजू वरकड, प्रकाश चव्हाण, भाजपचे शहराध्यक्ष सतीश दांडेकर, माजी नगरसेवक परसराम बारगळ,योगेश बारगळ, तालुक्यातील पत्रकार, डॉक्टर उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय वादविवाद स्पर्धेत मुलींची बाजी

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ कन्नड व शिक्षणमहर्षी स्व के के जाधवसर सेवाभावी प्रतिष्ठाण कन्नड यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालय बनशेंद्रा येथे राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व युवक दिन महोत्सवानिमित्ताने वर्ष 20 वी जिल्हास्तरीय वादविवाद स्पर्धा जिल्हा परिषद सदस्य किशोर आबा पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. स्पर्धेचे उद्घघाटन प्राचार्य विजय भोसले यांनी केले प्रमुख अतिथी संजनाताई जाधव माजी जि प सदस्या गटनेता संतोष भाऊ कोल्हे जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव, तालुकाध्यक्ष बबनराव बनसोड, प्रा. संजय गायकवाड पंचायत समिती सदस्य किशोर पवार ,सरपंच कैलास अकोलकर, माजी सभापती प्रकाश घुले, दिलीप मुठे, उज्वलाताई पवार ,उदयराव जाधव , यांची उपस्थिती होती.

स्पर्धेसाठी 58 विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभागी घेतला होता.स्पर्धेतील विजयी स्पर्धक पुढील प्रमाणे. सांघिक जिजाऊ चषक गणेश विद्यालय देवगाव रंगारी

प्रथम कु सोनाली नागोराव सपकाळ (जि प नागापूर) द्वितीय कु राधिका अभयराव दैठणकर (शारदा मंदिर औरंगाबाद) तृतीय वैष्णवी भगवान ठाकरे (साने गुरुजी विद्यालय कन्नड) उत्तेजनार्थ वैष्णवी भगवान जाधव (कन्या प्रशाला दे. रंगारी) पुनम विजय वाकचौरे (गणेश विद्यालय दे.रंगारी) सायली अतुल चोतमल (सोहम प्रकाश विद्यामंदिर पिशोर )वैष्णवी प्रकाश चंदरे ( साई पब्लिक स्कूल बाजारसांगवी) या विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले . यावेळी विविध क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थी व मान्यवरांचा जिजाऊ पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. प्रा संजय गायकवाड (महाराष्ट्र शासनाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार मिळाल्याबद्दल) पत्रकार महासंघाच्या नूतन कार्यकारणी अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल रवींद्र अजमेरा, उपाध्यक्ष सहयोग जावळे ,



सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाबूसिंग जाधव ( कै. गुरुदयाल सिंग आश्रम शाळा गराडा ) शिक्षण मंडळावर गणित विषया च्या अभ्यास गटावर तज्ञ म्हणून नियुक्ती व मुख्याध्यापक पदभार स्वीकारल्याबद्दल शेखर मांडे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच अमोल गंगावणे, रूपाली शिंदे, यांची राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल तसेच आशिष पवार ,सौरभ पवार यांची विक्रीकर निरीक्षक पदी निवड व प्रियंका जगताप स्पर्धा परीक्षेतून निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच अंबादास मोरे, माजी सरपंच शिवराम तात्या जंजाळ, रमेश बोर्डे ,सरपंच सोमनाथ शेळके, रफिक पटेल ,सौ शालिनी जगताप, विजय बोर्डे, प्रकाश कांबळे, कुलदीप राऊत, युनूस शेख सौ शितल घाडगे ,सौ द्वारका जगताप, सौ स्वाती बोर्डे ,सुमया पठाण, मुख्याध्यापक बाळासाहेब निकम ,हेमराज खोब्रागडे ,रवींद्र नीळ, पर्यवेक्षक रावसाहेब निकम यांची व गावातील ग्रामस्थ अरुण जगताप मनसुख जगताप रघुनाथ जंजाळ शिवाजी जगताप कैलास मोतीगे मनसुख जंजाळ रमेश जगताप परिघाबाई लोखंडे शोभाताई मोतीगे उषाबाई राऊत राजेंद्र घाडगे शिवाजी चोपडे कृष्णराव घाडगे रामराव ठोकळ संतोष नाईक सुदाम जंजाळ नजीर शेख अकबर शेख संजय बाळू लोखंडे गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळातील सर्व परिवार उपस्थित होता, स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून रवींद्र पाटील अमेय अहिरे सचिन भामरे यांनी काम पाहिले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू भोसले यांनी केले.

## गोकुळसिंग राजपूत यांना राज्यस्तरीय ज्येष्ठ पत्रकार पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील आपले ज्ञानपंख वृत्तपत्राचे सोयगांव तालुका प्रतिनिधी गोकुळसिंग राजपूत हे आपल्या कर्तबगार आणि उल्लेखनीय लेखणीने सामाजिक न्यायासाठी शासनाच्या आणि प्रशासनाच्या विरोधात आवाज उठवून अनेक सामाजिक प्रश्नांना आपल्या आदर्श आणि शोध पत्रकारितेतून उचित न्याय देणारे सोयगांव तालुक्यातील सावळदबारा येथील जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग सुखदेव राजपूत यांना उत्कृष्ट पत्रकारितेच्या अनुषंगाने "समता ग्रामीण विकास प्रतिष्ठान व आपले ज्ञानपंख वृत्तपत्र यांच्या वतीने दिला जाणारा सन-2022 चा राज्यस्तरीय "जेष्ठ पत्रकार पुरस्कार" जाहीर झाला असून लवकरच हा पुरस्कार वितरित होणार असल्याची माहिती अध्यक्ष तथा मुख्य संपादक दशरथ एन सुरडकर, उपसंपादिका जयश्री सोनवणे, कार्यकारी संपादक प्रविण तायडे व पत्रकार संजय दांडगे यांनी गोकूळसिंग राजपूत यांना अभिनंदन पत्राद्वारे कळविली आहे. गोकुळसिंग राजपूत हे एक जेष्ठ पत्रकार असून ते अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती संघटनेचे औरंगाबाद जिल्हाध्यक्ष देखील आहेत. सामाजिक प्रश्नांना न्याय देण्यासाठी त्यांनी अनेक आंदोलने, रास्ता-रोको, उपोषणे व लढे उभारले आहेत त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन त्यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार दिला जात असल्याचा आनंद आयोजकांनी व्यक्त केला. तर या निवडीबद्दल त्यांचे राजकीय, सामाजिक, प्रशासकीय, कला व क्रीडा आदीं सर्वच क्षेत्रांतून अभिनंदन कौतुक केले जात आहे.

## एल्गार संघटनेच्या वतीने पत्रकारांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव जा :** आद्य पत्रकार दर्पणकार बालशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त ६ जानेवारी पत्रकार दिनाच्या निमित्ताने दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा एल्गार संघटनेच्या वतीने प्रसेनजीतदादा पाटील जळगांव जामोद यांच्या वतीने पत्रकारांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी उत्कृष्ठ शोधपत्रकारिता पुरस्कार राजीव वाढे, ज्येष्ठ पत्रकार पुरस्कार केशवराव घाटे, उत्कृष्ठ उदयोन्मुख पत्रकारिता पुरस्कार संग्रामपुर तालुका नारायण सावतकार,लोकमत समाचारचे तालुका प्रतीनीधी मोहम्मद फारूक यांना घोषित करुन पुरस्कार प्रदान करण्यात आला.दोन्ही तालुक्यातील पत्रकारांचा भेटवस्तु देऊन एल्गार संघटनेचे संस्थापक प्रसेनजीत पाटिल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसेनजीत पाटिल, तर केशवराव घाटे, भाऊ भोजने, गुलजार खा पठान, रामेश्वर गायकी, शमीम देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. पत्रकार बांधवांना मार्गदर्शन करतांना प्रसेनजीत पाटील यांनी सांगितले की,आजचा दिवस हा खऱ्या अर्थाने पत्रकाराचा असून, त्यांनी आजच्या दिनी व्यक्त झाले पाहिजे. समाजाच वास्तव हे पत्रकारांच्या लेखणीतून उमटत असते.पत्रकार हे बारोमाही समाजाप्रयंत सत्य माहिती पोहचविण्याचे कार्य करत असतात.पूढे बोलताना त्यांनी सांगितले की,जळगाव जामोद व संग्रामपूर तालुका खऱ्या अर्थाने आपणासाठी वैभव आहज.उत्तरेला सातपुड्याचा डोगंर तर दक्षिणेला पुर्णानदी आहे.अशा निसर्गाच्या सानिध्यात दोन्ही तालुके वसलेले आहे त्यामुळे आपण खूप भाग्यवान आहोत.लवकरच जेष्ठ पत्रकार गुलजार खाँ. पठाण व केशल घाटे यांना अधिस्वीकृती धारक पत्रकाराचा दर्जा देण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत.यापुढेही दरवर्षी एल्गार संघटणेच्या माध्यमातून पत्रकार दिनी पत्रकारांणा सन्माण केल्या जाईल.

कार्यक्रमाचे संचलन प्रमोद सपकाल, प्रास्ताविक मोहसिन खान यांनी केले. प्रल्हाद दातार, अश्विन राजपूत, सागर झनके यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

सदर कार्यक्रमाला जलगांव जामोद, संग्रामपुर तालुक्यातील सर्व पत्रकार तथा अजहर देशमुख, राजू पुणेवाला, विठ्ठल वाघ, संजय देशमुख, महादेव भालतडक, आशीष वायझोडे, ईरफान खान, सिद्धू हेलोड़े, सतीष तायडे, निजाम राज यांची उपस्थिती होती.

## उपसरपंचपदी कांताबाई थोरात यांची निवड



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील येथील सरपंच देवेंद्र गायके यांच्या अध्यक्षतेखाली व गावकऱ्यांच्या उपस्थितीत उपसरपंचपदी कांताबाई प्रल्हाद थोरात यांची निवड करण्यात आली. ग्रामपंचायत सदस्य भाऊसाहेब पाटील गायके गणेश नलवडे गणेश साळवे अनिल बापू गायके सोमनाथ दादा कवडे यांचा सत्कार यावेळी पंचायत समिती सभापती कन्नड सुनील निकम यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी भाजप किशन मोर्चा तालुकाध्यक्ष सोमनाथ गायके विलास गायके सतीश भाऊ गायके सचिन गायके गणेश काळे गोकुळ राऊत प्रमोद थोरात राजू शेठ थोरात बापू मच्छिंद्र गायके रमेश गायके पंढरीनाथ गायके अरुण बाबुराव कवडे कृष्णा कवडे शंकर थोरात गबाजी कवडे समाधान गायके भगवान गायके मंडळी उपस्थित होती.

## शिवतीर्थ जळकीबाजार शिवजयंती कार्यकारिणी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**जळकी बाजार :** येथील भारतातील छत्रपती शिवाजी महाराज यांचे तिसरे मंदिर असलेल्या शिवतीर्थ जळकीबाजार गावात दरवर्षी मोठ्या उत्साहात व अनेक समाजउपयोगी उपक्रम राबवित शिवजन्मोत्सव मोठ्या थाटात साजरा होत असते. पंचक्रोशीतील नागरिक, महिला, लहानांपासून तर मोठ्यांपर्यंतचा सर्वांचा मोठया संख्येने सहभाग हा लक्षणीय असतो. या करणे संपूर्ण तालुक्याचे लक्ष जलकीबाजारकडे लागून असते. शिवजन्मोत्सव 2023 च्या नियोजनासाठी, शिवजन्मोत्सव 2023 ची कार्यकारणी नुकतीच जाहीर झाली.या मध्ये अध्यक्षपदी भानुदास दांडगे, उपाध्यक्ष आकाश दांडगे, सचिव किरण जाधव, कोषाध्यक्ष अंकुश राऊत, कार्याध्यक्ष गौरव दांडगे, गणेश दांडगे यांची सर्वानुमते निवड झाली. संपूर्ण सिल्लोड तालुक्यात बहुचर्चित असलेला शिवतीर्थचा शिवजन्मोत्सव 2023 च्या कार्यकारणीत नवंयुवकांना संधी मिळाल्याने सर्वांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. नुकत्याच पार पडलेल्या नियोजन बैठकीत हा निर्णय घेऊन शिवजन्मोत्सव, पुरस्कार वितरण, महिला व बाल सशक्तीकरण, शिवस्नेहभोजन,यासह अनेक नोयोजनात्मक धोरणावर चर्चा करण्यात आली. यावेळी श्री छत्रपती शिवाजी महाराज मंदिर समितीचे सर्व पदाधिकारी, सरपंच, पोलीस पाटील, व शिवतीर्थ जळकी बाजारचे असंख्य ग्रामस्थांची उपस्थिती होती, अशी माहिती अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे औरंगाबाद जिल्हा अध्यक्ष शिवव्याख्याते प्रदीप जगताप पाटील यांनी बोलताना सांगितले.








## नांदगाव, वरखेडी बु. येथे पौष्टिक तृणधान्य लागवडीचा प्रसार




आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** बी. एस. तौर प्रकल्प संचालक आत्मा औरंगाबाद व ए. ई. साळुंखे प्रकल्प उपसंचालक आत्मा औरंगाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली रब्बी हंगाम सन २०२२ – २०२३ मध्ये सोयगांव तालुक्यातील मौजे नांदगाव व वरखेडी बु येथे पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त रब्बी ज्वारी पिक शेतीशाळा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.आज दि.१४.०१.२०२३ रोजी पौष्टिक तृणधान्य दिना निमित्त वरखेडी बु येथे रब्बी ज्वारी पिक शेतीशाळा वर्ग आयोजित करण्यात आलेला होता यात प्रामुख्याने किटकनाशक फवारणी करताना घ्यावयाची काळजी, रब्बी ज्वारीचे आहारात सेवनाचे महत्त्व व फायदे, तसेच जागतिक तृणधान्य वर्षात गावनिहाय करावयाचे नियोजन याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. आजच्या कार्यक्रमात ए. एस. महाजन बी. टी. एम. सोयगाव व एस. एस. चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. आजच्या कार्यक्रमात गोपीचंद राठोड माजी जिल्हा परिषद सदस्य, सरपंच व गावातील प्रगतिशील शेतकरी यांची उपस्थिती होती.